घाशीराम कोतवाल

अनुक्रमणिका

घाशीराम कोतवाल

हा ग्रंथ
मोरोबा कान्होबा अहमदनगर एथील स्मालकाज कोर्टाचे
जडज्य यांणीं केला.

GHASIRAM KOTWAL

BY

MOROBA CANNOBA

OF

HER MAJESTY'S UNCOVENANTED SERVICE.

A. D. 1863.

Printed at the Dnyan Prukash Press,
POONA.

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका



HIS EXCELLENCY

SIR HENRY BARTLE EDWARD FRERE K.C.B.

GOVERNOR OF BOMBAY.

अनुक्रमणिका

ग्रंथ प्रवेश.

घाशीराम सावळदास या नावाचा कनोजा ब्राम्हण, हिंदुस्थानचा राहणारा, पेशवाईत पुणें शहरांत रोजगाराकरितां येऊन राहिला. तो प्रथम कांहीं दिवस सरकार दरबारांत जाऊन मुतसद्दी मंडळीचे अर्जवांत असून उमेदवारी करून पोट भरीत होता. पुढें त्याची कन्या सुस्वरूप होती तिजवर बाळाजी जनार्दन भानू उर्फ नानाफडणवीस यांचा मोठा लोभ झाल्याचे योगानें घाशीराम याजला शहरची कोतवाली प्राप्त झाली. तें काम चौदा पंधरा वर्षें त्यानें केलें, त्यांत स्तुत्य असें त्याचे हातून कांहींच कृत्य घडलें नाहीं. कोतवालीचे बळानें प्रजेवर होईल तितका जुलूम मात्र त्यानें केला, व लांच लुचपत घेऊन द्रव्य जमविलें. नानाफडणवीस यांची मेहेर नजर त्याजवर नसती तर इतकीं वर्षें कोतवाली सुद्धां त्याजकडेस न राहती. अंतीं फार उन्मत्त होऊन एका दिवशीं तैलंग ब्राम्हणांस एका लहानशा खोलींत दडपून घालून त्यानें कोंडलें, त्यामुळें कांहीं ब्राम्हणांचे जीव गेले. तें वर्तमान मानाजी शिंदे, ज्यांस मानाजी फांकडे म्हणत, त्यांस कळल्यावरून त्यांनीं **माधवराव नारायण पंतप्रधान** उर्फ **सवाई माधवराव** यांजला निवेदन केलें. तेसमयीं श्रीमंतांस फार क्रोध येऊन त्यांनीं घाशीराम याचें पारिपत्य होईल तेव्हां अन्नास

ग्रंथप्रवेश.

स्पर्श करीन अशी प्रतिज्ञा करून घाशीराम याजला धरून आणा वा म्हणून आज्ञा केली. त्याजवरून घाशीराम हा नानाफडण विसाचे वाड्यांत लपला व त्याचा जीव वांचविण्या करितां ना नासाहेबांनीं आपली पराकाष्टा केली, परंतु श्रीमंतांचे निग्रहा पुढें तेसमयीं काहीं उपाय न चालतां घाशीराम याजला सर कारचे स्वाधीन करणें आलें, तेव्हां घाशीराम याचे पाय साकळदंडानें हत्तीचें पायांस बांधून शहरांतून ओढीत न्यावें अशी सरकारची आज्ञा होऊन घाशीराम याजला हत्तीचे पायाशीं दिल्हें; त्यांत डोकें फुटून व शरीर छिन्न भिन्न होऊन त्याचा अंत झाला. याप्रमाणें कोतवालाचा परिणाम शके १७१४ इस वी सन १७९२ याचे सुमारास झाला. तेसमयीं त्याचें वय अजमासें पंन्नास वर्षांचें होतें. ह्या कोतवालाचे कारकीर्दीचे संबंधानें ह्या ग्रंथात लोकांचे मनोरंजनार्थ व उपदेशार्थ गोष्टी लिहि ल्या आहेत, त्या प्रत्येक गोष्टीचें तात्पर्य काय याचा विचार करून ग्रंथ वाचिला असतां ह्या कोतवालाचे वेळेस किती अंदाधुंदी हो ती व विद्वान ह्मणविणारे लोकांस देहाभिमान व जात्याभि मान मोठा असून त्यांचा नीतिमार्ग किती अशुद्ध व साधारण विषयां विषयीं केवढें अज्ञान होतें हें सहज कळून येईल.

तारीख ७ आक्टोबर १८६३
मुकाम अहंमदनगर

Moroba Cannoba.

अनुक्रमणिका

ग्रंथांतील विषयांचा सारांश.

गोष्ट १. [पृष्ठ १–७.]

घाशीराम याचा सासरा मोठा भव्य पुरुष होता. तो हिंदुस्थानांतून मुलीस भेटण्या करितां पुण्यास येऊन दाखल झाला ते समयीं घाशीराम याचे घरांत कोंकणस्थ ब्राह्मणाचा मुलगा शागिर्द होता, त्यानें अज्ञानपणानें चेष्टा केल्यावरून त्या पोराची व त्याचे आईबापाची व अज्याची दुर्दशा होण्याचा प्रसंग आला.

गोष्ट २. [पृष्ठ ७–११.]

एका पोरा विषयीं दोघी बायकांचावाद; त्यांत कोतवाल यांचे नीतिज्ञानाचे तर्क व प्रमाणाची तुलना करण्याची रीत कशी होती हें दर्शविलें आहे.

गोष्ट ३. [पृष्ठ ११–१४.]

कोतवाल हा इंग्रजसरकारचे पुण्याचे रसिडंट यांचे भेटीस गेला होता तेथें झालेला मजकूर.

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

घाशीराम याजला आत्मस्तुतीची आवड मोठी असून तो भ्याड होता व शहरचे रखवालदारीचा बंदोबस्त याचे हातून बरोबर राहत नव्हता याचा अनुभाव दर्शविला आहे.

गोष्ट ८. [पृष्ठ ३७–४३.]

घाशीराम याची आई मृत्यु पावली ते समयीं ब्राह्मणलोकांनीं वाड देऊन ठकवणीच्या युक्ति चालिवल्या.

गोष्ट ९. [पृष्ठ ४४–५३.]

घाशीराम याजला किमयाचा छंद होता त्यामुळें कांहीं लोकांनीं साधूपणा दाखवून त्याजला फसविलें.

गोष्ट १०. [पृष्ठ ५३–६२]

१. आग्रा शहरचे इतिहासाचा सारांश. त्यांत जाहांगिरशा पादशाह याचा जन्म कसा झाला व त्या शहरांत ताजमाहाल व एत्मादुद्दवलाचा दरगा आहे त्याचा वृत्तांत.

२. घाशीराम याजला एक अफगान मारित होता तेविषयीं रामशास्त्री प्रभुणे यांजकडेस फियादि गेल्यावरून त्यानीं निर्णय केला तो.

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

PREFACE.

In offering, to the public, the fruit of his labours, the author considers it proper to premise, that, in selecting the title to the work, he has been actuated by a desire to imitate writers of English novels. Though from the variety of topics introduced in the volume it may be a question whether it can properly be classed as a novel; yet the principal character Ghasiram,—figuring in all the pieces is one and the same, and he is one who flourished for a time during the reign of the Peshwa Saway Madhowrao, and played an important part in the metropolitan history of the Deccan. He was the city Magistrate, and being a great favorite and protege of Bálàji Janàrdan, aliás Nànà Farnavis, acted more like an autocrat than a Justice of the Peace, and by acts of tyranny and oppression rendered himself an object of fear and detestation. His tragical end, hastened solely by his cruelties, is pretty well known to the people of the Mahratta Country.

The subjects treated of are partly scientific, literary, artistical, scriptural, historical, natural and fictitious, calculated, the author trusts, to afford to the Vernacular reader instruction and light reading replete with interest and amusement; and offering to the European linguist, engaged in Indian Researches, a quantity of information, not unworthy of

digestion, relating to the social and religious notions and customs of the natives of the Deccan, particularly of the Hindu sect. In various parts of the volume, is strikingly evidenced the potent influence generally exercised by the priest-craft over the conduct, public and private, of the society at large. With the exception of the Kotwal, his priests, preachers, physicians, astronomers and astrologers, whose vanity, arrogance and self-conceit are exemplified by the tone and trains of their reasonings, the different characters introduced are preaching the philosophy of the author; and it is hoped the conscientious reader will find that they have acquitted themselves with considerable success.

To render the work more attractive, a number of illustrations have been introduced. Before sending it to the press, the work was submitted to the Dakshina Prize Committee, who have favored the author with their opinion in the following terms;—

"The Committee find your work very interesting and calculated to afford instruction and amusement to the Vernacular Reading public. They also consider it very creditable to you."

The author is greatly indebted to Mr. Krishna Shastri Chiplonkar, Secretary and Reviser to the Prize Committee, for his undertaking to revise the work. The author craves to himself personally no

अनुक्रमणिका

favour or reward from public or private individuals; his sole object in preparing the work being to render some service to his country by administering to its intellectual and moral improvement.

Ahmednugger
17. October
1863.

MOROBA CANNOBA.

TABLE OF CONTENTS.

SECTION XI. (page 63-72)

SECTION XII. (page 73-78)

SECTION XIII. (page 79-86)

SECTION XIV. (page 86-90)

अनुक्रमणिका

घाशीरामकोतवाल.

गोष्ट १.

घाशीराम याचा सासरा व सासू हीं **हिंदुस्थानांतून** जांव यास भेटण्या करितां पुण्यास एक वेळ आलीं. त्यांत सासरा हा दिसण्यांत मोठा भयंकर पुरुष असून शरीरानें ही मोठा अगड बंब होता. तीं उभयतां जांवयाचे घरीं येऊनउतरलीं, तेव्हां जांव ई व मुलगी हीं सर्व त्यांस भेटून जांवयानें सासऱ्याचा हात धरून माडीवर नेलें, आणि खिडकीजवळ गादीघालून वर तक्याठेवि ला होता, तेथें बसवून मामोजींस हातपाय धुण्यास पाणी आणा म्हणून सेवकास आज्ञा केली. त्याजवरून **पांडू** यानांवाचा मुल गा कोकणस्थ ब्राह्मण शागिर्द होता, तो रुप्याचे दोन तांबे पा ण्यानें भरून व सुगंधी उटणें घेऊन माडीवर आला. त्यास मा माजींचें स्थूळ शरीर पाहून हासें आलें आणि तो विनोदानें हळूच म्हणाला कीं, "अरेबा हा एक मोठा राक्षसच आहे! याला येथें च कांहीं बरेंवाईट झाल्यास खालीं कसें नेतांयेईल!" ही गोष्ट **घाशीराम** याचे कानावर दुसरे सेवकाचे मुखानें गेली, त्या वरून त्याला मोठा क्रोध येऊन त्यानें शिबंदीच्या एका जमा दारास हाक मारून सांगितलें कीं, ह्या टवाळ पोराच्या मुसक्या बां

धून बुधवारचे चावडीवर न्या व जेरबंदाचे शंभर फटके याच्या पाठीवर मारून, वर मीठपाणी शिंपून यास सरकारच्या हद्दपार फिरंग्याचे मुलखांत घालवूनद्या. . कोतवालाचा हुकूम होतांच, शिपाई पांडूला झोंबून त्याला पालथा पाडून मुस्कया बांधूं लागले. तेव्हां पांडूनें आपले तोंडांत मारून घेऊन, महाराज क्षमाकरा, पुनः असें बोलणार नाहीं, मीं झकमारली, मला सोडवा, दादासाहेब सोडवा, बाईसाहेब धांवाहोधांवा, माझा प्राण चालला, माझे आईस तरी भेटवा, मग माझा जीव घ्या; ह्या प्रमाणें मोठ्या आक्रोशानें ओरडून सर्व घर दणाणून दिलें. घाशीराम याचे सासऱ्यास मराठी भाषा समजत नव्हती म्हणून तो हिंदुस्थानींत जांवयास पुसूं लागला.—

सासरे—इस लडकेने क्याकियाहो?

घाशीराम—एह बातकी, मामोजी, आपपूरछा किजिये नहीं.

सासरे—नहीजी, जरा कहोतोसही.

घाशीराम—येबखत कहनेका नहीं, आप चुपी बैठो, इसलडकेके बतीस दांत और जबांतोडके निकालूंगा, जब मेरेतैं समाधान होगा, इसवास्ते आप कुचबोलोनहीं

मामाजीही जांवयाचा रोष पाहून उगींच बसले. इतक्यांत घाशीरामाच्या बायकोला पांडूची दयायेऊन तिनें पांडूची आई काशीबाई हिला त्वरेनें बोलावून आणून तिला मध्यस्थी करण्यास पाठविलें. ती घाशीरामाचे समोर येऊन साष्टांगनम

स्कार घालून बोलूं लागली. अहो दादासाहेब, तुम्ही आमचे अ न्नदाते, आजवर पांडूस आपले लेंकराप्रमाणें वागविलें, यास्तव त्या चा मूर्खपणा आपण मनास आणूनये. कसें झालें तरी तो पोरच आहे. त्याला इतक्या वयांत तर्कज्ञान कोठून असावयाचें ? जन्म मरण हें सर्वांस आहेच. इतकें ती बोलली, तों कोतवालाचे घरीं ए क चाढ होता. तो पुढें येऊन सागूं लागला कीं, बाई आतां सम जुतीच्या गोष्टी सांगते, परंतु नुकीच रस्त्यांत म्हणतहोती कीं, "मामो जींवर तसाच प्रसंग माडीवर प्राप्त झाला तर जांवयाच्या पदरीं कारि गार आहेतच. त्यांतूनएका दोघांस बोलावून एक खिडकी फोडून काढून मामोजींचे मानेस दोर बांधून खिडकींतून चौकांत उत रून देण्यास काय कठीण आहे? पण ही गोष्ट पांडू पोर, त्यास कोठून सुचायाची! " इतकें त्या चहाडाचें बोलणें ऐकतांच को तवाल वाघासारिखा ओरडून काशीबाईचे अंगावर धांवला आ णि त्यानें तिचे तोंडांत जोरानें एक चपराक मारिली, तेणेंकरून ती मूर्छित पडली असतां तिजवर त्यानें लत्ताप्रहार चालविला. तेव्हां जवळचे लोकांनीं धांवून कोतवालास आवरलें. नंतर एकानें गारपाणी आणून त्या बाईचे तोंडावर व आंगावर शिंपडलें; तेणेंक रून ती कांहींशी सावध झाली. तों कोतवालानें जमादारास हां क मारून सांगितलें कीं, ह्या रांडेची धिंड पांडू बरोबर काढा, व तिचे डोकीची भादरपट्टी करून तिच्याकपाळावर व जिभेवर डा ग देऊन मोंगलाईंत हाकूनद्या. त्यावरून तिला व पांडूला शि

अनुक्रमणिका

पाई नेऊं लागले, इतक्यांत पांडूचा बाप रामभट्ट त्यामार्गानें दै ववशात् जात होता, त्याला तें वर्तमान समजतांच त्यानें कोतवा लापाशीं धांवत जाऊन त्याचे पाय धरले ,आणि पदर पसरून जी वदानद्या असें तो विनवूं लागला. तेव्हां बोलणें झालें तें –

कोतवाल–या हरामखोर पोरानें व यारांडेनें काय केलें हें तु ला कांहीं माहित आहे ?

रामभट–महाराज, काय, झालें काय ?

कोतवाल–तें माझ्यानें सांगवत नाहीं. तूं इकडून नीघ, नीघ.

रामभट–अंमळ तरी मला कळूंद्या. दादा, कळवाहो. मी तुम चेपायां पडतों.

कोतवाल–आमच्या मामोजी विषयीं हें तुझें पोर व ही तुझी बायको काय भलभलत्या गोष्टी बोलिलीं, त्या हा हवलदार तु ला सांगेल. माझ्यानें त्या गोष्टी तोंडावाटे सुद्धां काढवत नाहींत. इतक्यांत हवलदार समोर येऊन बोलूं लागला कीं हा राम भट कांहीं कमी आहे असें आपण समजूंनये. हा मोठा कपटी आहे. माडीवर चढण्या पूर्वीं आपणास नाना प्रकारच्या शिव्या देऊन हा म्हणत होता कीं, "मामोजींस अवघड प्रसंग आल्यास कारागिरांकडून दिवाणखान्याच्या खिडक्यांची मोडतोड करून दुश्चिन्हकरा आणि दोर आणा इतके प्रयास करण्या पेक्षां कु ऱ्हाडी घरांत असतीलच. त्यांनीं मामोजींचे हातपाय तोडून नि राळे केले म्हणजे मग त्यांस जिन्यांतून खालीं नेण्यास काय अ वघड आहे !"

कोतवाल—पुरेपुरे या भटोऱ्याचें शहाणपण. धरा याला. धके देऊन काढा बाहेर. यास **वानवडी**चे मैदानांत नेऊन एका झाडास उलटा टांगून एक मण मिर्च्यांची धुरी द्या. नंतर त्याची मोट बांधून **सिंहगडा**वरून लोटून द्या. म्हणजे या दुष्टास योग्य शासन झालें.

या प्रमाणें आज्ञा झाल्यावर शिपाई **रामभटा**च्या मुसक्या बांधीत आहेत इतक्यांत, **रामभटा**चा बाप **महादेवभट** वृद्ध ऐशीं वर्षांचा होता, तो नुकताच कोंकणांतून **पुण्यास** आला होता, त्याला आपले घरच्या माणसांचें वर्तमान कळल्या वरून उदास होऊन एका कागदावर त्यानें अर्ज लिहिला आणि जिवाची आस्था नठेवितां, कोतवालापुढें तो अर्ज टाकावा असें मनांत धरून डोकीस टोपी घालून व हातांत काठी घेऊन कांपत कांपत कोतवालाचे दारापाशीं तो आला. तेव्हां हिंमत चालेना म्हणून तो अर्जाचा कागद टोपींत घालून माडीवर कोतवालापुढें आला आणि आर्जवून म्हणूं लागला कीं ह्या तिघांजणांस किती अकल आहे हें आपणास त्यांचे बोलण्या वरून कळलेंच आहे. **पांड्यास** व **राम्यास** मी शिकवतां शिकवतां थकलों; परंतु कांहींच फळ झालें नाहीं, आणि ही बाई तर आमचे पदरीं आकाबाई आली आहे. तेव्हां मज म्हाताऱ्याकडे पाहून यातिघांस सोडून देण्याची आज्ञा व्हावी. तें कोतवाल ऐकेना. तेव्हां तो साष्टांग नमस्कार घालूं लागला, तेव्हां त्याचे डोकीवरील टोपी पडली, तींतून काग

अनुक्रमणिका

दाचा तुकडा निघाला, त्यांत असें लिहिलें होतें कीं, "आपले मा मोजी माडीवर मेले तर आपण खर्चाकिडेस पाहणार नाहीं. आपले ताब्यांत नौबती व तासेमर्फे व रणशिंगें बहुत आहेत आणि

स्त्रियःश्चरित्रं पुरुषस्यभाग्यं देवोन जानातिकुतो मनुष्यः

हें वचन आपणास विदितच आहे. मामोजींस बरें वाईट झाल्यास मामीसाहेब यांस मागें राहून पातिव्रत्य धर्मास दूषण लावणें नाहींच, तर सहगमन करणें प्राप्त आहे. यास्तव वा ड्याची अथवा शरीराची तोडमोड करावी, या पेक्षां बाहेर वा जंत्रें लावून व ब्राह्मण बोलावून वेदघोषास आरंभ करून हवेलीस अग्नि लावला म्हणजे सर्व समारंभ यथास्थित होईल, आणि मा मी साहेब यांचे पातिव्रत्याचा लौकिक दिगंतरास जाईल". या प्र माणें कागदांतील मजकूर पाहून कोतवाल पिसाळून गेला. आ णि त्याचे हातापाशीं पितळी कलमदान होतें तें उचलून त्यानें त्या म्हाताऱ्यावर फेकलें. तें महादेवभटाचे पायाचे नळीस लागून ती फुटून रक्तस्राव होऊं लागला, आणि म्हातारा जमी नीवर पडून कळेनें तडफडत आहे, तों घाशीराम याचे आंगा वर रोमांच उभे राहून मोठ्यानें आरोळी मारून त्यानें हुकूम, केला, कीं हीं कोंकणचीं माणसें एकापरीस एक फार शहाणी आहेत. यांस जिवंत ठेवून उपयोग नाहीं. अहो जमादार, याचौघांस मस्त हत्तीचे चार पायांस आमचे समक्ष बांधून हक

डून हत्तीस पिटाळून सर्व शहरांत चार प्रहर पर्यंत फिरवा. नंतर ह्या चौघांचीं प्रेतें **भांबुरड्यास** पोंचवूनद्या.

कोतवालाची आज्ञा झाल्यावरून सेवक हत्ती आणण्यास धांवले. इतक्यांत हें सर्व वर्तमान **शनवार**चे वाड्यांत **पेशव्यां**स कळलें. त्यांनीं ब्रह्महत्या होणार यास्तव त्वरेनें **जनकोजी** हुजऱ्या यास पाठवून **पांडू, काशीबाई, रामभट,** व **महादेवभट,** यांस सोडवून आणिलें. आणि तेच वेळेस **घाशीराम** कोतवाल यास आज्ञापत्र पाठविलें कीं ब्राह्मणलोकांचें पारिपत्य करणें झाल्यास हुजुरास कळविल्या वांचून तुह्मीं परभारें तें करूं नये.

गोष्ट २.

एके दिवशीं **घाशीराम** कचेरींत इनसाफ करीत बसला होता, तेथें **संती** या नावाच्या एका स्त्रीनें रडत येऊन अशी फिर्याद केली, कीं माझी शेजारीण **ज्यानबी** माझें पोर जबरदस्तीनें घेऊन **वानवडी** येथें आपल्या माहेरास चालली आहे. त्यावरून कोतवालानें स्वार पाठवून **ज्यानबी**ला पोरासुद्धां धरून आणलें, आणि तिला मजकूर विचारिला. तेव्हां तिनें सांगितलें कीं हें

अनुक्रमणिका

पोर माझें असून संती उगीच गळां पडत आहे. मग कोतवा लानें पक्षकारांपासून आपआपला पुरावा मागितला आणि त्यांनीं लिहून दिल्या प्रमाणें सुइणी व दुसरे लोक बोलाविले. त्यांच्या साक्षी घेतल्या, त्यावरून असें कळलें, कीं संती व ज्यानबी या उभयतां एकमेकींचे शेजारीं शुक्रवार पेठेंतील राहणाऱ्या आहेत. व उभयतांचे नवरे मोहिमीवर एक वर्षावर गेले, तेव्हां दोघीजणी गरोदर होत्या. त्या दोनतीन दिवसांच्या अंतरानें प्रसूत होऊन उभयतांस मुलग्या झाल्या. त्या एकमेकींचे घरीं नेहमीं जातयेत असत. संतीचे आप्त दोघेजण होते. त्यांनीं हें पोर संतीचें असें सांगितलें. आणि ज्यानबीचे लगतीचे तिघेजण होते, त्यांनीं सांगितलें कीं हें पोर ज्यानबीचें आहे. त्यावरून कोतवाल यानें बोलण्यास आरंभ केला.

कोतवाल—अगे संते, ज्यानबीच्या वत्तीचे साक्षीदार जास्ती आहेत, यावरून तूं, लबाड आहेस, आणि ज्यानबी खरी आहे असें ठरलें. तर बालंट घेतल्याबद्दल तुझी धिंड काढली पाहिजे.

संती—महाराज, नाहीं; महाराज, नाहीं; मी खोटी नाहीं. ज्यानबी इनें आपली मुलगी खुदाबक्ष नायकीणीला दोनशें रुपायांस दोनदिवसां पूर्वीं विकत दिली. पाहिजे असल्यास मी आणखी दोन साक्षीदार जास्ती आणतें.

कोतवाल—खुदाबक्ष ही नायकीण आम्हांस माहीत आहे. ती मुळची मराठीण होती. ती त्रिकाळ स्नान करीत असत.

तिनें स्वयंपाकास ब्राह्मण ठेविले आहेत. ब्राह्मणांवांचून दुसऱ्या चे हातचें पाणी देखील ती घेत नाहीं. तिचें सोवळें फार आहे. एकादशीस निरशन करून दिवसभर घोंगडीवर बसून ती पुराण श्रवण करीत असते. तिच्या घरीं रात्रीस फराळास मंडळी येते. द्वादशीस ती वैदिक व शास्त्री वगैरे यांस एक एक रुपया दक्षणा व सिधा दिल्या पूर्वीं अन्नास शिवत नाहीं. यास्तव ती ह्या ज्यानबी मुसलमाननीची पोर घेईल असें कधीं घडायाचें नाहीं. आतां एकमेका पेक्षां अधिक साक्षीदार तुह्मी देऊं पाहतां, तेव्हां तुह्मी दोघी ही खोट्या आहां. तर तुह्मी ही पोरगी बजानायकिणीचे हवालीं करावी. ती तिजला मोठी करून गावयास व नाचावयास शिकवील, ह्मणजे तिचा वंश चालू राहील.

ह्या प्रमाणें कोतवाल यांनीं सांगून बजानायकिणीस बोलावणें पाठविलें. हा सर्व प्रकार चालत असतां, तेथें इंदापुरचे काजी, सैय्यद हमीमुदीन बसले होते. त्यांस कोतवालाचा न्याय नीट वाटला नाहीं. परंतु कोतवालास तसें स्पष्ट म्हणतां येईना. यास्तव काजी यांनीं घाशीराम याचे कानाशीं लागून सांगितलें कीं, या पोरीविषयींचे तंट्याचा निर्णय करण्याचें मला सांगाल तर मी करतों. तेव्हां काजीचे वयाकडेस पाहून कोतवालानें रुकार दिला. मग काजींनीं ज्याबद्दल तक्रार पडली होती, तें मूल आपले जवळ घेऊन प्रथम संती जवळ दिलें व तिला त्यास पा

जावयास सांगितलें. तेव्हां तें मूल तिला झोंबून स्तनपान क रूं लागलें. नंतर तिजपासून घेऊन ज्यानबीपाशीं दिलें. तिचेंही स्तनपान त्यानें केलें. पुढें काजीनें मूल आपले जवळ घेऊन संतीस व ज्यानबीस कचेरीबाहेर घालविलें आणि एका कसायास मोठा सुराघेऊन बोलाविलें. नंतर ज्यानबीला आंत बोलावून काजींनीं सांगितलें कीं पहा, झालेले पुराव्यावरून हें मूल तुमचें दोघींचें ठरत आहे. यास्तव त्या मुलाचे बरोबर वांटे झाले पाहिजेत. तर हा कसाई उभा आहे. याचे हातानें पोराचे बरोबर दोन तुकडे करवितों. तुझा एक साक्षीदार ज्यास्ती आहे यास्तव तुला उजवे बाजूचा तुकडा मिळेल. त्यास आतां तुझी तक्रार कांहीं राहिली आहे किंवा कसें ? ज्यानबीनें उत्तर केलें कीं बरें आहे. माझी तक्रार राहिली नाहीं. नंतर संतीला हांक मारून काजींनीं त्याप्रमाणें मजकूर सांगून तुला डावेकडील अंश मिळेल, असें बोलतांच, संतीनें किंकाळून सांगितलें कीं, मला कोणताही विभाग नको. मुलाचे तुकडे न करतां तें जिवंत सरकारांनीं ज्यानबीचे हवालीं करावें; माझी कांहीं तकरार नाहीं. पाहिजे तर मी फारकत लिहून देतें.

कोतवाल–काजीसाहेब, मी म्हणत नव्हतों कीं, ही संती खोटी आहे.? पहा, आतां आपणच होऊन फारकत देण्यास कबूल झाली आहे.

कोतवालाचें बोलणें ऐकून सर्व लोक हासूं लागले. मग का

अनुक्रमणिका

जींनीं तंव्याचें मूल निःसंशयपणें संतीचें आहे कशावरून, हें कोतवालास समजावून दिलें. तेव्हां कोतवाल साहेब ही उमजले आणि त्यांनीं तें मूल संतीचे हवालीं केलें.

गोष्ट ३.

एका दिवशीं नानाफडणवीस यांनीं घाशीरामास संगमावरील इंग्रजसरकारचे रेसिडेंट साहेबांकडेस कांहीं कामा करितां पाठविलें होतें. तेथें कामाचा मजकूर संपल्या नंतर बोलणें चाललें तें येणें प्रमाणें —

कोतवाल—समुद्र ह्मणतात तो आपले पाहण्यांत आहे काय?

रेसिडेंट—होय, पाहण्यांत आहे. आमचा देश समुद्रांतच आहे. आह्मी तेथून जाहजांत बसून या देशांत येतों.

कोतवाल—असेंकाय! आपला देश येथून किती दूर आहे, व तेथून येथें येण्यास किती दिवस लागतात?

रेसिडेंट—चार हजार कोस सुमारें आहे. तेथून येण्यास तीन चार महिने लागतात.

कोतवाल—जाहजाची सडक किती रुंद आहे? वाटेनें बापदेवाचे घाटा प्रमाणें घाट लागत असतील, व वाटेनें उतरण्यास धर्मशाळा असतीलच?

अनुक्रमणिका

रेसिडेंट–समुद्र निराळा व जमीन निराळी. समुद्र हें खारें पाणी आहे, व पृथ्वीवर जमीनी पेक्षां समुद्र जास्ती आहे. समुद्रांत सडक नसते. तुह्मी पृथ्वीचा नकाशा कधीं पाहिला नाहीं काय?

कोतवाल–श्रीमंतांचे वाड्यांत व पुणें शहरांत अनेक ठिकाणीं शिंदे, होळकर, नबाब, यांच्या तसबिरा आहेत. त्या प्रमाणेच पृथ्वीचा नकाशा असेल?

रेसिडेंट–नाहीं नाहीं, तसा नाहीं. तुह्मांस पृथ्वीचा नकाशा दाखवितों. (असें बोलून भिंतीस पूर्व गोलार्ध व पश्चिम गोलार्ध असे दोन नकाशे लाविले होते, ते दाखविले.)

कोतवाल–आतां समजलों. हीं दोन्हीं चक्रें जाहजाचीं चाकें असतील, आणि त्या खालची काठी हा आंख असेल. त्यावर जहाज बसवून समुद्रांतन ओढीत नेत असतील.

रेसिडेंट–आपले सारखे जलद समजणारे लोक श्रीमंतांचे पदरीं आहेत हें पाहून आह्मांस मोठें आश्चर्य वाटतें. नानासाहेबांची भेट होईल तेव्हां आपले विषयींचा मजकूर सांगूं. (हें बोलणें ऐकून घाशीराम यानें मनांत मोठा संतोष मानून व शहाणपणाचा अभिमान धरून आणखी बोलण्यास आरंभ केला.)

कोतवाल–पूर्वी अयोध्येंत श्रीरामचंद्रजी झाले. त्यांनीं वानरसेना मिळवून लंकेस जाऊन रावणाचें राज्य घेतलें. नंतर वानरसेनेस वर दिला कीं कलियुगांत तुह्मी राज्यकर्ते व्हाल. या प्रमाणें आमचे पुराणांत सांगितलें आहे. आणि त्या वानरां

पासून झालेले **फिरंगी** लोक आहेत, त्यांस लहानसें शेपूट ही असतें, व त्यांचें राज्य मोठें आहे ह्मणून ऐकतों. ते लोक आपले पाहण्यांत आहेत काय ?

रेसिडेंट–**फिरंगी** लोकांत आमचे जातीचे लोकांची गणना आहे. परंतु आमची किंवा त्यांची वानरांपासून उत्पत्ति झाली, व आह्मांस किंवा त्यांस शेपूट आहे ही तुमची समजूत बरोबर नाहीं.

कोतवाल–साहेब, आपण असें काय ह्मणतां ? प्रत्यक्ष **महादेवशास्त्रीथत्ते**, **रघुनाथशास्त्री द्राविड**, व **नारायण गोसांवी नाशिककर** अशा अशा विद्वानांचे तोंडानें आह्मीं ही गोष्ट अनेक वेळ ऐकिली आहे. आणि ती सर्वांस श्रुत आहे.

रेसिडेंट–त्यांस फिरंगी लोकां विषयीं बरोबर माहिती नसेल.

इतकें बोलणें झालें तों **रेसिडेंट साहेबांची** खाण्याची वेळ झाली. यामुळें त्यांचे सेवक सामान आणूं लागले. त्यांत एक सेवक एका चांदीचे लहान भांड्यांत स्फटिका सारखे शुभ्र रंगाचें मीठ घालून तिकडून आणीत होता. तें कोतवालाचे दृष्टीस पडल्यावरून बोलणें चाललें–

कोतवाल–हें मीठ इतकें पांढरें चकचकित कोठून आलें ? आपले देशांत मीठ उत्पन्न होतें काय?

रेसिडेंट–हें मीठ कोकणचें आहे. आमचे देशांत ही मिठागर मोठाले आहेत. त्यांत समुद्राचे पाण्याचें मीठ करितात.

कोतवाल–मग **मुळामुठा** नदीचे तीरावर त्या विलायती मि ठाचें बीज लाविलें असतां नदीचे पाण्यानें येथेंच मीठ उत्पन्न हो ईल. श्रीमंतांस ही गोष्ट सुचवूं काय ?

रेसिडेंट–मिठाचें बीं असत नाहीं. समुद्राचे काठीं जमी न खणून सारखी करून तींत बांध घालून मिठागरकरितात. त्यां त चौकड्या करून, समुद्राचे पाण्याचा पाट आणून तें पाणी सु कवितात. म्हणजे मीठ उत्पन्नहोतें. मीठ उत्पन्न करण्यास खारेंपाणी लागतें.

कोतवाल–समुद्राचें पाणी खारें असतें काय ? आमचे येथें नारळीबाग व सुपारीबाग आहेत, त्याच प्रमाणें मिठागर असतील मिठाचीं झाडें किती मोठीं असतात ?

रेसिडेंट–बागे प्रमाणें मिठागर नसतात, व मिठाचीं झाडें हीं नसतात. नुसें खारें पाणी चौकड्यांत उन्हानें व हवेनें सु कून त्याचे चुनखडी प्रमाणें खडे जमतात.

कोतवाल–असेंकाय ? आमचे शहरांत फार लांबून पाण्याचे नळ बांधून आणिले आहेत. त्याप्रमाणें समुद्राचा नळ बांधून आणिला म्हणजे **गणेश खिंडी**चे व दापुडीचे मैदानांत मिठा चीं शेतें सहज होतील.

हें बोलणें ऐकून **रेसिडेंट** साहेबांस हसें आलें. मग चोपदारास हांक मारून अत्तर गुलाब व विडे देऊन **घाशीरामा**स निरोप दिला.

गोष्ट ४.

रात्रींस भोजन झाल्यावर **घाशीराम** आपले वाड्यांत कांहीं वेळपर्यंत पानाच्या पट्ट्या व जर्दा खात बसत असे, व त्यावेळीं आ र्जवी मंडळी त्याचे भोंताली जमून त्याचे इनसाफाचीव कर्तृत्वाची मोठी तारीफ करित असे. तशा एकावेळीं तेथें एक **विजापुरचा** गृहस्थ आला. त्यानें आपले शहरचे न्यायाधीशाच्या प्रशंसेची गोष्ट सांगितली, कीं गेले आषाढीचे यात्रेंत विकण्या करितां पंढरपुरास पाठविण्यासाठीं आमचे शहरचा **रामदीन** नामें एक गंधी पांच पंचवीस मण चांगला सुगंधी बुका तयार करून, पंन्नास पोतीं भरून, दुसरे दिवशीं तीं बैलावर लादून रवाना करणार होता. तीं पोतीं त्यानें आपले दुकाना मागील चौकांत टेविलीं होतीं. तीं रात्रीस कोणी चोरट्यांनीं नेलीं. **रामदीन** पहाटेस उठून चौकांत जाऊन पहातो तों पोतीं नाहींत. परंतु इकडे तिकडे कांहीं बुका उधळलेला होता व भिंतीवरून पोतीं चढवून नेल्याच्या खुणा दिसत होत्या. त्यावरून "चोरी झालीरे, चोरी झाली" ह्मणून त्यानें आरोळी ठोकली. त्यावरून जवळपासचे लोक धांवून आले. त्यांस त्यानें मजकूर सांगितला आणि शहरचे कोतवाल **समशेरखान** यांस खबर दिली. त्यावरून त्यांनीं जलदी करून स्वार पाठवून नाकेबंदी केली, आणि सर्व शहरांत शोध केला. परंतु ठिकाण लागेना. तेव्हां बु

अनुक्रमणिका

क्याचे सर्व दुकानदार व त्यांचे गुमास्ते यांजला जमवून चौक शी चालविली, ती दोनप्रहर होत तोंपर्यंत चालली. तथापि पत्ता लागला नाहीं. नंतर सर्वांस उभें करून **समशेरखान** हे त्यां सभोंवते तीनदां फिरून येऊन समोर उभे राहिले, आणि मोठ्यानें हासून बोलले कीं हे काय निर्लज्य लोक आहेत ! बुका चोरला तर चोरला; परंतु त्यापैकीं बुका कपाळास ही लावून ये थें आले आहेत ! इतके शब्द ऐकतांच जमलेल्या मंडळी पैकीं चौघांजणांनीं आपआपले कपाळावरून हात जलदीनें फिरवून नाकाकडे वास घेण्यास नेले. इतक्यावरून त्या चौघांस एकी कडे काढून तपास करितां, त्यांत दोघेजण सख्खे बंधू होते व बाकीचे दोन असामी त्यांचे गुमास्ते होते, असें कळलें. त्या वरून त्या उभयतां बंधूंचे दुकानचीं व घरचीं तळघरें मशाली लावून शोधलीं. तेव्हां चोरीस गेलेलीं पंन्नास ही पोतीं अडच णीचे ठिकाणीं लपवून ठेविलेलीं सांपडलीं. त्यावरून त्या चौ घांचें पारिपत्य केलें. तेव्हां पासून **समशेरखान** कोतवाल यांचे बुद्धीची व चातुर्याची मोठी प्रशंसा झालीआहे.

सदरहू प्रमाणें गोष्ट **विजापुरचे** वाण्यानें सांगितलेली ऐकू न **घाशीराम** बोलला कीं **समशेरखान** व तरवारखान असे अ कलवान असते तर **विजापूरची** बादशाई कां बुडाली असती? आमचे शहरांत अशी चोरी झाली असती तर दोनप्रहर व चा रप्रहर ते चोर धरण्यास कशास लागते ? आम्ही सर्वांस एका को

अनुक्रमणिका

ठडींत दडपून घालून त्यांपैकी पांच चार जणांस तापवून लाल केलेले लोखंडी तव्यावर उभे केले असते, ह्मणजे चोर कोणते ते एका क्षणांत सांपडले असते. हें भाषण ऐकून घाशीरामाचे घरचे आर्जवी मंडळीनें वहावा करून विजापूरचे वाण्याची मो ठी फजीती करण्यास आरंभ केला. तेव्हां तो बापडा उठून गेला.

गोष्ट ८.

घाशीराम याला **ललितागौरी** ह्मणून एक सुंदर कंन्या होती. तिचें लग्न **कानपूर** येथील एका जमीदाराचा मुलगा **भानुप्रसाद** याशीं केलें होतें. ती मुलगी सोळा वर्षांचे वयाची होऊन तिला स्त्रीपणा प्राप्त झाल्यावर **भानुप्रसाद** याला **हिंदुस्थानांतून** बोलावून **पुण्यास** आणून घरजांवई केलें. त्या जांवयाचें वय चाळीसांपेक्षां जास्ती होतें. त्याची मुद्रा व रंग ढंग सर्व बायक्या प्रमाणें होते. त्यावरून लोक त्याची फार चेष्टा करीत असत. ही गोष्ट **घाशीरामास** कळल्यावरून त्यानें असा निश्चय केला कीं, मुलीस संतान होण्या करतां, होईल तितका प्रयत्न करावयाचा. मग त्यानें जोतिषी बोलावून मुलीची जन्मपत्रिका त्यांस दाखविली. त्यांनीं सांगितलें कीं, **ललितागौ**

अनुक्रमणिका

रीचे संतानभुवनीं राहु आहे. त्या ग्रहाचें चलन झालें म्हणजे तिला मूल होईल. ती गोष्ट होण्यास्तव राहूचे जप करावे, व त्या ग्रहाचीं दानें ब्राह्मणांस द्यावीं. त्यावरून बराच खर्च करून घाशीरामानें ब्राह्मणद्वारा जप करवून दानें दिलीं. घरांत त्याकडे व त्याचे बायकोकडे गांवांतील बायका येत असत, त्यांपैकीं कोणी नानाचे पेठेंतील ताबुताचे घोड्यास सवा मण रेवड्या वाहण्याचा; कोणी गारपिरास चादर चढविण्याचा; कोणी सटवाईस खेळणें पाळणा वाहण्याचा; कोणी मोहोरमचे महिन्यांत पांच वर्षें पर्यंत भावी लेंकरास फकीरी देण्याचा; कोणी पंचमुखीमारुतीस दर शनिवारीं तेल घालण्याचा; कोणी वापदेवास शेंदूर चढविण्याचा; व कोणी जेजुरीचे खंडोबास मुलगें वाहण्याचा; याप्रमाणें नवस केले. पिंपळाचे झाडाखालीं नागवे दोन प्रहर रात्रीं स्नान करावें व तुळशीस लक्ष प्रदक्षणा घालाव्या वगैरे नानाप्रकार करण्यास कांहींनीं सांगितलें, त्याप्रमाणें आईबापांनीं मुली पासून करविलें. अनेक फकीर व बावा यांपासून भानुप्रसादा करतां जडीबुट्या घेतल्या, व त्याचे कपाळीं लाविल्या, व पाण्यांत घालून मुलीस पाजिल्या. मांत्रिक व देवऋषी यांजकडून पिशाचबाधा कांहीं आहे काय म्हणून शोध केला, तेव्हां भानुप्रसादाच्या मेलेल्या आईची नड आहे असें कळलें. त्यावरून भानुप्रसादास नाशकास पाठवून आपले आईची नागबळ नारायणबळ करविली. याप्रमाणें शेंकडों रुपये खर्च क

अनुक्रमणिका

रून, लोकांनीं सांगितले व आपणास सुचले, तितके प्रकार आई बापांनीं करविले, त्यांत चारपांच वर्षें गेलीं. तथापि **ललितागौरी**स संतानहोईना. तिचें वय एकवीस वर्षांचें झालें. तेव्हां **कृष्णशास्त्री वाईकर कोतवालाचे** घरीं येत असत. त्यांनीं घाशीरामास सांगितलें कीं, आतां ढोंग धुतारे टाकूनद्या. आणि सत्समागम करून मुलीस साधुसंतांचे सेवेकडेस लावा, म्हणजे **हरि** कृपा करील. ती गोष्ट **घाशीराम** याचे मनास आल्यावरून मुलीस आपले बायको बरोबर **बेलबागेंत** व **तुळसीबागेंत** नित्य सायंकाळीं दर्शनास व कथाकीर्तन व पुराण ऐकण्यास तो पाठवूं लागला. तेथें अनेक ठिकाणीं पुराणें होत असत. त्यांत **तुळसीबागेंतील** धर्मशाळेंत वेदशास्त्रसंपन्न **विष्णुंभट वैशंपायन** यानावाचा एक पुराणीक असे. तो गोरागोमटा असून त्याचें वय तीसपस्तीस वर्षांचें होतें. तो देवीचा उपासक असून त्यानें **महाकाळी**ची स्फाटिकाची मूर्ती अंतर गृहांत बसविलीहोती व तिची तो मोठ्या थाटानें पूजा करीत असे. तेथें बायका दर्शनास फार जात येत असत. पुराणीक मोठा रेशीमकाटी अष्टीचा धोतरजोडा नेसून, कपाळीं केशरी गंध लावून, गळ्यांत अर्गजाच्या माळा घालून व हिरवी शालजोडी पांघरून पुराण सांगण्यास बसत असे. त्याचा गळा सुंदर असे. तेथें **घाशीरामा**ची बायको व कन्या ह्या जाऊं लागल्या. तेव्हां दुसरे बायकांचे मुखानें त्यांस कळलें कीं **विष्णुंभटाला** देवी प्रसन्न असल्यामुळें देवीचे प्रसादानें कित्येक वांझ बायकांस मुलें होतात. हें वर्त

अनुक्रमणिका

मान ऐकून मुलीचे आईस मोठीं आशा उत्पन्न झाली. तिनें विष्णुंभटाची गोष्ट घाशीरामाला सांगितली. त्यावरून त्याचा ही भाव पुराणीक बावावर बसला. घाशीराम पुराणीक बावांकडे जाऊं येऊं लागला. आणि नित्य त्यास मेवामिठाई व सिधासामुग्री पाठवूंलागला. पुराणीकबावा, पुराण समाप्त झाल्यावर सायंकाळीं स्नान संध्या उरकल्यावर देवीचे पूजेस आरंभ करीत, व आरती झाल्यावर शाक्त उपासक मंडळीस आपले हातानें देवीचा प्रसाद वांटीत. इतक्यांत बंदीची तोफ होण्याचा समय होत असे. मग सेवक आपआपले घरीं जात. कोणीं काकड आरतीचे दर्शनाकरितांपुराणीक बावाचे बिऱ्हाडांतच निजत असत. घाशीरामाची बायको व कन्या ह्यारात्रींस आरतीचे समयास येऊं लागल्या. कधींकधीं मुलीस काकड आरती करितां पुराणीक बावांचे घरीं ठेवून आई प्रसाद घेतल्यावर आपले घरीं जात असे. याप्राणें पांच सहामहिने लोटल्यावर ललिता गौरीस डोहळे होऊं लागले. तेव्हां तिचे आई बापांची भक्ति पुराणीकबावांवर फारच लागली. पुढें मासपक्ष पुरे झाल्यावर ललितागौरीस मध्यान रात्रीस पुत्र झाला. त्या आनंदानें घाशिराम मोठाफुरफुरून जाऊन त्या आवेशांत असें म्हणाला कीं आज पर्यंत जांवयजींस जो मोठा कलंक लागला होता, तो देवीनें घालविला; फार चांगलें झालें. आतां ह्याची जे लोक चेष्टा करीत होते, त्यांची फजीती उदयीक नाना साहेबांचे वाड्यां

त जाऊन करितों. मग भानुप्रसादास जवळ बोलावून त्यास हर्षानें ह्मणाला कीं जिवे बेटा जिवे!तिरे देहीकी अभ स्वार थ भये. सब दुशमनो की मुछें निचे उतारत हैं. ज्या आब इतनी बखत अस्नाननाकरो; पण शास्त्र परमानें एक पाषाणका टुकरा लेके कुवामे डुबादे. नंतर त्या प्रमाणें भानुप्रसादानें जाऊन परसांतील विहिरींत एक दगड टाकिला आणि तो परत आला; नंतर घाशीरामानें शर्करा घेऊन तींतून एक चिमूट आपले मुखांत घालून एकचिमूट भानुप्रसादाचे मुखांत घातली. पहाट होतांच त्यानें चौघडे व वाजंत्रीं आणून मोठा समारंभ मांडिला; सरकार वाड्यांत व दरबारचे मंडळी कडेस साखरेनें भरलेलीं ताटें पाठविलीं; आणि नानाफडनवीसांचे वाड्यांत आपण स्वतः जाऊन साखरेनें भरलेलें एक रूप्याचें ताट नानासाहेबां पुढें ठेवून हात जोडून विनंती केली कीं आपले आशीर्वादानें ललिताबाईस पुत्ररत्न प्राप्तझालें आहे. जें लोक आज पर्यंत तिच्या नवऱ्याची टवाळी करीत होते, त्यांचीं तोंडें आज काळीं झालीं. हें बोलणें ऐकून बसलेले मंडळीपैकीं एक धिट्ठ गृहस्थ हसत हसत बोलला कीं नानासाहेब, आमचें बोलणें भानुप्रसादावर होतें ललिताबाईचे सामर्थ्याविषयीं आम्हास कधींच भ्रांति नव्हती.

गोष्ट ६.

नानाफडणवीस यांनीं **पुणें** मुकामीं **काळेवावरांत** लाविलेली बाग अद्यापि आहे. तींत फुलझाडें नानाप्रकारचीं लाविलेलीं होतीं. ती बाग पाहण्याकरितां इंग्रज सरकारचे पलटणीचे दोघे साहेब एक **जोन्स** व दुसरा **स्मिथ** असे आलेहोते. त्यां बरोबर **घाशीराम** बागेंत चहूंकडे फिरून एकासोनचाप्याचे झाडापाशीं आला, आणि त्याझाडाची तारीफ करून ह्मणाला कीं, हेंझाड लहानसें दिसतें खरें; परंतु हें मुद्दाम **औरंगाबादेहून** आणलेंआहे. ते आणण्यास व लहानाचें मोठें करण्यास व त्याचे मुळास केशराचें खत घालण्यास आजवर दोनहजार रुपये खर्चहोऊन चुकला आहे. त्यावर चैत्र वैशाख मासीं बारयेतो. व त्यांतील दहा पांच मात्र फुलें चांगलीं होतात. परंतु त्यांचा सुगंध इकडून विश्रामबागेपर्यंत जातो आणि हौशी लोक तशा एका फुलास दहा रुपये पर्यंत देऊन माळ्यापासून नेतात.

अशी तारीफ ऐकून **जोन्स** यानें **कोतवालास** खालीं लिहिलेला वृतांत सांगितला. तोह्मणाला;—

युरोप खंडात **हॉलंड** व **फ्रांन्स** असे देश आहेत. तेथील लोकांस फुलांचें वेड इतकें होतें कीं, एकामनुष्यानें **हॅलेम** नांवाचे शहरांत एक फुलझाड इसवी सन १६३६सालांत लाविलें होतें, व त्याचें नांव **सुखदर्शन** असें ठेविलें होतें. त्याचें एक फूल एका गृहस्थानें १३८०० तेराहजारआठशे रुपये व एक नवीन गाडी

दोन घोडे सरंजामासुद्धां देऊन विकत घेतलें. दुसरे एकागृहस्थानें तसेंच फूल ३९००० एकुणचाळीसहजार रुपये देऊन घेतलें. दुसरे एकाजातीचें फूल गुललाला ह्मणून आहे, तें एका मनुष्यानें पांच एकर समचौरस जमीन देऊन घेतलें. एका गृहस्थाचें सालीना उत्पन्न १८०००० एक लक्ष ऐंशी हजार रुपयांचें होतें. त्यानें फुलें विकत घेण्याकडे आपली ती सर्व मालमत्ता खर्चून चार महिन्यांत तो भिकेस लागला. हॉलंड देशांत फुलांचें वेड इतकें पिकलें होतें कीं, नुस्ते एका शहरांत एक वर्षांत फुलांच्या उदिमा पासून तीन कोटी रुपये उत्पन्न झाले होते.

सदरींची चमत्कारिक गोष्ट ऐकून घाशीरामास मोठें आश्चर्य वाटलें व नानासाहेबांस सांगण्या करितां एकाकारकूनाकडून त्यानें तिचें टिपण करविलें. मग त्या दोघां साहेबांस बंगल्यांत आणून कारंज्यावळ खुर्च्यांवर बसविलें आणि फुलांचे हार गजरे व खाना आणण्यास आज्ञा केली. त्यावरून त्याबागेंतील मुख्य माळी संताजी ह्मणून होता, त्याचे एकसारखे स्वरूपाचे व वयाचे दोनमुलगे फुलांचे तुरे घेऊन खान्याचे मेजावर मांडूं लागले, त्यावरून बोलण्यास आरंभ झाला.

स्मिथ—हे दोघे मुलगे अवळे जावळे आहेत वाटतें? यांचीं नावें काय ?

घाशीराम—होय. ह्यांचे आईस तीनवेळ जुळीं मुलेंझा

अनुक्रमणिका

लीं, व यादोघांचीं नावें **भीम** व **अर्जुन** टेविलीं आहेत. आपले देशांत जुळीं मुलें होतात ?

स्मिथ–एकासमयीं दोन मुलें अशींतर बहुत स्त्रियांस होतात; परंतु कधीं कधीं तीन सुद्धां होतात; आणि एखादे समयीं चारपांच पर्यंत सुद्धां झाल्याचे लेख आहेत.

घाशीराम–ज्या स्त्रीस दोहों पेक्षां अधिक मुलें आपले देशांत होत असतील, त्या स्त्रीस दोहोंपेक्षां अधिक मुलें पांजण्याचे अवयव असतील. नाहींबरें ?

जोन्स–तसें नसतें.

घाशीराम–तसें नसतें तर मग दोहोंपेक्षां जास्ती मुलांस एकदांच पाजण्याचें कसें होत असेल ?

जोन्स—असे प्रसंगीं दुसऱ्या बायका त्या मुलांस पाजण्याकरितां नौकर ठेवितात.

घाशीराम–हा **भीम** व **अर्जुन** हे जेव्हां एक सारखीं पागोटीं घालतांत तेव्हां मला सुध्धां त्यांस ओळखण्याची भ्रांति पडते.

स्मिथ—त्यांत आश्चर्य नाहीं; परंतु भीम (अमळसा ठेंगणा आहे, व **अर्जुन** शरीरानें पातळ आहे. अवळेजावळे मुलांत कांहींच भेद नाहीं अशा ही गोष्टी आमचे ग्रंथांत अनेक लिहिलेल्या आहेत. आमच्या देशाची राजधानी **लंडन** शहर येथें मागें दोन जुळे मुलगे बारा वर्षांचेवयाचे आढळत असत. त्यांचे शरिराचे बांधे, तोंडवळे, नाकें, डोळे वगैरे अगदीं एक सारखीं अ

अनुक्रमणिका

सत. त्यांचा विद्याभ्यासही सारखाच झाला होता. फारतरकाय? त्यांची बुद्धि, विचार, आचार हीं देखील एका मेकासारखींच होतीं. आणखीं दुसरे ठिकाणीं दोन जुळे मुलगे **निकोलास** आणि **क्लॉडी** या नावाचे होते. ते लहान असतांना त्यांचा भेद समजण्यासाठीं त्यांचे आईबापांचे सेवकांनीं त्यांचे हातांत निरनिराळे रंगांच्या मनगट्या घातल्या होत्या. ते वयानें जसजसे मोठे होत गेले, तसतशीं त्यांचीं शरिरें मोठीं झालीं तथापि त्यांचे बांध्याचा व तोंडवळ्याचा सारखेपणा तसाच राहिला. त्यांची चालण्याची, बोलण्याची व उभें राहण्याची ढब एकसारखी होती. त्यांचे स्वभाव व अवाज ही समान होते. त्यामुळें जे समयीं ते सारखे पोषाग करीत, तेव्हां **निकोलास** कोणता, व क्लॉडी कोणता, हें त्यांचे आईबापांस सुद्धां ओळखूं येत नव्हतें. ते उभयतां बुदबळें खेळण्यास चांगले शिकले होते. त्यांत क्लॉडी हा सर्वोत्कृष्ठ खेळणारा होता. कोठें **निकोलास** तो खेळ खेळण्यास बसला असतां डाव आपल्या अंगावर येतो असें त्याला वाटलें, म्हणजे कांहीं तरी निमित्य करून तो उठून जाई आणि आपला पोषाख भावास देऊन त्याला डाव संपाविण्यास पाठवी. तेव्हां तो खेळण्याचे ठिकाणीं येऊन भावाचा डाव पुढें चालवून जिंकी; तरी हा दुसरा भाऊ आहे, असें तेथें जमलेले मंडळी पैकीं कोणास ही समजत नसे. पुढें **निकोलास** यानें एका श्रीमंताचे कन्येशीं विवाह करण्याचें बोलणें लावलें. तें तिनें कबू

अनुक्रमणिका

ल केलें. नंतर झॉंडी तिजकडे गेला, आणि त्यानें हीं तसेंच बो लणें लाविलें. ते समयीं प्रथमचे भेटीचा मजकूर त्याचे बोल ण्यांत आला नाहीं. त्यावरून तिनें त्याचें नांव विचारिलें, आ णि त्यानें नांव सांगितल्यावर हा दुसरा भाऊ आहे असें तिला क ळलें. मग तुझे वडील भावास मी वचन देऊन चुकलें, असें तिनें उत्तर केलें, तेव्हां मला क्षमा असावी असें तिशीं बोलून तो निरोप घेऊन परत आला.

इतकें बोलणें झाल्यावर घाशीराम रुप्याची एक डबी का ढून तींत लहानशी हरभऱ्याची एकडाळिंबी होती, ती हातांत घे ऊन जोन्स याला दाखवून बोलूं लागला.

घाशीराम—या डाळिंबीवर काय काम केलें आहे तें पहा. अंबारी सुद्धां हत्ती हीवर काढिला आहे.

जोन्स—हें काम फारच सूक्ष्म आहे. वाहवा! चांगली कारा गिरी केली आहे! हें चित्र कोणी काढिलें?

घाशीराम—कर्नाटक देशचा एक चितारी होता त्यानें हें काढिलें, व त्या बद्दल त्याला श्रीमंतांकडून मोठें बक्षीस मिळालें.

स्मिथ—असे पदार्थ करण्यांत मोठें चातुर्य आहे खरें; परं तु तें तादृश लोकोपयोगी नाहीं. अशा गोष्टींची आमचे ही देशात प्राचीन काळीं मोठी प्रशंसा असे, परंतु आत त्याची ता दृश चहा नाहीं.

जोन्स—इटाली देशांतील एका संतानें आमचे धर्म

पुस्तकांतील बारा भक्तांच्या धर्ममताचें सार व त्या बारां पैकीं से बजान ह्मणून एक साधू झाला होता, त्याचे सुवार्तेचा सारांश तुमचे शिवराई इतके तुकडयावर लिहिला होता.

घाशीराम— आमचे धर्मांत भक्त बारां पेक्षां फारच अधीक सांगितले आहेत. त्यां विषयीं ग्रंथ आहे त्यास **भक्तिविजय** ह्मणतात.

जोन्स—आणखीं आमचे विलायतेंत **इलिझाबेथ** या नांवाची म हाराणी झाली होती. तिला एका कारागिरानें एक कागदाचा तुक डा अंगठीचे नखा एवढा नजर केला होता. त्याजवर आमचे ध र्मांतील दहा आज्ञा व बारा भक्तांच्या धर्ममताचा सारांश व येशूख्रि स्ताचें प्रार्थनास्तोत्र व राणीचें नाव व सन अशीं लिहिलीं होतीं.

घाशीराम—लहान मुलांस पिशाचाची बाधा न व्हावी ह्मणून आमचे लोकांत अशी चाल आहे कीं, **रामरक्षास्तोत्र** एका बारी क तावावर लिहून तो ताव तांब्याचे अथवा रुप्याचे तायतींत घालून ती तायती मुलांचे गळ्यांत बांधितात.

स्मिथ—प्राचीन काळीं ग्रीक लोकांमध्यें **होमर** या नावाचा एक मोठा कवि होऊन गेला. त्यानें तुमचे **वाल्मीकी रामा यणा** प्रमाणें ग्रंथ केला आहे. त्याच्या अतिसूक्ष्म अक्षरानें पातळ कातड्याचे एका तुकडयावर केलेल्या प्रती पुष्कळ लो कांपाशीं असत. ते कातडयाचे तुकडे इतके लहान असत कीं ते अक्रोडाचे कवटींत मावत असत.

जोन्स–एकानें एक गाडी केली होती. तिचा आकार एका गव्हाचे दाण्या एवढा होता. त्यांत एक चालविण्यास गाडीवाला व घोडे व गाडींत एक पुरुष व स्त्री बसलेलीं या प्रमाण होतें.

स्मिथ–हस्तिदंताचे तुकड्याचा एक रथ केला होता. त्यास चार चाकें व चार घोडे होते. तसेंच एक जहाज डोलकाठी वगैरे सुद्धां केलें होतें. तो रथ व जहाज हीं इतकीं लहान होतीं कीं त्यांवर माशी बसली तर तिचे पंखानें तो रथ व जहाज झाकलीं जात असत.

घाशीराम–**नाशिकांत** एका तांबटानें सुईच्या नाकांतून पार जाईल इतकी लहान **गणपतीची** मूर्ति करून **माधवजी शिंद** यांजकडेस आणिली होती, त्यांनीं पाहून त्या कारागिरास पांचहजार रुपये इनाम देऊन ती मूर्ति घेतली.

जोन्स–**लंडन** शहरांत एका लोहारानें लोखंड, पोलाद व पितळ यांचें अकरा तुकड्यांचें एक कुलूप व किल्ली अशीं केलीं होतीं कीं त्या दोहीचें वजन अर्ध गुंज होतें. तसेंच एका सोनारानें सोन्याची साखळी ४३ कड्यांची केली होती, तींत तें कुलूप व किल्ली गुंतवून ती साखळी एका जिवंत पिसूचे गळयांत अडकावीत व ती पिसू त्या ओझ्यास घेऊन चाले. तें कुलूप, किल्ली, साखळी व पिसू सर्व मिळून पाऊण गुंज वजन असे.

२. चेरि ह्मणून बोरा एवढें फळ असतें. त्यांतील बीची

एकानें टोपली केली होती. तींत चौदा जोड फाशांचे केले होते. त्या फाशांवरील टिंबें व अंक दिसत असत.

३. रोमशहरांत एकानें कातीव जिन्नसा दाखविण्यास आणिल्या होत्या, त्यांत सोळाशे तबकडया होत्या. त्यां पैकीं प्रत्येकीची आकृति संपूर्ण होती. परंतु त्या तबकड्या इतक्या लहान होत्या कीं मिऱ्याचा एक दाणा पोखरून त्याची डबी केली होती तींत त्या सोळाशेही तबकडया मात असत.

४. एकानें लोखंडी जातीं केलीं होतीं. तीं आपल्याआप फिरत. तीं इतकीं लहान होतीं कीं त्यां पैकीं कांहीं अंगरख्याचे अस्तनींत घालून सहज नेतां येत व त्या जात्यांनीं आठ मनुष्यांस पुरे इतकें धान्य एका दिवसांत दळलें जाई.

५. साडेतीन तसू औरस चौरस कागदाचे तुकडयावर एकानें ९३४८० अक्षरें लिहिलीं होतीं.

घाशीराम —एका साळ्यानें अडीच मासे रेशमाची इतकी बारीक तार काढिली होती कीं ती दीड कोस लांब गेली; तशीच दुसरे एका साळ्यानें एक साडी तयार केली होती ती एका तायतींत मात असे.

जोन्स — एक यंत्र असें केलेलें आहे कीं त्यानें लोकर इतकी बारीक कातली जाते कीं अर्धशेर लोकर १०५ रुपयांचा माल होते, आणि तिचे धागे ९५ होतात, व त्यांतील एकक

अनुक्रमणिका

धागा ११२० हात लांब असतो. या वरून सर्व धाग्यांची एकंदर लांबी १५ कोश व ८०० हात होते.

२. सन १६१९ इसवी सालांत **जेफरीहडसन** या नांवाचा एक मनुष्य **इंग्लंड** देशांत जन्मला होता. तो आठ नऊ वर्षांचे उमरेचा असतांनां दीडफूट उंच होता. तो तीस वर्षांचा होई पर्यंत तितकाच उंच राहिला. नंतर वाढूं लागला तो तीन फूट उंच होऊन राहिला. तो ६३ वर्षांचा होऊन मरण पावला.

आतां आमचा खाना झाला. थोडका चहा आणावा ह्मणजे पुरे.

घाशीराम —इतक्यांत जेवण झालें काय ? अद्यापि पक्वान्नें यावयाचीं आहेत. आमचे शहरांतील एक तैलंग ब्राह्मण आला तर मेजावरील सर्व पदार्थ नाहींसे करून आणखी सुद्धां मागितल्या वांचून राहणार नाहीं.

स्मिथ —एक तैलंग ब्राह्मण एका बैठकीस किती लाडू खाईल ?

घाशीराम —एका बैठकीस सवाशे लाडू खाणारे आहेत.

जोन्स —सिरीया देशांत एक बाई होती. ती एक दिवसांत तीस कोंबडीं खाई तरी तिचें समाधान होत नसे.

आरीलयन या नांवाचा पादशाह होता. त्याचे रुबरू **फागन** या नांवाच्या एका मनुष्यानें एक सगळा रानडुकर, एक मेंढा, एक गांवठी डुकराचें पोर आणि शंभर रोडगे इतकें खालें आणि तितक्यावर मद्य ही तो बरेंच पुष्कळ प्याला.

क्लांडियस् आल्बिनस् या नांवाचा पादशाह होता. त्यानें एकवेळ प्रातःकाळीं न्याहरीस पांचशे अंजीर, शंभर जांब, दहा खरबुजें व टोपलीभर द्राक्षें खाल्लीं.

स्मिथ– माक्सिमियान या नांवाचा पादशाह होता. तो. खाऊन खाऊन इतका पुष्ट झाला होता, कीं त्याचे बायकोचे हातांतील गोठ त्याचे बोटांस मुद्यां प्रमाणें होत असत.

घाशीराम–आमचे सासरे मोठे पुष्ट आहेत; परंतु त्यांचीं बोटें इतकीं जाड झालीं नाहींत. **भीमसेना** प्रमाणें **माक्सिमियान** असेल असें वाटतें.

जोन्स–वैटेलिअस या नांवाचा पादशाह होता. तो एके दिवशीं आपले भावाचे घरीं मेजवानीस गेला होता. तेथें त्यानें दोनहजार मासे व सातहजार पक्षी भक्षिले.

घाशीराम–आमच्या **भारतांत दुर्वासऋषि** यांस साठखंडी अन्न भोजनास लागत असे असें लिहिलें आहे. तेव्हां त्याप्रमाणें तर तुमचे पादशाह नसतील?

ह्याप्रमाणें बोलणें ऐकून **जोन्स** व **स्मिथ** हे हंसून अन्योक्तीनें बोलिले कीं **कोतवाल साहेबांनीं** आह्मास कुंटित करून हरविलें. आतां निरोप द्यावा असें बोलून ते आपआपले स्थळीं गेले.

गोष्ट ७

श्रावण मासीं बेलबागेंत जन्माष्टमीचा कांहीं दिवस मोठा उत्साह होऊन शेवटच्या रात्रीं लळीत होत असे. त्याची देख रेख घाशीरामा कडे फडणिसांनीं सांगितली होती. तें लळीत करण्यास अनेक जातींचे लोक असत, व पाहण्यास मोठा समुदाय जमत असे. त्या ललितास एक वेळ घाशीराम व त्याचे बरोबर त्याचे हाताखालचा मुख्य जमादार जानराव पोवार असे आले होते. त्यांत घाशीरामाची स्वारी येऊन बसल्यावर सोंगें येण्यास आरंभ झाला. मग अनेक सोंगें येऊन गेल्यावर भाटाचें सोंग आलें. तो भाट सवाई माधवराव व नानाफडणवीस यांची तारिफ करून घाशीरामाचे समोर येऊन त्यास लक्षून खुशामतीनें बोलूं लागला—

हे सरदार आमचे शहरांत असल्या मुळें वाघ व बकरीं एका ठिकाणीं पाणी पिऊं लागलीं आहेत. स्त्रियांनीं कुकर्म करावयाचें सोडिलें. यांचें धारिष्ट इतकें आहे कीं कदाचित् पर्वताचें चलन होईल, परंतु कसाही प्रसंग आला तरी हे कांहीं डगमगायाचे नाहींत.

हें बोलणें ऐकून कोतवाल साहेबानीं उत्तर केलें कीं "तें मेरी खुब पारख करी. तेरेजे साक दरदा मेरे देखनेमे आया नहीं. तेरा सच बचन श्रवण करकें मेरी आत्मासुप्रसन्न भई. मेरे

अनुक्रमणिका

धामकों तू प्रभातकों आवेगा तों तेरेतै शेला पगडी बसीस करूं गा." इतकें बोलणें होतें आहे तों दुसरें सोंग जैन लोकांचे जतीचें आलें. त्यानें आपले तोंडावर फडका बांधिला होता. त्यांत नाकाचीं दोन छिद्रं व डोळे इतकें मात्र खुले होतें. तें सोंग येतांच भाट हा एका बाजूस उभा राहिला आणि जतीची व त्याची बतावणी सुरू झाली.

जती—सर्व लोकांचे उद्धारा करितां श्रीआंबूजी पर्वतावर जैन धर्म प्रगट झाला. तेथें महाप्रभुजी श्रीपारसनाथजी अद्या पि बिराजत आहेत. त्यांचे मंदिरा पेक्षां असमंतात दुसरें स्थळ पवित्र किंवा उंच नाहीं. तेथून पृथ्वीच्या दाहाही दिशा दिसतात. हा आमचा धर्म प्रगट होते समयीं सर्व जातीचे लोक जमले हो ते. त्यांत मराठे, व मुसलमान, व फिरंगी, हे लोक मात्र नव्ह ते. कारण कीं, येतांना वाट चुकून मुसलमान हे मका व म दीना या गांवांकडे गेले; व मराठे हे काशीस व रामेश्वरास अ टकून राहिले; आणि फिरंगी हे कोठे नाहींतसेंझाले. त्यांचा ठिका ण नाहीं. त्यामुळें ह्या तीन जाती अज्ञान दशेंत राहिल्या आहेत.

भाट–खरी गोष्ट आहे खरी गोष्ट. ह्या महापुरुषाचे चरण धरा ह्मणजे तुह्मी नरका पलीकडेस जाल. जतीजी, आपण को णकोणते देश पाहिले आहेत?

जती–या पृथ्वींत तर आह्मी पाहिली नाहीं अशी जागा रा हिली नाहीं.

अनुक्रमणिका

भाट—**काशीविश्वेश्वरास** व **रामेश्वरास** गेलां होतां काय?

जती—तुह्मी त्यांचीं नावें घेतल्यास आह्मी येथें क्षणभर उभे राहणार नाहीं. त्या दोन्हीं वाटा नरकास जावयाच्या आहेत.

भाट—ऐकून घ्याहो, तुह्मी ऐकून घ्या श्रोतेजनहो. **पारस नाथा** वांचून दुसरें दैवत उपयोगीं नाहीं.

जती—अहिंसा अहिंसा हा आमचा मुख्य धर्म असून आह्मा साधुजनांस कोणतेंही स्त्रीस शिवणें नाहीं.

भाट—परस्पर चालतच आहे व पट्ठे आहेतच.

जती—आह्मास सेवकांचे घरोघर दर्शन देण्या करितां फिरावें लागतें, त्या मुळें थकून जातों; यास्तव रात्रीस पाय चेपण्या साठीं एकदोन पोरगे ठेवावे लागतात.

भाट—(मान हलवून)खरीगोष्ठ हो खरीगोष्ट. मला माहित नाहीं. असो या सभेंतील मंडळीस तुह्मी ओळखतां काय?

जती—हे **घाशीराम कोतवाल.** यांचे बापा पासून आह्मास माहिती आहे. हे **जानराव पोवार.** त्यांची तर आह्मी सात पिढ्यांची माहिती सांगूं. यांस आह्मी नागवें उघडें पाहिलें आहे. यांचे सासू बरोबर बहुतवेळ आमचा एकांत होत असतो. यांची बायको **गोपकाबाई.** तिला आह्मी मांडीवर घेऊन तिनें आमचे तोंडांत व आह्मी तिचे तोंडांत विडे घातले आहेत. आणि यांचे खुणेची गोष्ट आह्मास माहित आहे. ती ही कीं, यांचे बायकोचे बेंबी भोंवतीं बिब्याचा बराच मोठा डाग आहे.

या प्रमाणें तो बोलतांच सर्व मंडळी हांसूं लागली, व जान राव पोवाराकडे पाहूं लागली. तेणें करून जमादारास मोठा राग येऊन "तेरेभेनकाजती××"अशी शिवी देऊन तरवार उपसून ते जतीचे आंगावर धांवले. तेव्हां जतीनें किंकाळी मारून तो पळूं लागला. आणि चहूंकडे गलबल होऊन आरडा ओरड झाली. लोक पळूं लागले. धक्काबुक्की होऊन दिवे मालवले गेले. त्या वेळीं घाशीराम घाबरा होऊन गर्दींतून पळूं लागला तेव्हां शेला पायांत घुटमळून तो पालथा पडला. पागोटें उडून गेलें. गुढगे सोलले. तोंड फुटलें. तरी तसाच उठून पळत पळत शुक्रवारचे चावडीवर तो आला, आणि "धांवारे, धावा" ह्मणून त्यानें बोंब मारली. चावडीवर पाहतो तों तेथें एकही शिपाई नाहीं; ते सर्व तमाशा पाहण्यास गेले होते. मग तो तसाच चावडीचे पायरीवर बसला. नंतर बेलबागेंतील गलबल अमळशी कमी झाली, असें पाहून परत हळूं हळूं बेलबागे कडेस येऊं लागला, तों वाटेंत त्याचा रणशिंग्या भेटला. आणि "आह्मी आपणास शोधितों; आपण येथें कोठून आलां? आतां सर्व शांतता झाली; ललीत पुन्हा आरंभणार; लोक आपली वाट पहात आहेत". असें बोलला. त्यावरून घाशीरामानें त्याला शिंग फुंकण्यास सांगून दौड करून ते मोठ्या डौलानें बेलबागेंत शिरले. डोकीस पागोटें नव्हतें त्याचें त्यांस भान राहिलें नाहीं, आणि ललितांत जाऊन बसतात तों भाटाचें सोंग उभें होतें, तें पुढें येऊन बोलूं लागलें--

भाट— आपण इतके श्रम कां घेतले ? व शेला पागोटें को ठें गेलें?

कोतवाल— (किंचित् चपापतो; परंतु पुनः सावरून घेऊन ह्मणतो) सरकारचे सेवेंत प्राण गेला तरी चिंता नाहीं, असा अमचा निर्धार मुळा पासून आहे. यास्तव गर्दी मोडण्यांत कदाचित मेलों तर तुला देऊं केलेलें बक्षीस राहील, ह्मणून तुजकडेस घाईनें शेला पागोटें टाकून मी तरवार शोधण्यास गेलों होतों.

भाट —महाराज, बक्षीस भरून पावलों; परंतु गर्दी कशाची? तो जती ज्ञानबा पोवाराचा सासरा; आपला इजन्या बाळोजी सितोळ्या आपणास ओळखला नाहीं का? तोच तो जती. सासऱ्याची व जावयाची ती गर्दी कसली ? आह्मीं जमादारास तेव्हांच आवरलें, आणि आपला शेला व पागोटें एक चोरटा बगलेंत मारून पळून जात होता, त्याला धरून चावडी कडे रवाना केलें आहे. हें भाषण ऐकून घाशीरामाला मनांत मोठी लाज वाटली, व फुटलेलें ढोपरांस व तोंडास ही कळ लागली होती, त्यामुळें आतां आह्मास गस्तीस फिरावयास गेलें पाहिजे, असें निमित्य करून तो त्ठिकाणातून उठून गेला.

गोष्ट ८

घाशीरामाची मातोश्री वृद्ध होऊन मरण पावली, तेव्हां चाली प्रमाणें तिचें दहन झाल्या नंतर त्यानें स्वदेशीय एक पंडित बोलावून त्याकडून गरुड पुराण ऐकण्यास आरंभ केला. पंडितजींनीं पुराण वाचून अर्थ सांगितला. त्यांत असें लिहिलें होतें कीं, प्रेताचा दाह शमन होण्या करितां व त्यास नवीन देह प्राप्त होण्या करितां नऊ दिवस नित्य उदक द्यावें, आणि एक पिंड द्यावा. दाहावे दिवशीं प्रेतास अर्धांगुष्ट प्रमाण लिंगदेह उत्पन्न होतो, तेव्हां त्यास क्षुधा व तृषा पिडूं लागतात, यास्तव त्या दिवशीं दशपिंडी करावी. पुढें एकादशाह द्वादशाह व त्रयोदशाह अशीं श्राद्धें करावीं. मासिकें व वर्षश्राद्ध हीं करावीं. प्रेतास **यमधर्मा**कडेस गमन करितांना वाटेंत कष्ट न पडावे ह्मणून श्राद्धाचे समयीं मुख्यत्वें गाई, बिछाना, चर्मीजोडा, छत्र्या, पंखे, कुंभ, उसाची नाव व दीपदानें द्यावीं. वृषोत्सर्ग करावा. तसें न केल्यास प्रेतास पिशाचयोनी प्राप्त होते. त्या योनीस मोक्ष नाहीं. त्या योनींत त्यास सर्व काळ तृषेनें पिडून फार यातना होते. कारण त्यांचें घशाचें छिद्र सुईचें अग्रा प्रमाणें बारीक असतें, व पिंपळाचे पानांवरून जे पर्जन्याचे अथवा दहिवराचे बिंदु पडतात, ते जमिनी वर पोंचण्या पूर्वी झेलल्यास ते मात्र पिशाचास प्यावयास मिळतात; दुसरे सर्व उद

काचे ठिकाणीं वरुण यानें आपले दूत ठेवून भुतांस जल प्राश न करण्याची बंदी केलेली आहे; त्या मुळें पिंपळाचे झाडावर सर्व काळ पिशाचांचा वास असतो. ह्या प्रमाणें पंडितजी यांनीं विवरण करून अर्थ सांगितला. नंतर **घाशीराम** यांनीं पंडितजी यांस एकांतीं नेऊन त्यांशीं संभाषण केलें; तें—

घाशीराम —आतां मी मातोश्रीचें सार्थक यथास्थित करीन. आपण आज्ञा कराल, त्याचे दुप्पट दानें करीन. माझे तीर्थरूप वारले, तेव्हां मला कोणीं गरुडपुराणांतील या कांहींच गोष्टी सांगितल्या नाहींत, यास्तव त्यांचे वाटेची कांहींच सामग्री मीं दिली नाहीं. आतां काय करूं ? त्यांनां पिशाचयोनींतील बहुत पीडा होत असेल.

पंडतजी—आपण खेद करूं नये; त्याची तजवीज मला ठाऊक आहे.

घाशीराम— सांगा तर महाराज, सांगा. मी आपला दास होऊन आपल्या आज्ञेप्रमाणें वर्तेन.

पंडतजी—– आपले तीर्थरूपांचे मृत्यूस जितकीं वर्षे झालीं असतील, तितके कुंभ तयार करवावे; त्यांत एक कुंभ चांदीचा व बाकीचे सारे तांब्याचे असावे. ज्या दिवसीं त्यांची क्षयतिथि येईल, त्यादिवसीं श्राध्द करून त्यासर्व घटांत दूध भरून तें कनोज्या जातीचे ब्रांम्हणास द्यावें. म्हणजे तीर्थरूपांच्या सर्व यातना दूर होऊन त्यांस मोक्षाची प्राप्ती होईल.

अनुक्रमणिका

घाशीराम—तीर्थरूपांचे मृत्यूस बारावर्षे झालीं आहेत. तेव्हां बारा कुंभ करावे लागतील. त्या सर्व कुंभांतील दूध त्यांस कोण पोहचवील?

पंडतजी—ब्रांम्हणद्वारा तें दूध **वरुणास** पोंहचेल, **वरुणा**पासून श्री**कृष्ण**जीस पावेल. त्यां पासून **सुर्यनारायणास** पावेल, व तेथून तीर्थरूपांचे हातीं जाईल.

घाशीराम—इतकें दूर जातानां दूध नासणार नाहीं काय? व एकदांच बारामण दूध प्याल्यामुळें तीर्थरूपांस कदाचित् मोडसी झाली तर पुढे काय करावें?

पंडतजी— मंत्राच्या जोरानें दूध नासणार नाहीं, आणि आपले तीर्थरूपांबराबर आपले दुसरे पितर असतीलच; यामुळें तीर्थरूपांस स्वतः दुधाचा अंश बहुत थोडा मिळेल.

घाशीराम—बहुत उत्तम; मातोश्रीचा त्रयोदशाह ज्यादिवशीं होतो, त्याच्या दुसरे दिवशीं तीर्थ रूपांचा वर्ष दिवस आहे, यास्तव आपण चांदीचा घट ग्रहण करण्यास आलें पाहिजे, आणि दुसरे अकरा आपल्या जातीचे ब्रांह्मण मिळवून आणावे.

पंडतजी—मीं असें दान कधींही घेतलें नाहीं व घेणारही नाहीं; कारण असें दान घेतल्यानें प्रेताचें सर्व पातक दान घेणाराचे मस्तकीं येतें.

घाशीराम—नाहीं महाराज, आपण असें वचन कां बोल

अनुक्रमणिका

तां? आपण ईश्वर सेवेंत मग्न आहां, आपणास भय कशाचें? मज करितां एवढे श्रम घेतलेच पाहिजेत.

पंडतजी —आपल्या आग्रहास्तव मी कबूल करतों; परंतु अशा दानाचा प्रतिग्रह केल्यावर मला व माझ्या बरोबरच्या ब्राह्मणाला प्रायश्चित्त करावें लागेल. त्या प्रायश्चितास बहुत खर्च लागतो.

घाशीराम —प्रत्येकास किती खर्च लागेल.?

पंडतजी —कनिष्ठ पक्ष सवाशे शिका रुपये खर्च लागेल.

घाशीराम —कांहीं चिंता नाहीं, एका कुंभास मी सवाशे रुपये दक्षिणा देईन ह्मणजे झालें.

या प्रमाणें एकांत झाल्या नंतर **पंडतजी** आपले घरीं गेले. नंतर **घाशीराम** यानें रुप्याचा एक कुंभ व अकरा तांब्याचे कुंभ तयार करविले. बापाचे क्षयतिथीचे दिवशीं पंडतजींस बोलावूं पाठविलें. तेव्हां पंडतजी त्यांचा वडील भाऊ, तसेच त्यांचे चुलत भाऊ, त्यांचे दोघे भाचे, व त्यांची मण्यारीण जा तीची एक परदेशीण ठेविलेली राख होती, तिचे पोटचे दोघे मुलगे, व तिचा बाप व दोघे भाऊ, व तसेच पंडतजीचे बंधूनें ठेविलेले कुंभारणीच्या पोटचा एक मुलगा ह्या सर्वांचे कपाळांस आपल्या प्रमाणें विभूति व चंदनाचे टिळे लावून त्या अकराजणा स घेऊन कोतवालाचे घरीं आले; आणि रुप्याचा कुंभ व तांब्या चे कुंभ दक्षणे सहित दान घेऊन, क्षीर पुरीचें यथास्थित भोजन करून व विडे खाऊन घरीं गेले. नंतर मण्यारिणीच्या व कुंभा

रणीच्या पोरांचे टिळे पुसून त्यांचे डोकीस फडकीं बांधून त्यां कडून बारा कुंभांतील दूध दुसरे पात्रांत घालून बाजारांत विकविलें. दोन तीन दिवसां नंतर पंडितजी आपलें वपन करवून कोतवालाचे भेटीस गेले. तेव्हां इकडील तिकडील गोष्टी झाल्यावर कोतवालानें पंडितजींचा हात धरून आंतील खोलींत नेलें. तेथें बोलणें झालें तें येणें प्रमाणें –

घाशीराम —पंडतजी, आपल्यास मोठें प्रायश्चित करावें लागलें खरें; परंतु आपले प्रतापानें आमचे पित्याची सुटका नरक योनींतून झाली.

पंडतजी —होय, झाली खरी; परंतु एक थोडकी गोष्ट राहिली आहे, ती बद्दल गेल्या रात्रीस आह्मास दृष्टांत झाला. तो कळवण्या करतां मी आज आपणाकडे आलों आहें.

घाशीराम—कोणती गोष्ट राहिली, व दृष्टांत काय झाला?

पंडतजी—दृष्टांत असा झाला कीं, आज पर्यंत सर्व यथास्थित झालें, परंतु मातापित्यां करितां अन्न पाण्याची कांहींच योजना अद्यापि झाली नाहीं.

घाशीराम—त्या विषयीं काय योजना करण्या सारखी आहे? माझें वेतन सरकारांतून अल्प आहे खरें; तरी आपले कृपे करून खर्च करण्यास कांहीं तोटा नाहीं.

पंडतजी—आतां असें करावें कीं, नित्य पडांटेस दोन सिधे व दोन मातीच्या घागरी निर्मळ पाण्यानें भरलेल्या असें एक प

वित्र ब्राह्मण जातीचे दंपत्याची पूजा करून त्यास द्यावें, ह्मण जे मातापित्यांस सर्व पोहोंचेल.

घाशीराम--आपण एक दंदय शोधून उद्यांपासून आमचे घरीं पाठवीत जावें.

उत्तम आहे असें ह्मणून व कोतवाल यास आशीर्वाद देऊन पंडतजी घरीं आले. घरांत लग्नाची कोणाचीच बायको नव्ह ती. तेव्हां आपला वडीलभाऊ व त्यानें राखलेली कुंभारीण हें द पत्य कोतवालाकडे पाठवण्याची योजना केली. त्यावरून ते बं धू व त्याची प्रिया ती कुंभारीण हीं **घाशीरामा**चे घरीं सिधे व कुंभ घ्यावयास जात. तिकडे जातांना कुंभारीण ब्राह्मणी प्रमा णें पेहराव वगैरे करीत असे. घरीं आल्यावर कुंभारीण ते घ ट विकून त्यांचा पैसा करी, त्यांचे आलेले शिदे व मिळालेली दक्ष णा यांवर पंडितजी व त्यांचे बंधू यांचा निर्वाह दुसरे उत्पन्न वां चून चांगले रीतीनें चालूं लागला. कधीं कधीं तिथि पर्वणीस पंडितजी स्वतः **घाशीराम** याकडे जात असत. असें पांच स हा महिने चाललें. एके दिवशीं कोतवाल यांनीं पंडितजी या स बोलावून नेऊन एकांतीं बसून त्यांशीं संभाषण केलें, तें.--

घाशीराम--पंडितजी, पूर्वरात्रीस माता पिता स्वप्नांत येऊन उदक, उदक, उदक, असें शद्ब बोललीं, याचा अर्थ काय?

पंडतजी--आज तीन दिवस झाले आपले घरून जेघट मिळाले, ते तिन्ही फारच कच्चे होते, यामुळें ते दंपत्याचे घरीं पोहचण्या

पूर्वींच फुटून गेले, यास्तव तीन दिवस माता पित्यांस उदक पोहचण्यास हरकत झाली. हीगोष्ट आपणास निवेदन करण्याची मला शंका आली म्हणून मी आपणास श्रुत करण्यास आलों नाहीं.

घाशीराम–पंडतजी, यांत भीडभाड कशाची? आपण मजपाशीं कांहीं पडदा राखूंनये, उदक धारणार्थ दुसरी कांहीं योजना करूं.

पंडतजी– चिनई मातीचे पांढरे रंगाचे कुंभ मिळतात ते आणवून दंपत्यास नित्य द्यावे, व दर्शीचे दिवशीं एक तांब्याचा हंडा भरून द्यावा, तेणेकरून असें होईल कीं, कदाचित मातीचा कुंभ कांहीं कारणानें फुटला तरी हंड्यातील पाण्यानें पितरांची तृषा निवारण होईल.

हें ऐकून कोतवाल यांनीं, उत्तम आहे, असें बोलून पंडितजी यांस निरोप दिला. नंतर चिनाईकुंभ आणून देऊं लागले, व महिन्याच्या अंतीं एक तांब्याचा हंडा देत. पंडितजी याचे बंधू जे चिनाईकुंभ आणीत, ते पंडितजीचे राखेचीं मणियार पणाचीं दुकानें होतीं, त्या दुकानीं नेऊन विकायास ठेवीत. त्यामुळें घाशीराम याचे सेवकांस दुसरे ठिकाणीं तसे कुंभ न मिळाले ह्मणजे त्यांच दुकानांतून ते ते पुनः विकत नेत. या प्रमाणें पंडितजी व त्याचे बंधू व राखी यांचा रोजगार बराच पिकला. पुढें तो रोजगार कधीं बंद झाला, त्याचा शोध वाचणारानें मर्जी असल्यास करावा.

अनुक्रमणिका

गोष्ट ९.

घाशीराम याला किमयाचा मोठा नाद होता. त्यामुळें कोणी किमयागार किंवा रसायन वैद्य किंवा अवलिया यांची त्यास बातमी लागली ह्मणजे त्यांकडेस त्यानें जावें, त्यांस आपल्या घरीं बोलवावें, व त्यांचे हातून अनेक प्रकारच्या कृति करवाव्या. असे नादांत शेकडों रुपये त्यानें नाशिले, अशी त्याची प्रख्याति झाली होती. त्या संधीस एक ब्राह्मण भांबुरड्याच्या वाडींत येऊन राहिला होता. त्यानें आपल्या जटा व नखें वाढविलीं होतीं, व सर्व अंगास तो विभूती फांशीत असे. त्याचें नांव **व्याघांबरीबावा** ह्मणून असे. त्या बरोबर दोन शिष्य होते, ते गांवांत जाऊन भिक्षा मागून आणून ब्रह्मचारी बावांस खाऊं घालीत. बावा हे नित्य डोळे झांकून एका पिंपळाचे पारावर वाघाचे कातड्यावर बसून माळा फिरवीत असत. कोणीं अधेला पैसा पुढें टाकिला, तर त्याकडे पाहत सुद्धां नसत, आणि समाधि पुरी झाल्या नंतर डोळे उघडल्यावर पुढें पैसे, फुलें पानें, किंवा फळें वगैरे कांहीं पडलें असल्यास तें सर्व पारा खालीं लातेनें उडवून देईत. व तें पोरें बाळें उचलून नेत, हा प्रकार पाहून अवळपासचे लोकांची भक्ति बावांवर अधिकाधिक बसत चालली. त्या पुढें नित्य बराच खुर्दा जमूं लागला. त्यांपुढें कांहीं ठेविलें असतां ते घेत नाहींत असें समजून त्यांचे

अनुक्रमणिका

शिष्यांपाशीं सिदा व इतर पदार्थ लोक देऊं लागले; व बावाजी रात्रौ पूजा झाल्यावर भोजन करीत त्यावेळेस कांहीं मंडळी प्रसादास येऊं लागली. देवपूजा समाप्त झाल्यावर आरती नंतर देवापुढें पानांचा विडा बावा ठेवीत. त्यावर कडेोर्ळींतून काढून कधीं पुतळी, कधीं मोहोर, अशी ठेवित असत, तें पाहून लोकांस आश्चर्य वाटे. एके दिवशीं एकानें अर्धमण बासुंदी, कणीक, व तूप असें शिष्यांपाशीं आणून दिलें होतें. त्यावरून बावांचें भोजन ते दिवशीं बासुंदी पुरींचें यथास्थित झाल्यानंतर प्रसादास आलेले मंडळी समोर शिष्यांस त्यांनीं विचारिलें कीं, आज बासुंदी कोठून मिळविली? तेव्हां देणारा प्रसाद घेण्यास आलाच होता, त्याकडे एका शिष्यानें बोट दाखवून ह्या गृहस्थानें बासुंदी व पुऱ्याचें साहित्य आणून दिलें ह्मणून सांगितलें. त्यावरून बावा यांस मोठा संताप येऊन वेगानें उठून आपले धुणींतील जळकें कोलीत घेऊन त्यांनीं शिष्यावर फेकलें, तें त्यास लागलें नाहीं. आतां माझें सर्व शरीर विटाळलें; पोटांत गेलेले सर्व पदार्थ बाहेर काढून टाकल्या वाचून परिणाम नाहीं; तर आतां पोट फाडलें पाहिजे; असें ह्मणून, स्वयंपाकाचे जागेवर सुरी पडली होती, ती घेण्यास बावा धावले. तेव्हां दोघे शिष्य त्यांचे हात धरून क्षमा गुरुजी क्षमा असें ह्मणून प्रसादास आलेल्या मंडळीस "अवराहो अवरा, नाहींतर अनर्थ होईल" असें घाबरून बोलूं लागले. त्यावरून ती मंडळी उठून कोणीं बावाजीचे पा

अनुक्रमणिका

य धरिले; कोणीं साष्टांग नमस्कार घातले; कोणीं डोळ्यांतून अ श्रुपात काढून विनवूं लागले. तेव्हां बावाजींनीं मूर्छा आल्या प्रमाणें करून जमीनीवर आंग टाकिलें. नंतर दोघा शिष्यांनीं त्याला उचलून त्याचे घोंगडीवर निजविलें, आणि पंख्यांनीं वा रा घालण्यास आरंभ केला. व मंडळीस निरोप दिला. हें सर्व वर्तमान चावडी वरील चपराशी यांचे द्वारें **घाशीरामास** क ळलें. त्यावरून तो दुसरे दिवशीं प्रातःकाळीं बावाजीचे भेटी स आला. तेव्हां बावाजी पिंपळाचे पारावर समाधिस्थ बसले होते. त्यां पुढें कोतवाल क्षणभर उभा राहिला. त्याचे स्वा रीचे घोडे हिसले तरी बावाजींनीं नेत्र उघडले नाहींत. मग कोतवाल यानें शिंग फुकण्यास सांगितलें. तरी बावाजीचें आ सन डगमगलें नाहीं. त्यावरून कोतवाल परत जाऊं लागले, तेव्हां शिष्यांपैकीं एकजण त्याचे घोड्या पाशीं येऊन म्हणाला, कीं स्वामींची समाधि दोनप्रहर पर्यंत पुरी होत नसते. यास्तव आपणास भेटणें असलें तर संध्याकाळचे समयीं स्वारी आल्यास निवातपणीं गांठ पडेल. हें ऐकून घेऊन दुसरे दिवशीं सं ध्याकाळीं बावाजींचे बिऱ्हाडास **घाशीराम** आला; तेव्हां बा वाजी हे व्याघ्रांबरावर बसले आहेत, पुढें धुनी जळत आहे, आ णि हातांत गीतेचा अध्याय आहे, असें त्यानें पाहिलें. **घाशीराम** येऊन पुढें बसला. त्याकडेस बावाजी यांनी प्रथम पाहिलें न पाहिलें असें केलें. नंतर हे कोतवालसाहेब आले आहेत, असें

कोणीं बसलेले मंडळी पैकीं बोलला, तेव्हां बावाजी घाशीराम याजकडेस पाहून "आयुष्यमान्भव" असा आशीर्वाद देऊन "सत्यवचन लीनता परस्त्री माते समान; उसे हर न मिले तो तुलसी दास जमान" ह्या प्रमाणें दोहरा म्हणून पुन्हां गीता पाहूं लागले. कोतवाल अर्धीघटका बसून बावाजींची निस्पृहता व निर्लोभपणा व विद्वत्ता पाहून हा कोणी महापुरुष आहे असें मानून, नमस्कार करून गेला. दोनतीन दिवसांनीं पुन्हां घाशीराम आला त्या वेळेस बावाजीशीं त्याचें बोलणें झालें, तें येणें प्रमाणें—

घाशीराम आपले उच्छिष्टाचा लाभ व्हावा अशी इच्छा आहे, तर एकदिवस घरीं स्वारी यावी.

बावा—आह्मी आजवर पृथ्वीवर पर्यटण करीत आलों, त्यास नव्वद वर्षें होत आलीं. कधीं कोणते शहरचे शिवेंत आह्मी पाय ठेविला नाहीं. आणि पुणें शहरांत तर कधींच यावयाचें नाहीं. आणखी दोनतीन दिवसांत द्वारकेकडेस जाण्याकरितां कोंकणांत जाण्याचा विचार आहे. यास्तव आपले मनोरथ आमच्यानें पूर्ण करवत नाहींत.

कोतवाल —पर्वतीस, अगर वाकड्याचे बागेंत, अगर वानवडीस बेत करितों.

बावा —नको, नको, तेथें ही पराम घेणें नीट नाहीं.

कोतवाल —(अमळ विचार करून)कोथरूडचे बागेंत नियम ठरवावा?

बावा –ती बाग इकडून किती दूर आहे, तेथें किती व स्ती आहे? व सरकारच्या चौकी पहाऱ्याचा कसा बंदोबस्त आहे?

कोतवाल –**कोथरूड** इकडून दोन कोसांवर आहे. तेथें पांच पंचवीस कुळब्यांचीं घरें आहेत. व सरकारचें अनुष्ठान आहे. चौकी पाहऱ्यास दहा पांच चप्राशी असतात. ते उं च वर्णाचे ह्मणजे ब्राह्मणच आहेत.

बावा –जागा दुसरे ठिकाणा पेक्षां निर्मळ दिसते. आप ली मर्जी असल्यास तेथें प्रसादाचा बेत ठेवावा.

कोतवाल –उदईक त्याना पाठवून देतों.

बावा –हें दुश्चिन्ह! अघोर नरकांत जावयाचें हें वाहन आ ह्मास कशास पाहिजे? घोडे त्याने पूर्वाश्रमीं बरेच होते. त्यांची हौंस असती तर घर दार व संसार यांचा त्याग केला नसता.

कोतवाल –मग मर्जी प्रमाणें करावें. उदईक केव्हां कोणते वेळीं स्वारी येईल?

बावा —दिवसा तर अन्नास शिवत नाहीं. अस्तमाना नं तरचा बेत ठेवावा.

कोतवालानें बरें आहे, असें ह्मणून निरोप घेतला.

दुसरे दिवशीं बावा हे आपलें सर्व बिऱ्हाड घेऊन **कोथरूडा** स **अस्तमान**चे सुमारास गेले. तेथें संकेता प्रमाणें **घाशीराम** आला होता, व सर्व तयारी झाली होती. बावांची स्नान संध्या अटोपल्या नंतर आरतीस **घाशीराम** याला देवघरांत बोलाविलें.

तेथें बावा व त्यांचा एक शिष्या व घाशीराम असे तिघेच हो ते. आरती झाल्यावर वैश्वदेवाकरितां विस्तव तांब्याचे भांड्यांत आणून त्या विस्तवावर एक लहानशी पंती ठेवून तींत तूप घात लें. तें तापून जळण्याचा समय आला, तेव्हां शिष्यापासून एक तांब्याचा पैसा मागितला. त्याची पूजा करून त्यासकांहीं लाविल्या सारखें करून तो पैसा पंतींत टाकिला. त्या बरोबर पंतींतील तूप पेटून ज्वाळा निघाली, आणि तें जळून गेलें. नंतर पंती आग्नींतून काढून भूमीवर उपडी घातली, तिजवर शिष्यानें पाणी घालून उलथी केली. तिचे पोटास सोन्याची पुतळी चिकटलेली होती. ती शिष्यानें काढून स्वच्छ धुऊन बावाचे हातांत दिली· त्यांनीं ती आपले कंबरेस लाविली. नंतर वैश्वदेव करून पानांचा विडा देवापुढें ठेविला, आणि "सुवर्ण पुष्पदक्षिणां समर्पयामि" असा मंत्र ह्मणून कंबरेची पुतळी काढून विड्यावर ठेवून पाणी सोडून प्रसादास उठले. भोजन झाल्यावर बावाचे शिष्यां पैकीं एकानें ती पुतळी घेऊन पाक शाळेंत जाऊन तेथें आचारी व दुसरे खटपटी ब्राह्मण होते, त्यांजला पुतळी देऊन, बावाजी हे परान्नप्रतिग्रह प्रायः करीत नाहींत, कधीं प्रसंगच आला तर त्याचा बद्दला दिल्यावांचून रहात नाहींत, यास्तव ही पुतळी सर्व वाटून घ्या, असें सांगितलें. बावा हे तांबूल खात देवापुढें बसले आहेत, इतक्यांत कांहीं कामाची व्यवस्था सांगण्या साठीं कोतवाल स्वयंपाक घराचे दारापाशीं गेला.

तेव्हां आचारी यांनीं बावाचे शिष्यानें पुतळी दिल्याचा मजकूर त्यास सांगितला. त्या वरून बावास किमया साध्य आहे, अशी त्यांची खातरी होऊन बावापाशीं तो परत आला. नंतर बावा बरोबर त्याचें भाषण झालें, तें--

घाशीराम --आतां रात्र झाली आहे. भांबुरड्यास जाण्याचें करूं नये- रातचीरात येथेंच राहून प्रातः काळीं कसें करावयाचें तें पाहतां येईल.

बावा --हें स्थळ फार पवित्र दिसत आहे, बरें आज शुद्ध नवमी झाली. वद्य प्रतीपदेस कोकणांत जाण्याचा मुहुर्त आहे, यास्तव येथेंच पांच सहा दिवस राहून परभारें निघून जाऊं. पुण्याकडेस पुनः जाणें नको.

घाशीराम-- असो आपण मघां तांब्याचा पैसा टाकून सोन्याची पुतळी अग्नींतून काढिली तो प्रकार कसा काय आहे!

बावा--विष्णवेनमः विष्णवेनमः. तो सांगण्यास स्वामींची आज्ञा नाहीं.

घाशीराम--मी आपला शिष्या होतों. मग तर अनुग्रह करण्यास चिंता नाहीं!

बावा--खरी गोष्ट, परंतु तोप्रयोग शिकण्यास ब्रह्मचर्य व्रत असलें पाहिजे, नुस्तें तोंडाचे ब्रह्मचारी म्हणून उपयोगी नाहीं. आपल्यास संसार त्याग करितां येत नाहीं. तसेंच ती कृति शिकण्यास एक वर्ष लागतें.

अनुक्रमणिका

घाशीराम–आमच्यानें ब्रह्मचर्य व्रत घडावयाचें नाहीं, परंतु आपण येथून निघण्यापूर्वीं आपले तपाचें फळ आह्मास प्राप्त होईल असें करावें.

बावा–तांब्र शुद्ध करून त्याचें सुवर्ण करण्यास पांच दिवस लागतात. त्यांत चार दिवस तांब्याचे शुद्धीकडेस जातात. त्या चार दिवसांत ब्रह्मचारी नाहींत असे मनुष्यांचा शब्द सुद्धां आमचे कानीं पडतां उपयोगीं नाहीं. तेव्हां इतका पक्का बंदोबस्त येथें कोठून राहवयाचा आहे!

कोतवाल–मी येथें पाहिजे तसा बंदोबस्त करून देतों. बागे सभोंवतीं कनाथ बांधून आंत वारा नशिरेल असें करतों, आणि कनाथी बाहेरून आठ दहा इतके वर्षांचीं पोरें हातीं गोफणी देऊन बसवितों. त्यापोरां खेरीज दुसरे कोणीं कनाथी जवळ जाऊं नये, अशी गांवांत ताकीद देतों, मग तर अडचण राहिली नाहीं!

बावा–हें खरें, परंतु आतां अवधी राहिली नाहीं, आमचा निघण्याचा मुहूर्त समीप आला.

घाशीराम–अजून सात दिवस राहिले आहेत, तर पांच दिवसांचे कृत्य तेव्हांच अटपून जाईल.

बावा–आपण त्वरा कराल तर होईल. आपल्यास यादी करून देतों, त्याप्रमाणें दोन दिवसांत साहित्य आणून द्यावें; व एक मातीचें कुंड करावें लागेल आणि आमचे हातची यादी दुसऱ्या कोणाचे दृष्टीस नपडे असें झालें पाहिजे.

बावाचें बोलणें ऐकून **घाशीरामानें** बरें आहे, यादीद्यावी, असे म्हटलें. त्यावरून **व्याघ्रांबरीबावानीं** पोथी काढून तींतून यादी उतरून दिली, तींत पांचपन्नास वस्तू लिहिल्या होत्या, त्यांत तांब्याच्या विटा व दर मण तांब्यास बावनकशी सोन्याची मृत्तिका अकरा मासे अशी यत्ता लिहिली होती. ती यादी **घाशीराम** घेऊन बावांस नमस्कार करून **पुण्यास** आले. दुसरे दिवशीं फरास पाठवून बागे सभवत्या कनाथा लाविल्या, व गंवड्याचे हातानें कुंड बांधविलें; व दुसरे दिवशीं यादींत लिहिल्याप्रमाणें साहित्य पोहचतें केलें. यांत पांचशें मण तांबें व त्याच्या मानानें सोन्याचा चुरा पांच डबे भरून पाठविला. त्यानंतर संध्याकाळीं कोतवाल **कोथरूडास** येऊन बावांस भेटले, तेव्हां बावानीं सांगितलें कीं, उदईक आरंभ करितों, आपण बाहेरील बंदोबस्त पक्का ठेवावा, वद्य प्रतिपदे पर्यंत कोणीं कनाथींत येऊं नये, वद्य प्रतिपदेस आपण दोनघटका दिवस राहिल्याचे संधीस यावें, ह्मणजे आपले स्वाधीन सर्व करून आह्मी मार्गस्थ होऊं, आमचाही मुहूर्त साधेल. तें ऐकून कोतवाल यांनीं बरें आहे ह्मणून उत्तर देऊन बागेंतील सर्व माळी वगैरे काढून दिले, आणि कनाथी बाहेर पांच चार पोरें रखवालीस ठेवून ते आपण **पुण्यास** आले. बागेंत **व्याघ्रांबरीबावा** व त्यांचे दोनशिष्य राहिले. नंतर संकेता प्रमाणें वद्य प्रतीपदेचे दिवशीं **घाशीराम कोथरूडास** जाऊन बागेचे दरवाज्या पाशीं उभे राहिले; परंतु कनाथीचें दार उघडलेलें नाहीं, मग त्यांनीं दोन घट

का वाट पाहिली, इतक्यांत अस्तमान झाला, नंतर कनाथी बाहेर ठेविलेले पोरांपैकीं एकास आंत उतरून बावा काय करितात, तें हळूच पाहून ये ह्मणून सांगितलें, तो पोरगा आंत जाऊन मोठ्यानें हांक मारून ह्मणूं लागला कीं याहो या, आंत कोणी नाहीं. हे शब्द ऐकतांच **घाशीराम** याचें हृदय फाटलें आणि तोंड उतरून गेलें. नंतर कनाथी उघडून आंत जाऊन पाहतात तों कुंडांत राखेचा ढीग व त्यांत तांब्याच्या बिटा पिंवळ्या रंगलेल्या इतकें सांपडलें. सोन्याचा चुरा अजमासें नऊ हजारांचे किंमतीचा होता, तो कांहीं सांपडला नाहीं; त्या नंतर **घाशीरामानें** चहूंकडे स्वार शिपाई पाठवून शोध केला, परंतु **व्याघांबरीबावा** व त्यांचे शिष्ये हातीं लागले नाहींत.


गोष्ट १०

घाशिराम याला एका मुशाफरानें **आग्रा** शहर कसें वसलें तें व त्याची हकीकत हीं सांगितलीं. तो ह्मणाला दिलीचा पादशाह **आकब्बर** याला झालेले सर्व पुत्र लहान पणांतच मरण पावले, त्यावरून **अजमीर** येथें **मीर माइनूद्दिनचीस्ति** यांचा दर्गा आहे त्याचे दर्शनास जाण्याचा विचार करून, तें ठिकाण

अनुक्रमणिका

दिल्लीहून अजमासें पावणेदोनशें कोस दूर आहे, तरी पाद शाह व त्यांची राणी हीं तेथपर्यंत पायांनें चालत गेलीं. तेथें पोहचल्यावर सांईची प्रार्थना केली, त्या नंतर भोजन करून निजले. तेथें साई यांनीं त्यांचे स्वप्नांतयेऊन सांगितलें, कीं फतेपुर शिकरी येथें टेंकडीवर शेक सालम ह्मणून एकवृद्ध तपस्वी आहे, त्या पाशीं जाऊन मागणें मागांवें. त्या प्रमाणें अकब्बर पादशाह राणीसहित तेथें गेला, तेव्हां साईनें आशीर्वाद दिला, कीं हलीं राणी गरोदर आहे तीस मुलगा होईल व तो चिरंजीव राहील. त्यावरून अकब्बर यांनीं साईंचे तक्या नजीक जागा बांधून राणीस प्रसूत होई पर्यंत तेथेंच ठेविलें. मास पुरे झाल्यावर सन १५८९ इसवी सालांत राणी प्रसूत होऊन मुलगा झाला, त्याला साईंचेनाव मिरजा सालीम हें ठेविलें. तो मुलगा पुढें हिंदुस्थानचा पादशाहा झाला, तो जहांगीर नामें प्रख्यात आहे. हा मुलगा झाल्यावर साईंची सेवा घडावी व त्याची कृपादृष्टी आपल्यावर सदोदित राहावी या इच्छेनें अकब्बर पादशाहानें त्या शिकरीचे टेंकडीवर आपल्यास राहण्यास महाल बांधिला व दिवाण दरबारचे लोकांस रहावया करितां व सरकारी कारखान्या करितां इमारती बांधिल्या, आणि शेवटीं टेकडी सभवतां कोट बांधावा असा निश्चय केला, तेव्हां साइ यांनीं पादशाहास सागितलें कीं, तुमचे दरबारचा गोंगाट गडबडाट आमच्यानें ऐकवत नाहीं, आमचे बं

अनुक्रमणिका



THE TAJ MAHAL आग्र्याचा ताजमहाल.

दर्गावर तुमचा विश्वास असल्यास तुह्मी इकडून निघावें, नाहीं तर आह्मास इकडून जावें लागेल. त्यावरून पादशहानें आपण जाण्याचे कबूल केलें. आग्रा हें गांव तुह्मास राहण्यास योग्य आहे, असें शेख सालीम यांनीं सांगितलें त्यावरून आग्रा हें पूर्वीं लहानसें उजाड खेडें होतें, तेथें पादशाह राहूं लागल्यामुळें तें थोडेच काळांत मोठें शहर झालें, व शिकरीचे टेंकडी वरील वस्ती निघाली. आग्रा हें शहर फत्तेगड शिकरी पासून बाराकोस दूर आहे आणि शिकरीचे टेंकडीवर शेखसालीम यांचा मोठा दर्गा बांधलेला आहे.

आग्रा या शहरांत पादशाह यानीं अनेक इमारती बांधिल्या आहेत, त्यांत ताज महाल ह्मणून एक इमारत आहे, तशी इमारत पृथ्वीवर कोठें नाहीं. ती बांधण्यास वीस हजार मनुष्यें बत्तीस वर्षें खपत होतीं, आणि ही इमारत तयार करण्यास तीन कोटी, सत्रा लक्ष, अठ्ठेचाळीस हजार, सवीस, इतके रुपये खर्च झाले. हा ताज महाल यमुनेच्या कांठावर आहे. आकब्बरपादशहाचा नातू शहांजिहान याची बेगम नुरेमहाल ह्मणून होती ती प्रसूत होतांना मृत्यु पावली, तिला तुझी कबर सर्वोत्कृष्ट बांधीन असें वचन त्यानें दिलें होतें, त्या वचना प्रमाणें पादशाहानें हा महाल बांधिला. ह्या महालांत त्या राणीची कबर आहे. ती राणी सन १६४९ सवाइ सनांत मरण पावली पुढें सन १६६६चे सालीं शहाजिहान पादशाह मेला, त्याची कबर ही त्याच्या

अनुक्रमणिका

राणीच्या कबरीचे शेजारींच केली आहे. दर्ग्याचें खाली ल चोहोऱ्याचें काम व त्याचे चार कोपऱ्यांस चार मनोरे आहेत त्यांचें काम, हीं सर्व शुभ्र व निर्मळ संगमरवरी दगडा चीं असून त्यांवर रत्नें जडलेलीं आहेत; त्या सभोंवतीची भिंत संगमरवरी लाल दगडांची केलेली आहे. हा महाल ज्याज्या स्त्रियेनें पाहिलेला आहे, ती "असा महाल मजवर कोणी बांधीत असेल तर मी आज देहाचा त्याग करण्यास तयार आहें" असें मनांत आणिल्या वांचून राहिली नसेल.

यमुने पलीकडे **येत्मादूद्दवलाचा** दर्गा आहे तो ही मोठा असून सुंदर आहे, त्यांत **खाजे घैयास** याची व त्याचे बायकोची कबर मध्यभागीं आहे, आणि त्याचे सभोंतीच्या कोठड्यांत त्याचे कुटुंबाचे माणसांच्या कबरी आहेत. **खाजे घैयास** हा **जहांगीर** पादशाहाचे कारकीर्दींत मोठा पुरुष होऊन गेला. त्याचा इतिहास असा आहे कीं, तो मुळचा **पश्चिम तारतारी** येथील राहणारा होता, **हिंदुस्थान**चे पादशाहाचे दरबारांत रोजगार मिळवावा या हेतूनें त्यानें आपला एक बैल खेरीज करून सर्व मालमत्ता विकून वाट खर्चास पैका उत्पन्न केला, आणि तो व त्याची बायको अशीं उभयतां **हिंदुस्थाना** कडेस येण्यास निघालीं. बायको गरोदर होती, तिला बैलावर बसवून आपण पायानें चालत येत होता. **तारतरींतून हिंदुस्थानांत** येतांना एक मोठें अरण्य लागतें, त्यांत आल्यावर ख

चीं सर्व संपली, तीन दिवस त्यास व बायकोस उपास घडले. असे अवस्थेंत असतां बायको प्रसूत झाली, तिला मुलगी झाली, तेव्हां बाईला अशक्तता येऊन बैलावर बसण्याचें सामर्थ्य राहिलें नाहीं आणि **खाजेघैयास** हाहि फार श्रमला होता. असे संकट समयीं बाळास सांभाळतां येत नाहीं ह्मणून त्या बाळास टाकून त्यावर कांहीं झाडांचा पाला घालून तीं पुढें चालतीं झालीं. तीं अर्धकोस गेलीं न गेलीं इतक्यांत बाईस दुःख आवरेनासें होऊन तिनें बैलावरून खालीं उडी टाकून "बाळारे बाळा" ह्मणून शोकानें कळवळूं लागली. **घैयास** याच्यानें तें दुःख पोहवना, ह्मणून परत जाऊन त्यानें त्या पोरीस आणिलें. इतक्यांत एका मुशाफराची गांठ पडली. त्यानें उभयतांस अन्न दिलें. त्या नंतर तीं दोघें **लाहोरास अकब्बर** बादशाह राजकीय काम करीत होता तेथें येऊन दाखल झालीं. पुढें एका आप्ताचे शिफारसी वरून पादशाहानें **घैयास** यांजकडेस एक हजार स्वारांचें काम सांगितलें. नंतर **येत्मादूद्दवला** ह्मणजे खजांनिशीचें काम त्याकडेस झालें. त्याला जी अरण्यांत मुलगी झाली होती, ती मोठी रूपवती व सद्गुणी व कला कौशल्य जाणणारी झाली. **शेर अफगन** या नांवाचा एक गृहस्थ मोठा शूर व बलाढ्य व धैर्यवान होता, त्याशीं त्या मुलीचा विवाह करण्याचा नियम ठरल्यावर ती मुलगी अकस्मात पादशाहाचा वडील कुमार **सालीम** याचे पाहण्यांत आली. त्या

वरून त्या राजकुमाराची तिजवर प्रीती जडली. **सालीम** यानें ती आपल्यास बायको व्हावी ह्मणून होईल तितका प्रयत्न केला; तथापि तिचें लग्न **शेरअफगन** याशींच लागलें. पुढें **शेर अफगन** याला **लाहोर** सोडून **बंगाल** देशांत बायकोस घेऊन जावें लागलें. पुढें **सालीम**हा गादीवर बसल्यावर **शेरअफगन** याजवरील मागील द्वेष राहिला नाहीं असें बाहेरून दाखवून त्याला त्यानें दिल्लीस बोलावून आणिलें, आणि मोठें काम त्यास सोंपलें. **परंतु शेर अफगन** याचे बायकोचा निजध्यास पादशाहाचे मनांतून गेला नव्हता, ती प्राप्त होण्याचा उपाय काय करावा ही योजना त्याचे मनांत चाललीच होती; व तिचे नवऱ्यास बरखास्त केल्या बाचून ती हातीं लागणार नाहीं असें जाणून त्यानें आपलें आंग न दाखवतां परस्परें यत्न आरंभिला. पदरचे लोकांस शिकवून त्यानें एकवेळ **शेर अफगन** याजवर एक वाघ सोडविला, तेव्हां त्याचे हातीं शस्त्र नसतां ही त्यानें त्या वाघा बरोबर झोंबी करून वाघास ठार मारिलें. नंतर कांहीं दिवसांनीं त्यावर एक मस्त हत्ती घालविला, तेव्हां ही त्यानें तरवारीनें हत्तीची सोंड कापून टाकिली. ह्या प्रमाणें होऊं लागलें तेव्हां **शेर अफगन** हा **सालम** पादशाहचा निरोप घेऊन **बंगाल** देशांत **तांडा** या शहरास गेला. तेथील सर सुभेदार याला **सालीम** पादशाहाचा मनोरथ कळल्यावर त्यानें **शेर अफगन** याचे घरांत चाळीस मारेकरी पाठविले. त्यासमयीं तो निजलेला होता, परंतु

कांहींशी गलबल ऐकिल्या वरून एकाएकीं जागृत झाला. आणि हातांत तरवार घेऊन त्या मारेकऱ्यां बरोबर कवाइतीनें लढला व त्यां पैकीं निमे जणास त्यानें ठार मारिलें व कांहींकास जखमी केलें; तेव्हां बाकीचे राहिलेले मारेकरी पळून गेले. त्यानंतर तो तें शहर सोडून बरद्वान या नांवचे शहरांत जाऊन राहिला. तेथें ही कांहीं दिवसां नंतर तांड्याचा सर सुभेदार गांवची तपासणी करण्याचें निमित्त करून बरोबर हत्यार बंद स्वार व शिबंदी घेऊन आला. तेव्हां त्यास शेर अफगन सत्कारा करितां अजमासें एक कोस सामोरा गेला. त्याचे बरोबर दोघे नफर मात्र होते व तो स्वतःघोडयावर बसला होता. सरसुभेदार याची गांठ पडल्यावर तो शेर अफगन यास मोठे आदरानें भेटून त्या सहवर्तमान शहरा कडेस येऊं लागला. शहरा नजीक आल्यावर सर सुभेदार हा हत्तीचे अंबारींत बसला आणि शेर अफगन हा घोडयावरच राहिला. इतक्यांत सर सुभेदाराचे एका भालेकऱ्यानें शेर अफगन याचे घोड्याचे मांडीस भाला लावून त्याचे घोडेस्वारां पुढें हांकण्यास आरंभ केला. त्या वरून शेर अफगन यानें तरवार उपसली. त्या बरोबर सुभेदाराचे सर्व स्वार शिबंदीनें ही आपल्या तरवारी नागव्या केल्या. हें पाहून हा घांट माझा जीव घेण्याचा सुभेदार यांनीं केला आहे असें समजून शेर अफगन यानें आपल्या घोड्यास टांच मारून सर सुभेदाराचे हत्तीवर घातलें भा

अनुक्रमणिका

णि भाल्यानें सर सुभेदार यास ठार मारलें. नंतर तो स्वार शिबंदीवर धांवला व त्यां पैकीं कित्येक जण त्यानें मारिले. तेव्हां बाकीचे चहूकडे होऊन त्यांनीं **शेर अफगन** व त्याज बरोबरचे दोघे नफर यांस घेरून घेऊन त्यांजवर बंदुकांच्या गोळ्यांची व तिरांची वृष्टि आरंभिली, त्या मुळें त्याचे दोघे नफर पडले; **शेर अफगन** याचा घोडा मेला; व तो स्वतः ही खालीं पडला; व हातची तरवार गळाली; तेव्हां सर्व शिबंदीचे लोक त्याजवर पडून त्यांनीं त्याचे तुकडे केले. ह्या प्रमाणें **शेर अफगन** नाहींसा झाल्यावर त्याची बायको व त्यास एक मुलगी झाली होती ती यांस **सालीम** ऊर्फ **जाहांगीर** पादशाहाचे दरबारास नेलें. तेथें दुखोट्याचे दिवस पुरे झाल्यावर **जाहांगीर** पादशाहानें तिजशीं मोठे समारंभानें लग्न केलें, आणि राज्याचा सर्व कारभार तिचे हातीं दिला. तिला कांहीं दिवस **नुरे महाल** असें नांव ठेविलें होतें. पुढें **नुरेजहां** असें नांव दिलें; व तिचा बाप **खाजे घैयास** याला दिवाणगिरी दिली व त्याचे आप्त विषयीं यांस मोठाले रोजगार लाविले. तो **खाजे घैयासी** मरण पावल्यावर त्याचे नांवचा सदरीं सांगितलेला दर्गा बांधिला आहे.

ह्या प्रमाणें मुशाफरानें **घाशीराम** कोतवालास गोष्ट सांगून त्याचे पुडक्यांत कागद होते, ते सोडून, त्यांतून **ताजमहाल** व **येत्मा दुद्दवला**चा दर्गा यांचे रंगित नकाशे **घाशीराम** याला दाख

अनुक्रमणिका

विलें,ते पाहून तो बोलिला;"अशा इमारती पेशव्यांचे राज्यांत आहेत. **वानवडीस महादजी शिंदे** यांची छत्री काय लहान आहे? तसाच **शनवार**चा वाडा **मोरोबा फडणवीस** यांचा वाडा व **नानासाहेबां**चा वाडा ह्या जागा किती उत्कृष्ठ आहेत? तुह्मी पहाल तर फारच आनंद पावाल." मुशाफर हा जातीचा **मोंगल** असून निर्भिड होता. त्यानें उत्तर दिलें कीं," ह्या सर्व माझे पहाण्यांत आल्या आहेत. त्यां पैकीं **शिंद्याची** छत्री तर **आग्रा** येथील इमारतीस शौचकुप सुद्धां शोभावयाची नाहीं; आणि **शनवा**रचा वाडा व **फडणवीसां**चे वाडे अश्वशाळा व पाकशाळांचे ही उपयोगी नाहींत."

असें बोलणें ऐकून कोतवालाला कांहीं राग येऊन तो मुशाफरास कांहीं अपशब्द बोलिला. त्यावरून मुशाफर यांनें जंबिया काढून आंगावर धावून जाऊन **घाशीराम** याची नरडी धरली, आणि पोटांत जंबिया मारित आहे; इतक्यांत जवळ पासचे लोकांनीं मुशाफराचा हात धरिला. कोतवाल तर गर्भगळीत होऊन त्याचें धोतर सुटलें, आणि विधिही झाला. "पायां पडतों अमिर साहेब, पायां पडतों. जीव दान द्या, जीव दान द्या," अशा प्रकारें तो ओरडूं लागला. इतक्यांत मुशाफरास दुसरे लोकांनीं कैद करून त्याचे हात पाय बांधिले. नंतर **घाशीराम** यांनीं सावरा सावर करून ह्या गुलामास चावडीवर न्या ह्मणून चप्राशांस आज्ञा केली. नंतर त्याची चौकशी **रामशास्त्रीप्रभु**णे न्या

याधीशीचे कामावर होते, त्यांजकडेस गेली. त्यांनीं उभय पक्षां चा बांका ऐकून **घाशीराम** याला निर्णय सांगितला, तो येणें प्रमाणें—

कोतवाल साहेब, हा मुशाफर आपले **पुण्यांत**ला नाहीं **आफगान**चा राहणारा आहे. त्याचे हातून तुमचा प्राण वांचला हें तुमचें मोठें नशीब समजलें पाहिजे. जर करितां त्यानें तुमचा प्राण घेतला असता तर आमच्यानें त्याचें पारिपत्य न होतें. पराकाष्टा त्याजला शहरांत राहूंनको इतकेंमात्र सांगितलें असतें.

हें ऐकून मुशाफर मोठा आनंद पावला, आणि मजला बांधिल्या नंतर "**गुलाम**" अशी शिवी ह्या कोतवालानें दिली, त्याबद्दल ह्याचा सुड मी कधीं तरी उगिवल्या वांचून राहणार नाहीं, असें बोलला. त्यावरुन **रामशास्त्री** यांनीं भाषण केलें कीं, जे खरे शूर आहेत, त्यांनीं आपले बरोबरीचा शत्रू पाहून त्याशीं भांडावें; त्यांत त्यांना भूषण आहे, त्याप्रमाणें नुस्ते सुडउगविण्यांत नाहीं यास्तव असे प्रकारांत शांति धरणें उत्तम आहे. ही गोष्ट ऐकून मुशाफर याला, हा मोठा ज्ञाता आहे असें उघडपणें दिसूनआलें आणि मी आपला उपदेश ग्रहण केला असें ह्मणून व त्यास आदरानें सलामकरून तो निघून गेला. तेव्हा **घाशीराम** याला कसें वाटलें असेल याचा विचार सुज्ञजनांनीं करावा.

अनुक्रमणिका

गोष्ट ११.

एक बोहरी मण्यारी जिनसा व कांहीं ग्रंथ वगैरे विकण्या करतां पाटींत भरून फिरत होता. तो कोतवाल चावडीवरून जात असतां, त्याला घाशीराम यानें बोलाविलें आणि तो त्याचें सामान पाहूंलागला. त्यावेळीं बोहरी एक ग्रंथ ऊचलून कोतवालास ह्मणाला.

बोहरी–कोतवाल साहेब, हा ग्रंथ आपले संग्रहांत ठेवण्यास लायक आहे.

घाशीराम–कसला ग्रंथ आहे व त्याची किंमत काय?

बोहरी–इंग्रजी भाषेंतला ग्रंथ आहे. यांत पृथ्वीवरील सर्व चमत्कार लिहिले आहेत; त्याचे शंभर शिका रुपये पडतील.

घाशीराम–(चप्राशास हाक मारून) अहो नाईक, आपला फिरंगी लिहिणार **सोजा** किरस्ताव याला हांक मारा. (**सोजासिनोर** आल्यावर त्यांस) अहो ह्या ग्रंथांत काय आहे तें पहा.

सोजासिनोर—(ग्रंथांचीं पानें उलटपालट करून) ह्यांत फारच चमत्कारीक प्रकरणें लिहिलीं आहेत. त्यां पैकीं पहिल्या प्रकरणांत झोंपेंत उठून फिरण्याची खोड कांहीं मनुष्यास असते ती विषयीं गोष्टी लिहिल्या आहेत. एक गोष्ट अशी आहे कीं कोणी मनुष्य झोंपेंत असतां आपले पाठीस पोळ लागला आहे असें त्यास स्वप्नांत दिसून एकाएकीं त्यानें आपले बिच्छान्यांवरून

उडी मारून घडवंचीवर चढावें; अथवा पळत सुटावें. एक दासी असे, तिनें झोपेंत हत्रुणावरून उठून घरा बाहेर जावें. त्या प्रसंगीं तिला कोणीं कांहीं विचारलें असतां तिनें सावध असल्या प्रमाणें त्या प्रश्नाचें उत्तर द्यावें. तिचे आंगास टांचण्या अथवा दुसरें कांहीं बोंचलें तरी तिला तें समजत नसे. एक मुलगा रानांत फिरत असतां गांवाजवळचे एका डोंगराचे कड्यास चिमण्यानीं केलेला घरोटा त्यानें पाहिला. तो आपले हातीं यावा अशी त्यास फार उत्कंठा झाली. परंतु कडा चढण्यास इतका अवघड व उंच होता कीं तेथें हात तर नकोच पण काठी सुद्धां पोहचण्याची सोय नव्हती. त्यावरून कांहीं वेळ प्रयत्न करून तो मुलगा घरीं आला. परंतु त्याच्या मनांतून घरोटा गेला नाहीं. मग तो निजण्यास गेला. त्यास झोप येईना. कांहीं वेळानें झोप लागली. नंतर तो झोपेंतच बिच्छान्या वरून उठून अंधारांत रानांत जाऊन, दिवसास पाहिलेला पक्षांचा घरोटा त्यानें आणून तो आपले बाजे खालीं ठेवून, तो मुलगा पुनः निजला. सकाळीं उठल्यावर पाहतो तों घरोटा बाजे खालीं आहे. परतु आपग रानांत केव्हां गेलों, आणि अवघड कड्यावर चढून घरोटा कसा काढून आणिला, याचें त्याला कांहींच स्मरण राहिलें नाहीं. एक मनुष्य रात्रीं समुद्राचे खाडींत शिरून जलक्रीडा करीत आहे, असें तेथील बंदरावरील लोकांनीं पाहून त्याचे मागें नावा नेऊन त्यास त्यांनीं धरलें. तेव्हां "बिच्छान्या वरून ओ

अनुक्रमणिका

ल्तों कां ? ओढतां कां ?" असें तो मनुष्य ह्मणूं लागला. ते समयीं तो किनाऱ्या पासून अजमासें दोनशें हातांवर पाण्यांत गेलेला होता; व आतां तूं बुडशील असें नावाड्यांनीं त्यास सांगितलें, तरी तो तें कांहींच मानीना. शेवटीं त्यांनीं त्याला जबरीनें नावेवर घालून काठावर आणिलें. पुढें त्याचे घराचा त्यांनीं शोध केल्या वरून असें कळलें कीं तो मनुष्य दोन प्रहर रात्रीं आपले घरून निघून अवघड व भयंकर मार्गानें एक कोस पर्यंत चालून गेला होता, व नावकऱ्यानीं त्याला जेथें पाण्यांतून काढिलें, तेथें तो अजमासें पाऊण कोस तरून आलेला होता. पृथ्वीचे पोटांत गंधक आहे, व कांहीं पर्वतांत गंधक असतो, त्या पासून बहुत ठिकाणीं उन्हाळीं झालीं आहेत व त्यांचीं कित्येक ठिकाणीं मोठालीं कुंडें व तळीं स्नानां करितां बांधिलीं आहेत. तसल्या एका कुंडावर एक मनुष्य स्नान करीत असतां, त्याला झोंप येऊन तो पाण्यावर उताणा पडला, तो तसाच अडीच घटका पर्यंत निश्चल राहिला होता. एक विद्यार्थी वैद्यशास्त्र शिकत असे. तो निद्रेंत असतां त्याला त्या शास्त्रा विषयीं प्रश्न केले असतां त्यांचीं उत्तरें तो समर्पक देत असे. दुसरा एक विद्यार्थी ख्रिस्ती धर्माचे ग्रंथ पढत असे. तो रात्रीं उठून आपलें दिवसास आरंभिलेलें काम झोंपेंत पार करी आणि पुनः हंथरुणावर पडे. आणि सकाळीं उठल्यावर संध्याकाळीं करून ठेवलेल्या कामा पेक्षां जास्त काम झालें हें पाहून तें कसें व केव्हां झालें

अनुक्रमणिका

याचा त्याचा तोच विस्मय करी. एक जवाहिरी धनलोभी होता. तो दिवसा धंदा करून जो पैका मिळवी, तो एका बळकट पेटींत घालून तिला मोठें कुलुप लावून त्याची किल्ली आपले पाशीं ठेवी. त्या पेटींत कांहीं शिलक जमली ह्मणजे रात्रीं झोपेंत उठून पेटी उघडून तींतून पैका काढून तो, त्याचे आंतले खोलींत एक फडताळ होतें; त्यांत लपवून ठेवी. दुसरे दिवशीं उठला म्हणजे शिलक कमी कशी झाली हें पाहून त्याचें तो मोठें आश्चर्य मानीत असे. आतां ती कोणीं चोरून नेली असें त्यानें मनांत आणावें तर घरांत तो व त्याची मुलगी यांखेरीज दुसरें कोणीं नसे. आणि असें असतां पेटींतील शिलक तर पुनः पुनः नाहींशी होई. पुढें त्याचेकडे कांहीं जरूरीचें काम तयार करण्या करितां आलें, यास्तव त्यानें एक उमेदवार मदतीस ठेविला. नंतर ही शिलक नाहींशी होण्याचा क्रम चाललाच होता. शेवटीं एक दिवस पाहतो तों पेटींत एक दमडी अथवा दुसरें काहीं नाहीं त्या वरून आपली मुलगी व उमेदवार अजुरदार या दोघांनीं मिळून चोरी केली असें त्याचे मनांत पक्कें भरलें. त्या वरून मुलीस व उमेदवारास मोठयानें रागें भरून तो बोलला कीं आजपर्यंत थोडी थोडी चोरी तुह्मी चालविली होती. पण आतां तर सर्वस्वीं मला तुह्मीं लुटलें, हें माझानें सोसवत नाहीं. असें बोलून उभयतांस त्यानें कोतवाला कडेस पाठविलें. कोतवालानें पक्षकारांचा मजकूर ऐकून घेऊन दुसरे दिवशीं निर्णय करण्याचें ठरवून त्या दो

अनुक्रमणिका

घांस प्रति बंधांत ठेविलें. जव्हाहिरी घरीं आला. रात्रीस निद्रा येईना ह्मणून त्या दिवशीं त्यानें बरेंच मद्य प्राशन केलें. त्या चा अम्मल चढूं लागला तेव्हां शिसा हातांतून खालीं ठेवतांना पडून फुटला. मग तो तसाच निजला. प्रातःकाळीं उठल्या वर पाहतो तों एका पायाचे टाचेत कळ लागली आहे, पांघरू णास रक्त लागलें आहे, पायांत निजतांना जोडे होते ते नाहींत व तळव्यास जखम झाली आहे. त्यानंतर तो उठून आंत ल्या खोलींत गेला. तेथें पाहतो तों फुटलेले शिशाचा एक तुकडा पडला आहे व त्या पाशीं एक जोडा पडला आहे; ते व्हां मी रात्रीस झोपेचे व मद्याचे तारेंत येथें आलों असेन, असें त्या जला वाटलें. इतक्यांत फडताळाचें दार बराबर बसलें नव्हतें सें पाहून त्यास त्यानें हात लाविला तों तें खालीं पडलें आणि आंत हरवलेला पैका व दुसरा सर्व माल दृष्टीस पडला. ते व्हां मोठा विस्मय करून माझा मीच चोर असतां ,आपले पोरीस व उमेदवारास शिक्षा होण्याकरितां मी कोतवालाचे स्वाधीन केलें, हा केवढा अन्याय आहे असें मनांत आणून त्यानें तत्काळ धांवत कोतवालाकडेस जाऊन त्या दोघांस सोडवून आणिलें. ह्या प्र माणें निद्रेंतले निद्रेंत उठून जागृता प्रमाणें वर्तणूक करणारे लो क पुष्कळ असतात.

कोतवाल—बोहराजी शेट, हा ग्रंथ आह्मी ठेवतों. उदईक तु ह्मांस पाहिजे तेथील हुंडी देऊं, नाहींतर रोख रुपये चुकवून देऊं.

त्यावरून बोहरी बरें आहे ह्मणून त्या दिवशीं निघून गेला, आणि दुसरे दिवशीं कोतवालाचे घरीं पैका मागण्यास आला तेव्हां चौकीदारानें सांगितलें कीं आज कोणास वाड्यांत जाण्याची परवानगी नाहीं; उद्यां या. त्यावरून बोहऱ्यानें पांच पन्नास खेपा घातल्या, तरी कोतवालाचें दर्शन होईना. नंतर इलाज नाहींसा झाला असें पाहून कोतवाल याला रस्त्यानें जातांना गाठून आमचे ग्रंथाची किंमत अद्यापि हातीं आली नाहीं ह्मणून तो बोलिला. त्या गोष्टीचा कोतवालास राग येऊन त्यानें उत्तर केलें कीं तुर्त पन्नास रुपये द्यावे ह्मणून आमचे कारभारी चिंतोपंत दादा यांला सांगितलें आहे, त्यांकडेस जाऊन रुपये घ्यावे; पुढें. बाकीचे रुपयां विषयीं सांगूं. नंतर बोहरी चिंतोपंता कडेस गेला, त्याची ही गांठ पडेना. तेव्हां त्याचे हाता खालील कारकून गोपाळपंत ह्मणून होता, त्याला व छडीदारदार राघोजी चव्हाण होता, याला दाहा रुपये देऊं करून कारभाऱ्याची त्यानें भेट घेतली. तेव्हां दोन महिन्याचे वायद्यानें तुह्मास चाळीस छापी रुपये देण्यास कोतवाल साहेब यांनीं सांगितलें आहे. जर तुह्मास घाई असेल तर आठरुपये व्याजा बद्दल कापून देऊन बाकीचे रुपये ३२ घेऊनजा, असें त्यानें सांगितलें. बोहोऱ्यानें निरुपाय होऊन छापी रुपये ३२ घेण्याचें कबूल केल्यावरून चिंतोपंतानीं छापी रुपये ३२ देऊन रुपये ४० ची पावतीमागितली; पण अशी पावती कशी देऊं ह्मणून बोहरी ह्मणूं लागला असतां

अनुक्रमणिका

जितके रुपये द्यावे त्यांचे सवाईचा लेख करून देण्याची सर्व सावकारींत चालच आहे; हें तुह्मास खरें वाटत नसल्यास जाऊन शोध करून या; आणि मग सावकास रुपये न्या; असें चिंतोपंत ह्मणाला. ते समयीं एक गाठ पडण्यास इतके आयास, तेव्हां पुन्हा भेटण्याची गोष्ट कशाला पाहिजे? असा बोहऱ्यानें मनांत विचार करून रुपये च्याळिसांची पावती निमूट लिहून दिली. इतक्यांत त्या बत्तीस रुपयांचे रकमे पैकीं दहा रुपये **गोपाळपंत** व **राघोजीचव्हाण** यांनीं हिसकून घेतल्यावरून शंभर शिका रुपयाचे ऐवजीं. बेवीस रुपये छापी हातीं आले, व ते ही येण्यास महत प्रयास करावे लागले, हें पाहून बोहऱ्याचा जीव फारच संतापला आणि मी इंग्रज सरकारचे लष्करांतील राहाणारा आहें. माझी अशी अवस्था झाली हा मजकूर **संगमा**वर जाऊन **रेसिडेंट साहेब** यांला कळवितों व तुमची सर्वांची खबर घेववितों, अशी मोठ्यानें आरोळी मारून "इंग्रज सरकरचे रयतेस लुटलेंरे लुटलें," ह्या प्रमाणें ओरडतच तो तेथून निघाला. हा मजकूर **घाशीराम** याला कळतांच त्यांनीं आपला विश्वासुक मनुष्य पाठवून **रेसिडेंट साहेब** यांचे भालदार व चोपदार यांस नजर देऊं करून अमुक बोहरी बंगल्यास येईल, त्याचा आंत प्रवेश होऊं देऊं नये असा बंदोबस्त राहण्याची तजवीज ठेविली. त्या मुळें बोहाऱ्यास **रेसिडेंट साहे**बाची गाठ पडेना असें झालें. त्यासमयीं तोफेची इंग्रजी दारू परवानगी शिवाय इंग्रजसरकाचे लष्करांतून

पुणें शहरांत कोणीं विकण्यास नेऊं नये असा कायदा होता. त्याची माहिती बोहरी याला होती. त्याजवरून त्यानें दारू घालण्याच्या जशा पिशव्या असतात, तशा तयार करून त्यांत वाळू भरून, त्या पिशव्या एका पेटींत बंद करून त्या पेटीवर खादी जडून तीवर आपलें नाव व मुकाम लष्कर नजिक संगम असें लिहून तयार केली; व व घाशीराम याची एक राख होती, तिचे घरीं अस्तमानाचे संधीस जाऊन सांगितलें, कीं, ह्या पेटींत इंग्रजी दारू आहे; तिची किंमत शहरांत फार चांगली येते; शहरांत अशी दारू आणण्याची परवानगी नाहीं, असें असतां मी चोरून येथें ती आणविली आहे; ती आजची रात्र आपले घरीं पलंगा खालीं दडवून ठेवावी; मी उदईक पहाटेस येऊन घेऊन जाईन; मी आपले उपकार विसरणार नाहीं. ही गोष्ट कोणास सांगाल तर प्रभूचे पायांची शपत आहे. मी आतां इंग्रजसरकारचे लष्करांत आपले घरीं जातों. असें सांगून तो घरीं गेला. दोन प्रहर रात्र झाल्यावर घाशीराम नित्या प्रमाणें राखेच्या घरीं आले. तिनें दुसरीं सर्व कामें सोडून प्रथम बोहऱ्यानें दारूची पेटी आपले घरीं लपवून ठेविल्याचा मजकूर सर्व त्यास सांगितला. त्याजवरून कोतवाल याणीं पेटी तपासून पाहिली, तों तिजवर ज्या मनुष्या पासून इंग्रजी ग्रंथ घेतला होता, त्याचेंच नांव आहे असें कळलें. त्यावरून "बरा सांपडला ह्याची आतां खोड मोडितों" असें बोलून ती पेटी त्यानें पाहाऱ्यांत ठेविली.

अनुक्रमणिका

प्रातःकाळ होतांच पेटी घेऊन **रेसिडेंट साहेबाकडेस** तो स्वतः गेला आणि इंग्रजसरकारचे लष्करांतील अमुक बोहऱ्यानें ही इंग्रजी दारूची पेटी चोरून शहरांत नेलेली होती. तो मनुष्य फारच लबाड असल्याचा आह्मास अनुभव आहे. या बोहऱ्यानेंच आह्मास चाळीस रुपयांत लहानसा ग्रंथ विकत दिला. त्या प्रमाणें त्याजला रुपये देऊन आमचे कारभाऱ्यानें पावती लिहून घेतली असतां आमची व आमचे पदरचे लोकांची खोटी नालस्ती चोहोंकडे सांगत तो फिरत असतो; असें तो बोलल्यावर रसिडेंटानें चपराशास हांक मारून बोहऱ्यांस बोलावूं पाठविलें; आणि तो आल्यावर **घाशीरामाचे** समक्ष ही पेटी कोणाची आहे असें त्यास विचारिलें. तेव्हां माझी आहे, ती कोतवाल साहेब यांचे राखे कडेस काल संध्याकाळीं मी ठेविली असें त्यानें उत्तर केलें. त्या नंतर **रसिडेंट साहेब** यांनीं हतोडा आणून पेटी फोडली. आणि तींतील थैल्या बाहेर काढून फोडील्या, तों त्या थैल्यांतून वाळू निघाली. तें पाहून **रेसिडेंटसाहेब** व **कोतवाल** ह्यांचा मोठा घोटाळा झाला. मग **रेसिडेंटसाहेब** यांनीं हें तरकट करण्याचें कारण काय असें बोहऱ्यास विचारिलें. तेव्हां बोहऱ्यानें बावीस रुपये च्छापी **रेसिडेंट साहेबा पुढें** ठेवून, एकशें शिका रुपयांस ग्रंथ कोतवाल यांनीं सही केला असतां, अंतीं माझे हातीं बावीस रुपये च्छापी दिले; त्यांत पांच रुपये निवळ तांब्याचे व दाहा सुलाखाचे व सात चांगले आहे

अनुक्रमणिका

त. मी साहेबाकडेस फिर्याद येईन ह्मणून साहेबांचे बंगल्या कडील लोकांस लांच देऊं करून माझा साहेबांकडेस प्रवेश न होई असा बंदोबस्त कोतवालानीं ठेविला आहे. त्या मुळें आज सहा महिनें झाले मी रोजगार सोडून फिरत आहें, तरी माझी दाद कोठेंच लागेना. सबब साहेबांकडेस येण्या करितां ही युक्ति केली आहे. असें त्यानें उत्तर केलें. त्यावरून **रेसिडेंट साहेब** फार नाखुष झाले आणि ह्या बोहऱ्याची फारकती चार घटकेचे आंत न आली तर मुंबई सरकारास लिहून तिकडून श्रीमंत सरकारास यादी लिहिण्याचे करूं, ह्या प्रमाणें **घाशीरामाला** सांगून त्यास विडा पान न देतां निरोप दिला. नंतर **घाशीरामानें** सत्वर घरीं येऊन शंभर रुपये शिका **रेसिडेंट** साहेबा कडेस पाठवून आपण त्याची हवी तशी पावती घ्यावी ह्मणून निरोप पाठविला. त्यावरून **रेसिडेंट साहेबांनीं** बोहऱ्यास बोलावून ते रुपये त्याजला देऊन च्छापी रुपयां पैकीं पांच खोटे रुपये नदींत फेकून देऊन बाकी रुपये पंधरा नुकसानी बद्दल त्या बोहऱ्यास देऊन फारकत घेतली.

अनुक्रमणिका

गोष्ट १२.

दसऱ्याचे दिवशीं **घाशीराम** आपले माडीवर बसून तेथून, दारापुढें गारोड्याचा तमाशा चालला होता, तो पहात होता. त्या गारोड्यानें हस्तकौशल्यानें दुसऱ्यास ठकविण्याच्या अनेक कृती केल्या. त्यांत एक सुरीचें पातें नऊ तसू लांब व पाऊण तसू रुंद आपले घशांत शिरवून नंतर ओकून बाहेर काढिलें. पात घशांत शिरवितांना व बाहेर काढतांना आपला जीव व्याकुळ झाल्या प्रमाणें त्यानें दाखविलें. त्यावरून त्या गारोड्यास कोतवालानीं बक्षीस देऊन खेळ पुरा करविला. त्या समयीं त्यापाशीं एक **इतालियन** जिनसी कडील कारखान्यांतील आलेला होता, त्याजबरोबर कोतवालाचें भाषण झालें तें—

घाशीराम—पहा; यानें केवढा मोठा चमत्कार करून दाखविला!

इतालियन—त्यानें आपल्यास ठकविलें. त्यानें सुरीचें पातें तोंडांत शिरविलेंसें आपल्यास दिसलें खरें; पण तें पातें त्याचे घशांत मुळींच गेलें नाहीं. सुरीची मूठ पोकळ आहे, त्यामुळें पातें घशांत शिरत आहे असें जेव्हां आपल्यास दिसत होतें, तेव्हां त्या पात्याचें टोंक मात्र दातांत त्यानें धरलें होतें आणि पातें मुठींत माघारें शिरून गेलें. या मुळें मूठ तोंडास येऊन भिडली. असे लोक आमचे देशांत फार असून ह्या पेक्षां ही फार कुशलतेच्या कृती ते करीत असतात.

अनुक्रमणिका

घाशीराम--असें काय ह्मणतां? ती गौडबंगाली विद्या आहे. तिचे सामर्थ्यानें गारोड्याला असे अद्भुत चमत्कार करून दाखवितां येतात.

इतालियन--आपला भरंवसा मजवर नसेल तर त्यानें तोंडांत घातलेली सुरी आणून पहावी.

इतालियन याचे आग्रहावरून कोतवालानें शिपायी पाठवून त्या गारोड्यास परत बोलावून आणिलें आणि ह्मटलें कीं घशांत जी सुरी घातली होती, ती पाहण्यास दे. गारोडी यानें सुरी न दाखवितां ती मंतरलेली आहे, दुसऱ्यानें हात लाविल्यास त्या हात लावणाराचा तेच वेळेस मुर्दा पडेल; यास्तव आपण तिला हात घेण्याचे भरीस पडूं नये; असें उत्तर केलें. त्यावरून **इतालियन** माडीवरून खालीं येऊन गारोड्यास ह्मणूं लागला कीं मी मेलों तरी चिंता नाहीं. माझे हातांत ती सुरी दे. तेव्हां मंतरलेल्या जिनसा दुसरे कोणाचे हातीं देऊं नये असा आमचे गुरूचा हुकूम आहे. यास्तव तुह्मी आमचा जीव घेतला तरी ती सुरी तुमचे हातीं देणार नाहीं, असें उत्तर करून तो गारोडी निघून गेला. त्यावरून **इतालियन** कोतवालापाशीं परत जाऊन त्याचें बोलणें पुनः चाललें.

घाशीराम--तुह्मी ह्मणता तें आतां आह्मास खरें वाटतें.

इतालियन--सुऱ्या व चाकू खरोखरी गिळल्याचे अनेक दाखले आमचे देशांत झाले आहेत. त्यांत ज्या चाकूंचीं पातें उ

घडण्याचीं व झांकण्याचीं असतात असे पस्तीस चाकू एक ज्या नकमिंग्झ या नांवाचा अमेरिकन दर्यावर्दी होता, त्यानें अनेकवेळा मिळून गिळिले. त्यां पैकीं एक वेळ एक दिवसांत चौदा गिळले. पुढें त्याला असें करण्यापासून रोग होऊन तो मेला. विलियम डेमर्स्टीर या नांवाचा एक गारोडी कालैल याशहरांत तमाशा करित असतां, त्यानें हातीं एक सुरी घेऊन ही गिळून जातों असें सभोंतीचे लोकांस सांगून तोंडांत घातली, ते समयीं आपले कोंपरास कोणी हात लावतो असें त्याला भासून तो घाबरला, त्यामुळें ती सुरी हातांतून निसटली आणि घशांत उतरून पोटांत गेली. तेव्हां तो मोठा भयात झाला. नंतर वैद्यकीचा उपचार करण्यास त्याला, गरीब लोकांस फुकट औषधें देण्याचा दवाखाना होता, तेथें नेलें. तेथें अनेक प्रकारचे उपाय केले शेवटीं जठर कापून सुरी काढिल्यावांचून तो बरा व्हावयाचा नाहीं असें वैद्यांनीं सभा करून ठरविलें; व जठर कापण्याची तयारी केली. परंतु विलियम यानें तसें करूं दिलें नाहीं यामुळें तो मरण पावला. त्याचें वय सुमारें अठ्ठातिस वर्षांचें होतें, व जी सुरी पोटांत उतरली ती नऊ तसू लांब व एक तसू रुंद होती, तिला हस्तिदंताची मूट होती आणि ती सुरी गिळल्यानंतर तो दोन महिने जिवंत राहिला होता. सन १६३६ इसवीचे सालांत प्रशिया देशांत अशीच एका गारोड्याचे हातांतून सुरी निष्टून घशा खालीं

उतरून गेली होती. ती त्याचें जठर कांपून वैद्य लोकांनीं काढिली. नंतर त्याची जखम बरी होऊन तो चांगला झाला.

घाशीराम—इतके उपचार कशाला पाहिजे होते? तुमचे देशचे वैद्यांस ज्ञान नाहीं, व वैद्य शास्त्रही समजत नाहीं असें स्पष्ट दिसतें. एकजण जरी त्यांचे तडाक्यांतून जिवंत सुटला, तरी तें त्या बापुड्याचें मोठेंच भाग्य ह्मटलें पाहिजे. आमचे युनानी हकीम व दक्षणी वैद्य यांत फार हुषार लोक असतात एका मनुष्याचे पोटांत पाणी पितांना चार हात लांब असा साप शिरला होता. तेव्हां त्याला श्रीपतवैद्य यानीं एक मात्रा देऊन तो साप जिवंत त्याच्या पोटांतून पाडिला. तो धरून आह्मास प्रत्यक्ष दाखविण्यास त्यानीं आणिला होता, व त्याजबद्दल त्यास सरकारांतून एक गांव इनाम मिळाला.

इतालियन—ज्याचे पोटांत तो साप शिरला होता, तो कोण होता? व साप शिरतांना कोणीं पाहिला होता कीं नाहीं?

घाशीराम—तो आमचे कारखान्यांतील कारकून असून तो श्रीपतवैद्याचे जातीचाच ब्राह्मण होता. त्यानें साप आंधारांत पाण्या बरोबर त्याच्या पोटांत शिरल्याचा मजकूर सांगितला. तुमची मर्जी असल्यास त्याला आणवून विचारतों.

इतालियन—त्याला आणविणें नको. मनुष्याचे घशाचें छिद्र, चार हात लांबीचे सापाची जी रुंदी असेल, ती मावण्या जोगें मुळींच नाहीं, आणि जो पदार्थ तोंडावाटे पोटांत जातो तो

धातु अथवा दगड किंवा दुसरे कांहीं प्रकारचा कठिण नसला, तर ज्या रूपानें गेला, त्या रूपानें दुसरे द्वारानें बाहेर येत नाहीं. तसाच तो एकदां जठरांत गेल्या नंतर तिकडून अतड्याची नळी आहे तींतून उतरल्या वांचून शौचद्वारीं तो पोहचत नाहीं. आणि ज्या मनुष्याची जितकी उंची तिचे सहापट लांब आतड्यांची नळी त्याचे पोटांत असते. यास्तव साप जिवंत गेला तसा जिवंत बाहेर पडला यागोष्टीचा कांहींच संभव नाहीं. आपल्यास व सरकारास श्रीपत वैद्य व आपला कारकून याउभतांनीं अपसांत कट करून ठकविलें असें खचीत आहे.

घाशीराम—तुमचे लोकांची समजच खोटी आहे. पोटांतून जंत जिवंत पडतात किंवा नाहींत? आणि हत्ती कवठें गिळतो तीं जशींचीं तशींच बाहेर पडतांना आह्मी आपल्या डोळ्यांनीं पाहिलीं आहेत.

इतालियन—जंताचा व कवठाचा प्रकार अगदीं निराळा आहे.

घाशीराम—तो कसा तो सांगा बरें ?

इतालियन—जंत हे मुळापासून पोटांतले पोटांत उत्पन्न होऊन तेथेंच पोसले जातात; व ते आतड्यांतून फिरतात, त्यामुळें त्यां पैकीं कांहीं जिवंत तोंडावाटे अथवा पश्चिम द्वारानें बाहेर पडतात. मग बाहेरील हवा लागली ह्मणजे मरतात. हत्तीचे पोटांतील आंतड्यांची नळी कवठांपेक्षां अधिक रुंद आहे, व त्या फळांची कवटी लांकडा प्रमाणें कठीण असते. त्यामुळें तीं जठ

अनुक्रमणिका

रांत वितळून जात नाहीं. तत्रापि तींचे आंगास फार बारिक च्छि द्रें असतात त्यांतून जठराग्नि त्या कवठांतील रस शोषून घेतो. नंतर पोकळ कवठी मात्र बाहेर पडती. हें आपण कवठी फो डून पाहिली असतां सहज कळून येईल.'

घाशीराम—तुमचे तर्क फारच लांब चालले. तुह्माशीं वाद घालून फळ नाहीं. आह्मीं प्रत्यक्ष साप पाहिला तें खोटें, आणि तुमचें पांडित्य खरें हें कसें होईल?

इतालियन—मेलेलीं मनुष्यें व जनावरें कापलेलीं आमचे पा हण्यांत अनेकवेळ आलीं आहेत. त्यामुळें पोटांतील रचनेची माहिती आह्मास आहे.

घाशीराम—पुरे आतां. पुरे झालें. जंगली लोक व पशु यांत अंतर कांहींच नाहीं. तेव्हां तुमचे बोलण्याचा राग आ ह्मास नाहीं. जा आतां वेळ झाली. रसिडेंट साहेब शहरांत तोफखान्याची कवाईत पाहण्यास येणार आहेत. त्यांस तुमचें कौशल्य दाखवावें.

इतालियन हें कसें असेल तसें असो असें बोलून जाता झाला.

अनुक्रमणिका

गोष्ट १३.

कोतवाल याला पक्षी पिंजऱ्यांत ठेवून बाळगण्याचा व त्यांला शिकविण्याचा फार शोक होता. कोणी परदेशी मनुष्य आला ह्मणजे त्याला आपले **हिरामण** पक्ष्याची बोलण्याची तारीफ तो सांगत असे. एकवेळ एक **अर्बस्थान**चा मनुष्य आला होता. त्याला **हिरामण** कोतवालानें दाखविला. तेव्हां तो पक्षी "रामराम हो दादा रामराम" असे शब्द बोलिला. त्यावरून पक्षी काय बोलत आहे असें त्या **आरबानें** विचारिलें असतां तुह्मास तो. सलाम करित आहे असें उत्तर कोतवालानें दिलें. नंतर "क्याखबर है" असें **आरबानें** मुसलमानी भाषेंत पक्ष्यास विचारिलें, तेव्हां पक्षानें कांहींच उत्तर दिलें नाहीं. त्या प्रसंगानें त्यानें देशोदेशच्या पक्षांच्या गोष्टी सांगितल्या.

आगस्तस् सिझर या पादशाह **मार्क अन्तोनी** याजवर मोहिम करून व तींत जय पावून मोठ्या समारंभानें **रोम**शहरांत येत होता. तेव्हां पुष्कळ लोक सामोरे आले होते. त्यांत एक मनुष्य एक मैना हातावर बसवून आला होता. त्याचे जवळ पादशाहाची स्वारी येतांच, मैना आपले पंख फडफडावून बोलली. विजयी पादशाह **सीझर** याजला **ईश्वर** सलामत राखो. हें ऐकून पादशाह परमानंद पावला, आणि त्या मनुष्यास पुष्कळ पैसा देऊन त्यानें ती मैना घेतली. पुढें मैनेचे मालकानें बक्षिसा पैकीं

अनुक्रमणिका

आपले सोबत्यास देऊं केलेला अंश दिला नाहीं, त्यावरून त्या सोबत्यास राग येऊन त्याचा सुड उगवावा असा त्यानें निश्चय केला. मग ज्यास बक्षीस मिळालें होतें त्याचे मनांत खरी राजभक्ति कांहींच नाहीं; केवळ पोटभरण्या करितां एका पक्ष्यांस मात्र राजस्तुतीचे शब्द त्यानें शिकवून ठेविले होते; पण दुसरे पक्ष्यांस त्यानें विपरीत शब्द शिकविले आहेत, असें दाखविण्या साठीं दुसरी मैना तो सोबती सीझर पादशाहाचे सभेंत घेऊन गेला; आणि सरकारानीं ज्यास इनाम दिलें त्या मनुष्यानें दुसरी एक मैना तयार करून नजर पाठविली आहे, ही पहावी, इतकें तो बोलत आहे तों ती दुसरी मैना म्हणाली "विजयी मार्क अंतोनी यास ईश्वर राखो." हें ऐकून, सीझर पादशाह जो मोठा शाहणा होता, तो हांसला; आणि पहिलें दिलेलें इनाम दोघांनीं निमे निम वाटून घ्यावें अशी त्यानें आज्ञा केली.

एक चांभार फार दरिद्रांत आला होता. त्यानें इनाम मिळविण्याचे आशेनें एक पक्षी आणून त्याला शिकविण्याची मेहेनत घेतली; परंतु तो लवकर शिकेना; हें पाहून निराश होऊन त्या पक्ष्या पाशीं उभा राहून त्यानें वारंवार ह्मणावें. बरें " तर माझे श्रम व्यर्थ गेले". पुढें आणखी श्रम घेऊन त्या पक्ष्यास सीझर पादशाहा कडेस नेलें. तेव्हां "पादशाहाला ईश्वर रक्षो" असे शब्द स्पष्ट रीतीनें तो पक्षी बोलिला. त्या वरून पादशाह बोलिले. छे तुजसारिखे आर्जवी मजपाशीं पुष्कळ आहे

त. त्यावर तो पक्षी "बरें तर माझे श्रम व्यर्थ गेले" असे शिक विणारा पासून ऐकिलेले शब्द बोलिला. तें समर्पक उत्तर ऐकून शिकविणाराचे उमेदी पेक्षां जास्ती किंमत त्याला देऊन पादशाहानें तो पक्षी विकत घेतला.

एका सौदागरानें पोपटास "यांत काय संशय" असे शब्द शिकवून बाजारांत विकण्यास नेलें. तेथें एका गृहस्थानें येऊन त्याची किंमत विचारली. तेव्हां पांच मोहरा किंमत आहे असें सौदागरानें सांगितलें. तेव्हां गृहस्थ ह्मणाला. पोपटाची इतकी योग्यता आहे कीं काय? तेव्हां पोपटास पुसा ह्मणजे कळेल, असें सौदागरानें उत्तर केलें. त्या वरून "कायरे पोपटा? पांच मोहरांची तुझी योग्यता आहे काय!" असें गिऱ्हाइकानें विचारिलें असतां, "यांत कायसंशय" असें पोपटानें उत्तर केलें. त्यावरून पांच मोहरा देऊन त्या गृहस्थानें पोपट घेऊन घरीं नेला, आणि त्यादीं तो बोलूं लागला, तों "यांत काय संशय" इतके शब्द मात्र पोपट ह्मणे. तें पाहून मी मूर्खपणानें इतका पैका ह्या पोपटा करितां दिला, असें भाषण त्रासानें त्याच्या तोंडांतून आलें. तें ऐकून "यांत काय संशय" असें पोपटाचें उत्तर पडलें. तें ऐकून तो हांसला आणि पोपटास त्यानें पिंजऱ्यांतून काढून सोडून दिलें. ह्या प्रमाणें प्रसंगवशात् समयोचित दिसणारें भाषण बोलण्यास पुष्कळ पक्षी शिकतात. त्या प्रमाणें देखील तुमचा

अनुक्रमणिका

हिरामण तयार झाला नाहीं. मर्जी असल्यास मी तयार क रितों, असें तो **आरब** सौदागर बोलिला.

हें बोलणें ऐकून **घाशीरामानें** त्या **आरबास** दरमाहा ठर वून **हिरामण** शिकविण्यास त्याचे स्वाधीन केला. त्याला पांच सा हा महिने शिकवून **आरबानें** परत आणिलें, आणि मी फार श्र म घेऊन ह्या पक्ष्यास पढविलें आहे ह्मणून तो बोलिला. त्यावरू न "तुला पढविण्यास श्रम पडले कायरे हिरामण?" असें कोतवा लानें विचारिलें. तेव्हां "होय खरी गोष्ट आहे" असें त्यापाखरानें उत्तर दिलें. तें ऐकून माझा पोपट शहाणा झाला असें सम जून, **आरबास** एक चांगला चंदेरी शेला देऊन कोतवालानें निरोप दिला. मग संध्याकाळीं **नानाफडणवीस** यांचे वाड्यां त कोतवाल गेले, तेव्हां आपले **हिरामण** पक्ष्याची भर सभेंत अशी तारिफ केली कीं त्या पोपटास कोणता ही प्रश्न केला अ सतां त्याचें समर्पक उत्तर तो देतो. त्यावरून तुमचा पोपट एक दिवस दाखवा, असें **नानाफडणवीस** बोलले.

नंतर तिसरे दिवशीं पोपटास शिकविणाऱ्या **आरबाचे** रांडेनें संगमावर जाऊन **रेसिडेंट साहेबापाशीं** अर्ज केला कीं मी इंग्रज सरकारची रयत होऊन नुकतीच येथें आलें आहे. म जवर शहरचे कोतवालानें मोठा जुलूम केला आहे. तो असा कीं माझा नवरा **हिंदुस्थानांत** गेला आहे व मी घरीं मोल मजु री करून पोट भरीत असतें. मी एकटी असतें हें पाहून कोतवाल या

अनुक्रमणिका

नीं मजवर कांहीं दिवसां पासून वाकडी नजर ठेवली आहे. मला पांच चारवेळा बोलावणें पाठविलें; पण मी त्यांकडेस गेलें नाहीं. त्यानंतर एक दिवशीं माझे घरांत अंधारांत ते शिरले आणि मजवर जबरी करूं लागले, ते समयीं मी बोंब मारल्यावरून ते निघून गेले, जातेवेळेस बरें रांडे, तुझी खबर घेतों; तुजसारख्या रांडा मी फार पाहिल्या आहेत, असें मोठ्या रागानें बोलले. दुसरे दिवशीं प्रातःकाळीं मी पाणी आणण्यास हवदावर जात असतां एक मनुष्य माझे पाठी मागून येऊन बाय नखणी कोणीकडेस आहे असें विचारूं लागला, तेव्हां शुक्रवारांतकोतवाल चावडीचे नजीक ती आहे असें मी उत्तर केलें. तेथें कोणाची किती वस्ती आहे, असें त्यानें पुनः पुसल्या वरून पांच पन्नास कसबिणी तेथें राहतात असें ऐकितें, इतका मी जाब देतें तों एक शिपायीं येऊन मला व त्या मनुष्यास धरून कोतवालाकडेस घेऊन गेला. तेथें कोतवाल हे रागें भरून त्या मनुष्यास तूं काय करीत होतास ह्मणून विचारूं लागले. तेव्हां माझी व या बाईची फार दोस्ती आहे व तिचे घरीं मी जात असतों सबब आज केव्हां येऊं असें विचारीत होतों; ही बोलली कीं एक दोन दिवसांनीं माझा नवरा हिंदुस्थानांतून येणार आहे, यास्तव आतां निजण्यास येऊं नको; ह्या प्रमाणें त्या लुच्चानें सर्व बनावटी मजकूर सांगितला; तेव्हां फौजदारी कारकून याला कोतवालानें सांगितलें कीं ह्या मनुष्याचा हजर जामीन घेऊन याला

चार दिवसांनीं हजर ठेवण्याचा बंदोबस्त ठेवावा व ह्या रांडेस आपले पक्षी आहेत, त्या कोठडींत कोंडून ठेवा. त्याजवरून मला त्या कोठडींत कोंडून ठेविलें व बाहेरून दार बंद केलें. नंतर कांहीं वेळानें आंतील दार उघडून कोतवाल त्या कोठडींत आले आणि मला अंतर्गृहांत नेऊन तेथें चार पांच रांजण उघडून हसत हसत ह्मणाले, कीं शहरांतील लबाड रांडांच्या घेतलेल्या ह्या नथा आहेत. त्यांत हजार पांचशे रुपयांचे किंमतीच्याही नथा आहेत. त्यास तुझे पसंतीस येईल ती नथ तूं ह्यांतून घे. तेव्हां मला नथ नको व कांहीं नको; तुमचे पायां पडतें; मला सोडवा; असें मी बोलिलें. तें न ऐकतां आतां फार बोललीस तर ह्या तरवारीनें तुझें डोकें उडवून येथेंच तुला पुरून टाकीन, असें क्रोधानें बोलून मला झोंबून माझा उपमर्द केला. तेथें कोणी पाहण्यास नव्हतें. एक मोठा हिरवा पोपट पितळेच्या पिंजऱ्यांत होता. त्याला बोलतां येत असतें तर तो माझा साक्षीदार झाला असता. ह्या प्रमाणें माझी हुरमत घेतल्या नंतर हा चंदेरी शेला मला देऊन त्यांनीं सोडून दिलें. फडणिसांकडे जावें तर कोतवाल त्यांचे चिठीतील; तेव्हां माझी दाद कशी लागेल ! आतां माझा वालीवर खुदा व येथें साहेब. माझा नवरा आल्या नंतर मला टाकून देईल आणि माझी शुद्धि होण्यास दोन हजार रुपये पर्यंत खर्च लागेल; ह्या प्रमाणें बोलून डोळ्यांत अश्रु आणून साहेबां पुढें पडली. तेव्हां तुझा इनसाफ होईल, भिऊं

मको, असें सांगून रेसिडेंट साहेबांनीं तिचें नाव विचारिलें, असें तां बेनुर बेगम बंगाली असें तिनें सांगितलें. त्यावरून तिची सर्व हकीकत टिपून घेऊन तिची याद फडणिसां कडेस साहेबांनीं पाठविली, व तीसोबत नुरबेगम इलाही रवाना केलें. व तिजविषयीं कसा काय उलगडा केला तें उत्तरीं कळविण्यांत यावें ह्मणून लिहिलें. ती याद फडणिसांचे हातीं गेल्यावर त्यांनीं कोतवालास बोलावून आणून त्याला ती दाखविली. कोतवालानें पाहून सर्व मजकूर खोटा आहे असें उत्तर सांगितलें. त्यावरून तुमचे घरीं हिरामण पोपट किती आहेत असें फडणिसांनीं विचारिलें. तेव्हां आपल्यास काळचे दिवशीं ज्याची तारिफ सांगितली तो एकच आहे, असें घाशीराम बोलिले. नंतर पोपटाचा पिंजरा आणावा ह्मणून फडणीसानीं सांगितलें. त्यावरून हिरामण पोपट आणविला. तेव्हां तुह्मी मध्यें कांहीं बोलूं नका असें घाशीरामाला सांगून हिरामण जवळ आणवून नूरबेगमे कडेस बोट दाखवून "हीं गोष्ट सांगते ती खरी आहे काय" असें त्या पक्ष्यास फडणिसांनीं विचारिलें असतां "होय खरी आहे, होय खरी आहे" असें तो बोलिला. तेव्हां सर्व हसून कोतवाला कडेस पाहूं लागले. त्यावरून कोतवालास राग येऊन ह्या पोपटास लुच्चानीं फितविलें आहे असें ह्मणून हातांत काठी होती ती त्यानें जोरानें हिरामणाचे मानेवर मारिली. तेणेंकरून तो दांडीवरून खालीं पडून तडफडून तत्क्षणीं मेला. ते

अनुक्रमणिका

ऱ्हां फडणिसांस व सर्व लोकांस नूरबेगमची फिर्याद खरी वाट ली. पोपटास आणखी विचारावें तर तो मेला. नंतर घाशी रामास नूरबेगमची समजूत करावी लागली.

गोष्ट १४.

एक हैदराबादचा राहणारा समशेरखान मुसलमान घा शीरामाला निजामाचे वैभवाविषयीं गोष्टी सांगत असतां, त्याचे जनानखान्यांत पांचशांवर अनेक जातींच्या स्त्रिया असल्याची त्यानें तारीफ केली. त्यावेळेस वंगैर या नावाचा एक दुसरा यवन तेथें होता. तो बोलला कीं तुह्मी केवळ जनानखान्या च्याच गोष्टी सांगता; परंतु आह्मी तर मर्दाना पाहिला आहे. त्या वरून पुढील बोलणें चाललें.

घाशीराम —मर्दाना ह्मणजे काय?

वंगैर —पादशाह व नबाब वगैरे जसे स्त्रियांचा संग्रह करून त्यांला एका महालांत ठेवितात, त्या प्रमाणें स्त्री राज्यांत तेथील राण्या ज्वान व सुंदर पुरुष मिळवून त्यांला एके ठिकाणीं ठेवितात. त्यास मर्दना ह्मगतात.

घाशीराम —असा मर्दाना कोठें आहे?

बंगेर—चीनचे समुद्रांत मलाका या नावाचें एक द्वीपक ल्प आहे. त्यांत पाटणी ह्मणून देश आहे. तेथें स्त्रीराज्य आहे. राज्यावर स्त्रियेनें बसलें पाहिजे, आणि ज्या स्त्रियेस रा ज्याभिषेक होतो, तिनें लग्न करूं नये, असा तिकडील सांप्रदाय आहे. त्या मुळें तेथील राणी हवे तितके यार ठेविते. आपले मोठे वैभवा करितां तिनें एक मोठा महाल बांधिला आहे. त्यां त आपले देशांतील व इतर ठिकाणांहून सुंदर देखणे पुरुष मि ळवून ठेविते. त्यांस अलंकार भूषणें व चांगलीं वस्त्रें देऊन त्यांची खाण्या पिण्याची बरदास्त उत्तम प्रकारची ठेविते, आणि त्यां पैकीं ज्यांवर राणीची जास्त प्रीति असते, तेबहुधां तिचे रा ज्याचा कारभार चालवितात.

समशेरखान—राणी मरण पावल्यावर तिचे गादीवर को ण बसतें?

बंगेर—मर्दान्यांत ठेविलेले पुरुषां पासून राणीस जी संत ति होते, तींत जी वडील कन्या असती, ती गादीवर बसते.

घाशीराम—मग मर्दान्यांतील पुरुषांचें कसें होतें?

बंगेर—ती मुलगी स्त्री पणांत आली असल्यास मर्दान्यां ची ती मालकीण होते.

घाशीराम—मर्दान्यांत पुष्कळ पुरुष असल्या मुळें तेथील राणीस संतती फार होत असेल.

बंगेर—त्यां देशांत सारीच उत्पत्ति फार होते तेथें बद

अनुक्रमणिका

कें व हंस आहेत. ते एका दिवसांत दोनवेळ आंडीं घालितात, व कित्येक स्त्रियांस तेहेतीस पर्यंत मुलें होतात.

घाशीराम —(आपले शिशांस पीळ देऊन व तोंड रुमालानें पुसून) आमचे सारखा कोणी तेथें गेल्यास राणीस पसंत होईल काय?

वंगैर—तें माझ्यानें सांगवत नाहीं. आपली तस्वीर प्रथम तेथें पाठवावी, नंतर आपण जाण्याचें करावें.

घाशीराम—तस्वीर काढणारा तुमचे कोणी परिचयांतील असेल तर उदईक घेऊन यावा.

वंगैर—बरें आहे. घेऊन येतों तस्वीर काढण्यास हजार रुपये पर्यंत खर्च लागेल.

घाशीराम—हजार रुपयांची बिशाद काय? आह्मी हजार रुपये एका घटकेंत मिळवूं. तस्बीर तेथें कशी पोहोचती होईल?

वंगैर—आमचे दच जातीचे लोक तेथें नेहमीं जात येत असतात. त्यांत आमचे ओळखीचे पुष्कळ आहेत. त्यां पैकीं कोणापाशीं तरी देऊन आह्मी तस्बीर तेथें पोहोचती करूं.

घाशीराम—पाटणी देशांत कोणते जातीचे लोक आहेत?

वंगैर—मुसलमान लोक व आपले हिंदू मूर्तिपूजक लोक आहेत.

घाशीराम—राणी ही कोणते जातीची असते?

अनुक्रमणिका

बंगेर– ती बौद्ध धर्माची असते- परंतु तिचा आचार विचार इकडील हिंदू प्रमाणें नसतो.

घाशिराम–त्याविषयीं कांहीं अडचण नाहीं. येथें मोठमोठे ब्राह्मण यानीं सुद्धां मुसलमान जातीच्या वेश्या ठेविल्या आहेत; व एकवेळ तर असा प्रकार घडला होता कीं, वेदशास्त्रसंपन्न गंगाधरपंडित यांचे घरीं एक सुंदर कुळबीण वर्षदोनवर्षें राहिली होती; व तिला त्याचे पोटची एक मुलगी झाली. पुढें ती कुळबीण कोठें बाहेर गेली असेल, तेव्हां दोन तीन महारांनीं तिला अडवून आमचे फरासखान्यांत आणिलें; आणि त्यां पैकीं एका महारानें सांगितलें कीं ही ठकी माझी लग्नाची बायको आहे. ती बऱ्हाणपुराहून तीन वर्षांवर पळून आली. तिचे शोधास मी व माझा भाऊ व बाप असे फिरत आहों. आमचे महारांचे चाली प्रमाणें तिचे दंडावर व छातीवर गोंदलेलें आहे. तिचे आई बापही आमचे बरोबर आले आहेत. ते वानवडीस राहिले आहेत. त्यावरून चौकशी करितां ती कुळंबीण ह्मणविणारी महारीण ठरली व तिनेंही ती गोष्ट कबूल केली. पुढें वेदमूर्ती गंगाधरपंडित हे प्रायश्चित घेऊन शुद्ध झाले. तेव्हां पाटणीची राणी महारां पेक्षां तर नीच नसेल.

बंगेर—नाहीं, तशी नीच नाहीं. ती तर तक्ताधिपती आहे.

घाशिराम–बरें तर, तुह्मी त्वरा करून तस्बीर काढणारा आणून, तस्बीर जलद तयार करून तेथें पाठविण्याची तजवी

अनुक्रमणिका

ज ठेवावी. खर्चाकडेस कांहीं पहावयाचें नाहीं. जी गोष्ट आरंभिली, ती शेवटास गेली पाहिजे.

गोष्ट १९.

श्रीमंतांचे हत्तीमहालांत एक हत्ती होता. त्याचे नाव युद्धमल्ल होतें. त्याला फार शिकवून तयार केलें होतें तो पाहण्या साठीं घाशीरामा बरोबर दोन इंग्रज एक मार्लेट व दुसरा टामस असे आले होते. तेव्हां त्या हत्ती कडून माहातानें सोंडेनें पाणी घेऊन कारंजा प्रमाणें वर्तुळाकार उडविलें. नंतर सोंडेनें एक मोठा दगडाचा गोळा हत्तीनें उचलून आपले पाठीवर ठेविला. नंतर दोन पायांवर तो उभा राहिला. ह्यां प्रमाणें पाहून टामस ह्मणाला कीं जनावरांचे कर्तबगारीच्या ह्या पेक्षां अधिक चमत्कारिक गोष्टी आह्मांस माहीत आहेत. त्यावरून कोतवाल ह्मणाले कीं त्या कशा काय गोष्टी आहेत त्या सांगाव्या.

टामस—प्राचीन काळीं रोमनलोक हे रंग भूमीवर हत्तीं

सर्व लोकांनीं पाहण्या करतां नाटकें, तमाशे वगैरे करण्याची जागा.

चा तमाशा करीत. त्यांत पोंव्याचे नादावर व तालावर हत्ती चालत. एकदां बारा हत्ती तयार करून रंगभूमीवर आणिले होते. ते सरावर वाटोळ मंडळावर फिरत, आणि निर निराळ्या टोळ्या करून चउफेर पुष्पें उधळून देत, आणि नाचणें पुरें झालें ह्मणजे आप आपले जागेवर उभे राहून गाण्याचा ताल पायानें धरीत. बारा जणांस बारा पलंग तयार केले असत, खाण्यास मेजें मांडिला असत, आणि सहा माद्यान्यांत जनानी पोशाक व सहा नरांस मर्दानी पोशाग घालून त्यांस सुचना करतांच बाराजण पलंगावर जाऊन निजत. नंतर त्यांस इशारा केला ह्मणजे आप आपली सोंड काढून मेजावरून खाने खात; ते जपून फार थोडें खात व दारूचे प्याले त्यांस दिले ह्मणजे अदबेनें ते घेऊन पीत.

घाशिराम--आमचा हत्ती चेंडू उडवून झेलीत असतो.

मालेट– जर्मानिकस या नावाचा एक रोमचा सरदार होता. तो तमाशे करवीत असे. त्यांत हत्तीनीं बर्चीस वर फेकून त्या खालीं आल्या ह्मणजे सोंडेनें झेलाव्या, आणि एकमेकाशीं पट्टा खेळावा, आणि नाच करावा. त्यांनीं दोरावर नाचावें. दोन दोर समांतरानें बांधिलेले असत, त्यांवर चौघानीं चढून एक पाळण्यांत पांचवा हत्ती दुखण्याचें सोंग घेतलेला निजवून तो पाळणा सोंडेनें उचलून त्यासुद्धां दोरावरून चालून जावें. ते हत्ती नुसते आपले तोंडासमोर पुढें चालून जात इतकेंच नव्हे; तर मागचे पायानें मागें सरकून ताल धरून माघारे येत.

टामस–आमचे विलायतेंत थोडके काळा पूर्वीं रंगभूमीवर एक हत्ती आणिला होता. ती माद्दानी होती. ती समारंभानें निरवत आली, आणि हाताचा इशारा होतांच गुढगे टेकून बसली आणि राजाचें सोंग आलें होतें, त्याचे शिरावर तिनें राजमुगुट ठेविला.

घाशीराम–आमचे ग्रंथांत कथा आहेत, त्यांत ज्यावेळेस जानकीचें स्वयंवर झालें, व रावण धनुष्य पायाचे आंगठ्यानें उचलतांना पडला, तेव्हां सीता ही हत्तीवर बसली होती व त्या हत्तीचे सोंडेंत माळ दिली होती. ती माळ त्यानें रामचंद्राचे गळ्यांत घातली. तसेंच द्रौपदीचे विवाहांत अर्जुनानें खालीं तेलांत माशाचें प्रतिबिंब पाहून वर त्या माशाचा डोळा तिरानें विंधिला, ते समयीं हत्तीनेंच अर्जुनाचे गळ्यांत माळ घातली होती.

टामस—एका हत्तीस झांज वाजविण्यास शिकविलें होतें. त्यापैकीं झांजाचीं दोन पुडें दोन ढोपरांस बांधीत व तिसरें पुड हत्ती सोंडेनें धरी, आणि गत वाजवी, व गतीवर दुसरे हत्ती त्याचे सभोवतीं नाचत. त्यांत बेताल होत नसे.

घाशीराम–आमचे हत्तीस शिंग फुंकतां येतें.

· **टामस**– त्यांत अवघड नाहीं. इस्थंबोल म्हणून तुर्कदेशचें शहर आहे. तेथें एक हत्ती होता. तो चेंडू खेळत असे, तेव्हां मनुष्या प्रमाणें त्यानें चेंडू इकडे तिकडे उडवावा आणि सोंडेनें झेलावा. दुसरा एक हत्ती होता. तो दोन तीन अक्षरें लिहितम

से. त्याला मनुष्यानें अक्षराची अकृति दाखविली म्हणजे त्याप्रमाणें त्यानें पाटीवर अक्षरें काढावीं.

घाशीराम—आमचा हत्ती लिहित मात्र नाहीं. परंतु दुसरें सांगितलें काम करितो.

टामस—काम करावयाचे प्रकार आमचे वाचण्यांत व पाहण्यांत फार आले आहेत. सकाळचे प्रहरीं उठून केरसुणी घेऊन झाडावयास व नदीवर जाऊन पाणी आणून दारापुढें शिंपडावयास हत्तींस शिकवतात. जहाजें जमीनी वरून समुद्रांत लोटण्यास हत्ती लावीत. त्यांत एकवेळ एका हत्तीनें इतकें बळ एका जहाजास मस्तकाची ठेप देऊन केलें कीं, त्याचें मस्तक तेथेंच फुटून तो मेला. एकदां एक मजबूत भिंताड पाडण्यास दोन हत्ती लाविले होते. त्यांनीं आपल्या सोंडा दुमडून त्या भिंताडावर फार वेळ पर्यंत मोठे जोरानें धके दिले; शेवटीं ते भिंताडापासून पळून दूर झाले, इतक्यांत भिंताड पडलें.

घाशीराम—आमचा हत्ती माहाताचे पोरास खेळवीत असतो.

मालेट—तशा गोष्टी फार आहेत. माहाताचे बायकोस बाहेर जावयाचें असलें म्हणजे तिनें आपले मुलांस हत्तीचे स्वाधीनें करावें; पोरास जेथें बसविलें असेल तेथून तें रांगत हत्तीचे पायांत शिरलें; तरी पाय न लागूं देतां हत्तीनें त्याला तेथून सोंडेनें उचलून जिकडील तिकडे बसवावें; पाळण्यांत मुलगें असलें तर त्यावरील माशा सोंडेनें उडवाव्या आणि तें रडूं लागलें तर

पाळणा हळू हळू हलवून त्या लेंकरास झोंप येईल असें करावें; अशा हत्तींच्या पुष्कळ गोष्टी आहेत.

घाशीराम—हत्ती हे इतके बळकट असून रानांतून मनुष्याचे हातीं कसे येतात?

टामस—हत्ती धरण्याच्या अनेक युक्ति आहेत. त्यांत एक अशी आहे कीं ज्या रानांत हत्ती असतात, तेथें एका दिवसांत एक मोठा खंदक करून त्यांतील माती चोहोंकडे पसरून देऊन हत्तीला प्रिय असे पाल्यानें तो खंदक झाकून ठेवतात. नंतर त्यांत हत्ती पडला आणि कांहीं दिवस उपाशी राहिला, म्हणजे खंदकास बाहेर निघण्याची वाट करून, खंदकांतील हत्तीस कांहीं वेळ ममता दाखवून त्यास माणसाळून नंतर बाहेर काढून आणितात. दुसरी युक्ती अशी आहे कीं हत्तीची शिकार करण्या करतां पाळलेल्या माद्यान्या घेऊन त्यांजवर हत्तीने रंगाचे वस्त्रांत शिकारी लोक आपल्यास लपवून त्या माद्यांचे पाठीवर पडून त्या मादयान्या रानांत हत्तीचे कळपांत नेतात. मग त्या माद्यान्या कळपांत नर असतात त्यां पाशीं जाऊन त्याला गोंजारूं लागतात व दुसरी माद्यानी नराचे मागील पायांस हळूच पाश घालिते, नंतर शिकारी त्या नरास काबिज करून आणितात.

मलेट—दुसरी चमत्कारीक हत्ती धरण्याची युक्ती अशी आहे कीं रानांत एका मेकाचे लगत दोन खंदक करून त्या दोन खंदकांचे दरम्यान एक हत्तीस जपून जाण्यापुरता बांध ठेवितात, आ

अनुक्रमणिका

णि खंदकांत कांहीं झाडांच्या डाहळ्या टाकितात. नंतर पाळलेला व शिकविलेला हत्ती त्या रानांत सोडून देतात, तो आपले कळपांत जाऊन त्या बरोबर कांहीं दिवस राहतो. नंतर ज्या ठिकाणीं खंदक केले असतात, त्या मार्गानें आपले सोबत्यांस आणितो, आणि आपण सर्वांचे पुढें होऊन खंदकाचे बांधावरून सहजीं जावयाचें करितो. तेव्हां त्याचे मागून दुसरे हत्ती येतात. नंतर बांध संपण्याचा सुमार आला ह्मणजे तो घाबरल्या प्रमाणें करून किंकाळून धावूं लागतो. तेव्हां त्याचे पाठीमागील हत्ती खरेच घाबरून धावूं लागतात; आणि कांहीं खंदकांत पडतात. नंतर पाळलेला हत्ती घरीं येतो. मग शिकारी लोक जाऊन खंदकांतील हत्ती धरून आणितात.

घाशीराम— आमचे हत्तीस एका पोरानें सोंडेवर एकवेळ दगड मारिला. त्यावरून त्या पोराचे आंगावर धावून त्याची तंगडी सोंडेंत धरून त्यानें त्याजला भिरकावून दिलें, तें एका घराचे छपरावर जाऊन पडलें. त्यास फार लागलें होतें. पुढें तें मेलें.

टामस— हत्तीस उपकार व अपकार याचें ज्ञान आहे व त्याची अठवण तो फार दिवस ठेवितो. दिल्लीस एक शिंपी होता. त्याचे घराकडून एक हत्ती जाऊं लागला ह्मणजे त्याला शिंप्यानें आपले खिडकींतून कांहीं फळ अथवा मिठाई द्यावी. एका दिवशीं शिंपी कांहीं रागांत असतां हत्ती त्याचे दारावरून जाऊं

लागला, तेव्हां नित्य क्रमा प्रमाणें हत्तीनें त्याचे खिडकींत सोंड घातली. त्यावेळीं शिंप्यानें त्याच्या सोंडेस सुई टोंचून "जा जा, मजपाशीं देण्यास कांहीं नाहीं," असें तो ह्मणाला. त्यावरून हत्ती कांहीं न करितां चालता झाला. पुढें जातांना दुर्गंधीचें पाणी एका ठिकाणीं जमलेलें त्यानें पाहिलें, त्यांतून आपली सोंड भरून घेऊन, परत शिंप्याच्या घराकडे येऊन, त्याचे खिडकींत सोंड फुंकून देऊन, तेथील सर्व जागा व कपडे हीं नासून टाकिलीं. पारिस शहर फरासिस लोकांची राजधानी आहे. तेथें एक सरकारचा हत्ती होता. त्याला तमासगीर लोकांनीं कांहीं खाण्यास देऊं नये ह्मणून त्या हत्ती पाशीं एक बंदुकवाला पहारेकरी असे. इतकें असतां एक बाई त्या पहारेकऱ्याची नजर चुकवून हत्तीस नित्य भाकर देत असे. एका दिवशीं पहारेकऱ्यानें भाकर देतांना तीस पाहिलें. त्या वरून त्या बाईस तो रागें भरणार तों हत्तीनें त्या पहारेकऱ्याचे तोंडावर सोंडेतून पाणी फुंकलें. तेणें करून सर्व तमासगीर लोक हसूं लागले. नंतर पहारेकरी यानें रुमालानें तोंड पुसून तमासगीर लोकांस तो पुन्हा ताकीद देऊं लागला. त्यावरून हत्तीनें त्या पहारेकऱ्याचे हातांतील बंदुक सोंडेनें हिसकून घेऊन, पायाखालीं दाबून, ती पिळून मग त्या पहारेकऱ्यास परत दिली.

घाशीराम—तुमचे हत्ती कसे असतील ते असोत. परंतु आमचे हत्तीचे शहाणपणाची बरोबरी त्यांस व्हावयाची ना

हीं. एके दिवशीं **मुळा** नदीस पूर आला होता. तेव्हां **ओं कारेश्वरा** जवळ ब्राह्मण लोकांची स्मशानभूमी आहे, तेथें म हात हत्तीस घेऊन गेला होता, तो नदींत पोंहावयास शिरला. तों पोहतां पोहतां नदीचे जोराचे ओघांत सांपडून वाहत जाऊं लागला. तेव्हां "बुडालोंरे बुडालों" ह्मणून आरोळ्या मारून तो बुचकळ्या खाऊं लागला. त्या वेळेस कडेस पुष्कळ लोक होते; परंतु कोणी त्याला काढण्यास धजेना. मग तो वाहत आहे हें हत्तीनें पाहून तो तिकडून मोठ्या सपाट्यानें निघून न दी तिरानें अजमासें पावकोस पुढें गेला, आणि नदींत उडी घालू न वाहत येणारे महाता समोर येऊन त्याला सोंडेनें धरून आप ले मस्तकावर त्यानें बसविलें. नंतर हत्ती महाता सुद्धां दोनती न कोश वाहत जाऊन पुढें किनाऱ्यास लागला, आणि महाता सु द्धां **पुण्यास** परत आला.

टामस—ही गोष्ट मोठी स्तुत्य आहे खरी; परंतु ह्या पे क्षां जास्त चमत्कारिक हत्तींचे शहाणपणाच्या गोष्टी आम्हास माहित आहेत. त्यां पैकीं एक दोन सांगतों. तुम्ही दक्षिण समुद्रांतील ज्या बेटास **लंका** ह्मणतां, त्या बेटांत हत्ती फार आहेत. तेथें एका गांवीं चुन्यानें व विटांनीं बांधिलेलें एक मजबूत कोठार धान्यानें भरलें होतें. तें राखण्या करितां कांहीं शिबंदी पैकीं पायदळ लोक होते. त्यांला शेजारचे गांवीं कांहीं बंडा वा झाल्याचें कळल्यावरून तिकडे तावडतोब जावें लागलें; ह्म

णून कोठारास मोठें कुलूप लावून सर्व लोक गेले. तितक्या संधि पाहून हत्तींचा कळप कोठारा जवळ आला, आणि दांडनें पराकाष्ठेचे श्रम करून त्यांनीं कोठार फोडलें, आणि पाळीपाळीनें आंत शिरून पोट भरून धान्य खालें; व शिबंदीचे लोक परत फिरून जवळ आले याची खबर ठेवून सर्व हत्ती नाहींसे झाले. दोघे हत्ती एका विहिरीवर महातांनीं पाणी पाजण्यास नेले होते. त्यांत एक हत्ती दुसऱ्या पेक्षां अंमळसा लहान होता. त्याचे महता पाशीं चांमड्याची बादली होती, ती तो लहान हत्ती सोंडेंत धरून विहिरींतून पाणी काढून पिऊं लागला, तें पाहून मोठे हत्तीनें ती बादली त्यापासून हिसकावून घेतली. तेव्हां दोघां महातांची शिव्या गाळी फार झाली, आणि मोठा हत्ती बादली देईना. मग झोंबी करण्यास लहान हत्तीचें सामर्थ्य नाहीं ह्मणून तो उगाच उभा राहिला. नंतर मोठा हत्ती विहिरीचे काठावर येऊन बादली पाण्यांत घालून पाणी काढून पिऊं लागला. तें पाहून लहान हत्तीनें तिकडून निघून जाण्या सारखा आव भाव दाखवून तो हळूं हळूं मोठ्या हत्तीचे मागल्या बाजूस आला आणि एकदम मस्तकाचा धक्का त्या मोठे हत्तीस देऊन त्यानें त्यास विहिरींत उलथून पाडिलें; तो पाण्यावर तरूं लागला; परंतु त्याला बाहेर काढण्याची युक्ति कोणास सुचेना. नंतर त्याचे महातानें तेथलें तेथें त्या हत्तीला लाकडांचीं ओझीं एकावर एक रचून ढीग करण्याचें शिकविलें आणि त्याचे सोंडेंत भारे देऊन हत्तीनें ते भारे आप

ले पायां खालीं धरून त्यांचा ढीग केला, आणि त्या ढिगावर चढून हत्ती बाहेर निघाला.

गोष्ट १६.

घाशीराम हा रिकामपणीं यज्ञेश्वर या नावाचे एका शास्त्रया बरोबर वेदांत विषयावर बोलत बसलाहोता. इतक्यांत त्याला भेटण्यास पेदरू ह्मणून एक पाद्री व फिरोजशा दस्तूर असे आले. ते बसल्यावर, जवळ सैयद हुस्सनुदिन काजी राहत होता, त्यालाही बोलावून आणविलें, नंतर घाशीरामानें शास्त्री बावांस विचारलें कीं, आपले शास्त्रांत सृष्टीच्या उत्पत्तीचा प्रकार कसा वर्णिला आहे तो सांगावा ? त्या वरून बोलणें चाललें.

शास्त्री—आपले वेद चार आहेत. त्यांत एक ऋग्वेद, दुसरा यजुर्वेद, तिसरा सामवेद व चवथा अथर्वणवेद असे आहेत. त्यां पैकीं पृथ्वीचे पहिले कल्पांत तीन निघाले. त्यांत ऋग्वेद अग्नींतून निघाला; यजुर्वेद वायू पासून निर्माण झाला; सामवेद सूर्यानें दिला. पुढें ते वेद शंखासुर दैत्यानें चोरून नेल्यावर दुसरे कल्पांत ब्रम्हदेवानें वेद सांगितले. ते पुढें

अनुक्रमणिका

वेद व्यास यांनीं लिहून त्यांचे चार विभाग केले. तेव्हां पासून चार वेद झाले. इतिहास व पुराणें यांला पांचवा वेद असें ह्मण तात. चार वेदां पैकीं तीन वेदांत यज्ञ याग याचे मंत्र व संस्कार व आचार व धर्म सांगितले आहेत, आणि **अथर्वण** वेदांत प्रायश्चित्ताचे प्रकार व धनुर्विद्या हीं सांगितलीं आहेत. वेदांच्या अनेक संहिता ह्मणजे जे विभाग. आहेत. त्यांस शाखा म्हणतात. **ऋग्वेदा**च्या संहिता सोळा आहेत; त्या कोणी पांच मोजितात. **यजुर्वेदा**च्या एकशे एक शाखा आहेत. त्या कोणी शायशी धरतात. **साम**वेदाच्या संहिता हजारांवर आहेत, आणि **अथर्वण** वेदाच्या नऊ संहिता आहेत. त्या शाखांचीं नावें **आश्वलायन, सांख्यायन, कात्यायन, वाजसनेयी, हिरण्यकेशी**, वगैरे आहेत. वेदांवर अनेक भाष्यें म्हणजे टीका केलेल्या आहेत. त्यां वरून व भागवत ग्रंथा वरून पाहतां असें कळतें कीं प्रथम सर्व अंधकार होता. त्यांत **विश्वात्मा** मात्र वसत असे. त्याचा मानस लोक निर्माण करावे असा झाला. त्यावरून त्रैलोक्य म्हणजे स्वर्ग, मृत्युलोक व पाताळ हीं निर्माण केलीं. पुढें पुरुष उत्पन्न केला. त्याचे मुखांतून अग्नि निघाला; नाशिकेतून श्वास निघाला, त्यापासून वायु झाला; नेत्रांपासून सूर्य प्रगटला; कर्णापासून आकाश झालें; त्वचेपासून रोमें निघालीं, आणि त्यांपासून वनस्पति व वृक्ष झाले; हृदयापासून मन होऊन त्या मनापासून चंद्र झाला; नाभीपासून अपान निघुन त्यापासुन मृत्यु झाला; प्र

जापती पासून उत्पतीचें बीज झालें, व तेथूनच जल आलें. ह्या प्रमाणें देवता उत्पन्न झाल्या व अवजड सागरांत पडल्या. तेव्हां क्षुधेनें व तृषेनें व्याकुळ होऊन आम्हास लघुआकृति द्यावी म्हणजे अन्न भक्षण करूं, असें मागणें त्यांनीं मागितलें. त्यावेळीं त्याला गोस्वरूप दाखविलें. तें त्यांचे मनास आलें नाहीं. नंतर अश्वरूप दाखविलें. तेंही त्याला पसंत होईना. मग नर स्वरूप दाखविलें, तें त्यांला रुचलें. त्यावरून आपआपले स्थळीं जाण्याची त्यांस आज्ञा झाली; तेव्हां अग्नि हा वाचा होऊन मुखांत शिरला; वायु हा श्वास होऊन नाशिकेंत गेला; सूर्य हा दृष्टि होऊन त्यानें नेत्रांत प्रवेश केला; आकाश हें श्रवण होऊन कर्णांत गेलें; वनस्पति व वृक्ष हे रोमें होऊन त्वचेवर बसले; चंद्र हा मन होऊन हृदयांत प्रवेश करिता झाला; मृत्यु हा अपान होऊन नाभींत गेला; आणि जल हें उत्पत्तीचें बीज होऊन प्रजापतीचे ठायीं वास करितें झालें. त्यानंतर क्षुधा व तृषा यांनीं जागा मागितली. तेव्हां त्यांस सर्व देवतेचे ठायीं वास करण्यास सांगितलें. नंतर जलापासून अन्न निर्माण केलें, आणि जलास आकृती येतांच चलन येऊन तें धावूं लागलें. तेव्हां पुरुषानें वाचेनें, श्वासानें, दृष्टीनें, श्रवणानें, त्वचेनें, मनानें, व प्रजापतीनें जलास अडविण्यास यत्न केला; परंतु त्यांनीं तें राहीना. इंद्रियाचे सामर्थ्यानें जल उभें राहिलें असतें, तर अन्नाचें नांव घेतल्यानें, अथवा तें पाहिल्यानें, अथवा तें ऐकिल्यानें, अथवा त्यास स्पर्श केल्यानें,

अथवा स्खलित झाल्यानें क्षुधेची तृप्ति होती. शेवटीं पुरुषानें अपानाचे योगानें जलाचा अवरोध करण्याचें मांडिलें, तेव्हां त्याच्यानें तें थांबलें. नंतर आत्मा हा पुरुषांत प्रवेश करिता झाला. नंतर पुरुष हाच विश्वात्मा आहे असें होऊन "अहं" ह्मणजे "मी आहें" असा शब्द निघाला, आणि सर्वात्मा सर्व देहांत असल्याची अद्यापि अशी खूण आहे कीं "कोण रे तूं" असें कोणा मनुष्यास विचारलें ह्मणजे "मी आहें" असें प्रथम उत्तर देतो. असा पुरुषांत आत्म्यानें प्रवेश केल्यावर एकट्यास आनंद वाटेना. दुसरें कोणी असावें अशी त्यास वासना झाली. तेव्हां मैथून समयीं जशी आकृति असते, ती प्रमाणें पुरुषाचें शरीर झालें. नंतर दोन विभाग बरोबर झाले. तेव्हां प्रकृति व पुरुष अशीं दोन निराळीं झालीं. त्या उभतां पासून मनुष्यें उत्पन्न झालीं. मग प्रकृतीस असें वाटलें कीं मी पुरुषा पासून उत्पन्न झालेली असतां मजशीं पुरुष संग करितो हें शुद्ध नाहीं. नंतर तिनें गाईचें रूप धारण केलें, तें पाहून पुरुष हा सांड झाला. त्यां पासून गुरें ढोरें उत्पन्न झालीं. नंतर प्रकृति ही शिंगी झाली. तेव्हां पुरुष हा वळू झाला. त्यां पसून घोडीं झालीं. ह्या प्रमाणें सर्व चतुष्पदें व जीव जंतु व पक्षी व किडी मुंगी यांची जननी प्रकृति व जनिता पुरुषहीं त्यांचे त्यांचें स्वरूप घेऊन त्यांस त्यांस उत्पन्न करतीं झालीं. शास्त्रांत असे दुसरेही कांहीं प्रकार सांगितले आहेत. परंतु सदरीचा मुख्य प्रकार दिसतो.

अनुक्रमणिका

घाशीराम—(पाद्रीकडेस पाहून)शिनोर पेदरू, तुमचे ध र्मांत कसें लिहिलें आहे?

पाद्री —आमचें मख्य धर्मपुस्तक पवित्रशास्त्र ह्मणून आहे. त्यांत जुना करार व नवा करार असे दोन मख्य भाग आहेत. त्या पैकीं जुने करारांत असें सांगितलें आहे कीं ईश्वरानें प्रारंभी आकाश व पृथ्वी हीं उत्पन्न केलीं. पृथ्वी अस्ताव्यस्त व शून्य होती आणि जलाशयाच्या पाठीवर अंधार होता. त्रिइशात्मा पाण्याचे पाठीवर हलत होता. नंतर प्रकाश उत्पन्न केला. नंतर प्रकाश व अंधकार हे निराळे केले. नंतर प्रकाशास दिवस हें नाव दिलें, आणि अंधारास रात्र असें ह्मटलें, त्याप्रमाणें पहिला दिवस झाला. नंतर ईश्वरानें जलांत अंतराल उत्पन्न केले, आणि त्या अंतराला खालचें जल व वरचें जल यांस वेगवेगळे केलें, आणि अंतरालास आकाश हें नाव दिलें. तो दुसरा दिवस झाला. नंतर ईश्वराज्ञेनें आकाशा खालचें पाणी एका ठिकाणीं जमलें आणि कोरडी भूमी निघाली. तेव्हां कोरडे भुमीस पृथ्वी असें नाव दिलें आणि पाण्याचे संचयास समुद्र म्हटलें, नंतर पृथ्वीवर ईश्वराज्ञेनें बीज देणारें तृण व हिरवळ आणि फळ देणारे वृक्ष उत्पन्न झाले. हा तिसरा दिवस झाला. नंतर अंतरालांत दोन मोठ्या ज्योती केल्या. त्यांपैकीं जी मोठी ज्योती ती दिवस चालविण्यासाठीं आणि जी लहान ज्योती ती रात्र चालविण्या साठीं अशा नेमिल्या, आणि तारे उत्पन्न केले.

हा चवथा दिवस झाला. नंतर पाण्यांत जीव जंतु व पृथ्वीवर पक्षी उत्पन्न केले. त्यांत पांचवा दिवस संपला. नंतर ग्रामपशु आणि वनपशु व भुमीवर वळवळणारे जीवजंतु उत्पन्न केले. नंतर ईश्वरानें आपले प्रतिमे सारिखा पुरुष उत्पन्न केला व स्त्री उत्पन्न केली. त्यांत साहवा दिवस समाप्त झाला. सातवे दिवशी ईश्वर स्वस्थ राहिला आणि त्या सातवे दिवसास ईश्वरानें आशीर्वाद देऊन पवित्र केलें. तो दिवससप्तकांतील शनवार आहे मनुष्यांचे उत्पत्ती विषयींचें असें व्याख्यान आहे कीं, परमेश्वरानें भूमींतील मृत्तिकेचा प्रथम पुरूष घडिला आणि त्याच्या नाशिकांत प्राणवायु फुंकिला. नंतर परमेश्वरानें त्या पुरुषास ईदनांतील बागेंत ठेविलें, आणि सर्व झाडांचीं फळें खावीं, परंतु बरें व वाईट यांचें ज्ञान होण्याचे वृक्षाचीं फळें खाऊं नये, जर खाशील तर मरशील, अशी आज्ञा केली. त्या पुरुषाचें नाव आदाम ठेविलें. पुढें आदामावर गाढ झोंप आणून त्याचे फासळींतून एक फासळी घेऊन त्या ठिकाणीं मांस भरलें आणि काढिलेले फासळीची स्त्री करून आदामापाशीं आणिली तिला ईषा असें नांव ठेविलें, कारण कीं, ईष ह्मणजे पुरुष यांतून निघालेली. ते समयीं पुरुष व स्त्री नग्न असतां त्यांला लज्जा वाटत नव्हती. नंतर सापाचे शिकवणीनें ईषा इनें ज्ञान वृक्षाचें फळ खालें आणि नवऱ्यास ही दिलें. तेव्हां आपण नग्न आहों, असें त्यांला कळलें. नंतर त्यांनीं अंजिराचीं पानें शि

हून आपणास नेसावयास वस्त्रपट्या केल्या. नंतर **ईश्वरानें** सापास असा शाप दिला कीं, तूं आपल्या पोटानें चालशील, आणि सर्व काळ तुझें भक्षण मृत्तिका होईल, आणि तुझें व मनुष्याचें निरंतर वैर होईल, तीं तुझें मस्तक फोडतील, व तूं त्यांची टांच फोडशील. नंतर **ईवा** इला सांगितलें कीं तू प्रसूत होतांना कष्ट पावशील, व तुजवर तुझे नवऱ्याची सत्ता राहील. मग **आदामास** सांगितलें कीं तुज करितां भूमीस शाप आहे. तूं श्रम केल्यावाचून तींतून तुला खाण्यास मिळणार नाहीं, आणि तूं मातींतून आलास, तींतच अंतीं जाशील. त्या नंतर **आदामा**नें आपले बायकोचें नाव **हव्वा** असें ठेविलें. त्यां पासून मनुष्यांची उत्पत्ति झाली. असें वर्णन आमच्या शास्त्रांत आहे. सृष्टि निर्माण झाली, ती आमचे इसवी सनाचे पांच हजार वर्षां पूर्वीं झाली.

घाशीराम —(काजीकडेस पाहून) तुमचे शास्त्रांत कसें काय आहे?

काजी —आमचें धर्म पुस्तक **कुराण** आहे. त्यास कलामे शरीफ ह्मणजे अत्युत्कृष्ट वचन व कलामुल्ला ह्मणजे ईश्वरी वचन असें ह्मणतात. त्यांतील मजकूर आमचे पैगंबर **महंमद** झाले, त्याला परमेश्वरानें स्वमुखानें सांगितला. त्या **कुराणांत** आमचे आचार विचार सर्व लिहिले आहेत, आणि **तसस्मूलऐ** ह्या नावचा आरबी भाषेंत आमचा ग्रंथ आहे, त्यांत सृष्टीच्या उत्पत्ती वि

अनुक्रमणिका

षयीं असें लिहिलें आहे कीं प्रथमारंभीं काहींच नव्हतें. परमेश्वरानें पहिल्यानें **महंमद मुस्तफा** याची नूर ह्मणजे तेज उत्पन्न केलें. त्या तेजानें बारावर्षें परमेश्वराची प्रार्थना करण्या कडेस घालविलीं. नंतर त्या तेजाचे परमेश्वरानें चार विभाग केले. त्यांत एक आनंदभुवन, दुसरी लेखणी, तिसरा स्वर्ग, चवथा आत्मा. नंतर त्या चार वाट्यांतून दुसरे चार वाटे केले. त्यां पैकीं एकाचे खुद **महमद** झाले; दुसऱ्या पासून बुद्धि झाली; तिसऱ्या पासून लज्जा निर्माण झाली; व चवथ्या पासून प्रीति झाली. त्या पुढें **महंमदाचे** तेजा पासून सर्व जग उत्पन्न झालें. त्या नंतर लेखणीस आनंदभुवनावर लिही अशी आज्ञा झाली. ती वरून **"ला ईला ईललाह"** ह्या प्रमाणें लेखणीनें चारशे वर्षें पर्यंत लिहिलें. नंतर **'महमदूर रसू लूलाहे'** असें आणखी लिही अशी आज्ञा झाली. तेव्हां **'ला ईलाह ईललाह महमदूर रसूलूलाहे'** असें लिहिलें. त्याचा अर्थ असा आहे कीं, परमेश्वरा शिवाय दुसरा कोणी पूज्य नव्हे, व **महमद** हे परमेश्वराचे पैगंबर आहेत. ह्या प्रमाणें लिहितांच लेखणीची जिव्हा चिरली. त्या मुळें आतां लेखणीचे टाकास चिरल्या वांचून अक्षर निघत नाहीं. ह्या प्रमाणें लेखणीची जिव्हा चिरल्या नंतर आनंद भुवनावर १८००० बुरूज उत्पन्न झाले, आणि दरएक बुरजांत १८००० स्तंभ उभे राहिले. दर स्तंभास १८००० कंगोरे आहेत, आणि एका कंगोऱ्या पासून दुसरे कंगोऱ्या

अनुक्रमणिका

र्थ यांचीं नावें त्या पाटीवर लेखणीनें लिहिलीं. नंतर पाटीस अहं कार होऊन ती हलूं लागली, व मजपेक्षां जगांत कोणी श्रेष्ठ नाहीं असें तिला वाटलें. त्या वरून सर्वांचा कर्ता मी आहें असा ध्वनि निघाला. तेव्हां पाटीचा गर्व उतरला. नंतर मोत्यास आज्ञा झाल्यावरून तें विस्तीर्ण झालें. त्याचें नांव कुरसी ठेविलें. त्या खालीं दुसरा एक मोत्याचा दाणा झाला. त्याची लांबी व रुंदी ५०० वर्षांचे मार्गा इतकी होती. नंतर ह्या मोत्यावर परमेश्वराची नजर पडतांच त्याचें पाणी झालें. नंतर चार दिशांचा वायु उत्पन्न झाला. त्यापासून धूम्रयुक्त अग्नि निर्माण झाला. मग धूम्र निराळा होऊन कुरसीचे व पाण्याचे दरम्यान निराधार राहिला. त्या धूम्राचे सात तुकडे झाले. त्यां पैकीं एका पासून जल, दुसऱ्यापासून तांबें, तिसऱ्यापासून लोखंड, चवथ्या पासून रुपें, पांचव्या पासून सुवर्ण, सहाव्या पासून मोती, सातव्या पासून माणकें उत्पन्न झालीं; आणखी त्याच सात भागांतून सात अस्मानें निर्माण झालीं. त्या एका अस्माना पासून दुसरे अस्माना पर्यंत ५०० वर्षांचा मार्ग आहे. पाण्यावर फेस आला. त्या पासून तांबडी माती उत्पन्न झाली. त्या ठिकाणीं हल्लीं आमची पवित्र मक्का हें ठिकाण आहे. ती माती चार दूतांस पसरण्यास सांगितली. तेव्हां पृथ्वी झाली. ती पाण्यावर तरंगली, आणि तिनें डळमळूं नये ह्मणून तिजवर एक पर्वत ठेविला. त्याला आह्मी कोहेकाफ ह्मणतों, आणि ह्मैं

दू हे मेरु म्हणतात. त्या पर्वताची प्रदक्षणा करण्यास दोन हजार वर्षे लागतात. पृथ्वी निर्मिल्या पूर्वी सात दिवस उत्पन्न केले. त्यांत रविवारचे दिवशीं आनंदभुवन उचलणारे दूत झाले. सोमवारीं सात अस्मानें झालीं मंगळवारीं सात तबकें पृथ्वी झाली. बुधवारीं अंधःकार उत्पन्न झाला. गुरुवारीं भूमीवरील सर्व उत्पत्ति झाली. शुक्रवारीं सूर्य, चंद्र व तारे निर्माण झाले, व त्यांला गती आली. व शनिवारीं परमेश्वर स्वस्थ राहिले. पुढें स्वर्गांतील चार दूतांस पृथ्वी वरून एक मूठभर माती आणण्यास सांगितली. ती तिघांच्यानें आणवली नाहीं. चवथ्यानें माती घेऊन पहिले अस्मानांत नेली. तेथें पर्जन्य वृष्टी होऊन ती माती दोन वर्षांनीं मृदू होऊन तिचा गारा झाला. चवथे वर्षी त्या मातीस लांब आकार झाला. पुढें सहावे वर्षी फुगारास आली. आठवे वर्षी पुतळा झाला. तो **आदाम** होय. त्यापुढें चाळीस दिवसांनीं त्या पुतळ्यास इद्रियें उपजलीं. नंतर नाशिकांतून प्राणात्मा पुतळ्यांत शिरला. तेव्हां त्यानें नेत्र उघडले. नंतर त्याला मांस, चर्म, अस्थि, व त्वचा हीं उत्पन्न झालीं, तेव्हां पहिले अस्मानांत सर्व दूतांनीं त्याला नमन केलें. एक **अजाजील** ह्मणून दूत होता. तो मात्र नमला नाहीं. यास्तव परमेश्वरानें त्या दूतास **सैतान** केलें. त्या नंतर **आदाम** याला सहावे अस्मानांत नेलें. तेथें आपले योनीचे कोणी नाहीं असें पाहून त्यास बरें वाटेना. तेव्हां त्याला निद्रा आणली आणि एका दूतांचे हातानें त्याचे

अनुक्रमणिका

डावे कुशींतून एक फांसळी काढविली; तिची **हव्वा** केली. नंतर **आदाम** याला जागृत केलें, व त्याचें व तिचें लग्न लावून उभयतांस स्वर्ग भुवनीं ठेविलें; आणि सर्व पदार्थांचें सेवन करावें, गव्हाचे झाडा पाशीं मात्र जाऊं नये, व त्याचे दाणे खाऊं नये, अशी त्यास आज्ञा केली. त्या नंतर **सैतान** हा मयूर पक्ष्याचे सहायानें स्वर्गांत शिरून सापाचे मुखांत घुसला. नंतर त्या सापाचे शिकवणीनें **हव्वा** इनें गव्हाचे तीन कण घेतले. त्यां पैकीं आपण एक भक्षिला आणि राहिलेले दोन कण **आदाम** याला तीं देऊं लागली. ते तो घेईना. तेव्हां त्याला एक मद्याचा प्याला तिनें पाजला, व तो शुद्धीवर नाहींसा झाल्यावर गव्हाचे दोन दाणे त्याचे मुखांत घातले. ते त्याचे घशांत उतरले न उतरले इतक्यांत त्याचे मस्तकावरील मुगूट खालीं पडला, व तो सिंहासनावरून पडला, व उभयतां नग्न झालीं. त्यावर तीं दोघें अंजिराचे झाडाजवळ जाऊन त्याचीं पानें घेऊन त्यांनीं आपलीं शरीरें झाकिलीं. त्यावरून ईश्वरानें त्या झाडास अशिर्वाद दिला. पुढें तीं दोघीं वेडीं झालीं तेव्हां तुह्मी परस्पर द्रोह करावा, असा त्याला शाप झाला; व साप व मोर व **सैतान** यांला पृथ्वीवर वसण्याचें केलें; आणि **आदाम** याला **सिंहलद्वीप** यांत टाकिलें; **हव्वा** इला **खुरासानांत** व मोरास **सीस्तानांत** व सापास **इसपाहानांत** व **सैतान** याला **दमावंद**चे पाहाडावर ठेविलें. व सापास उंटा प्रमाणें चार पाय हो

ते, ते त्या पासून घेतले आणि पोट घाशीत चाल आणि मृति-का भक्षण कर असा त्यास शाप दिला. **आदाम** सिंहलद्वीपांत ४० वर्षें, कोणी ह्मणतात ३०० वर्षें, शोक करीत राहिला. त्याचे अश्रू पडले, त्यां पासून खजूर, लवंगा व जायफळें झालीं. आणि **हव्वा**ही आपले ठिकाणीं रडत होती, तेथें तिच्या अश्रू पासून मेंदी, नीळ, सुर्मा, मोतीं झालीं. नंतर **जबराईल** फिरस्त्यानें **आदाम** याला यात्रा करविण्यास चालविलें. तो निघाला असतां त्यानें जेथें पाऊल ठेवावें, तेथें गांव व्हावे व जेथें त्यानें मुकाम करावा, तेथें नगरें व्हावीं. तो **सिंव्हलद्वीपा** पासून **मके**स गेला. तेथपर्यंत त्याचीं तीस पावलें झालीं. तेथून तो एका पहाडावर **हव्वा** होती, तेथें गेला, तिची भेट झाल्या नंतर, **जबराईल** यानें, त्याच्या दोन्ही भुजास पाचेचे पंख होते, त्या पंखानीं **आदामा**ची पाठ घासली. त्या पासून मनुष्यें उत्पन्न झालीं.

दोझक ह्मणजे नरक लोक जो उत्पन्न केला, त्याचें अद्भूत वर्णन लिहिलें आहे. त्या पैकीं थोडकेंच सांगतों. त्या नरक लोकीं १९ दूत उत्पन्न केले आहेत. त्या एक एकाचे एक एक बाजूस ७०००० सत्तर हजार भूजा आहेत; त्या एका भुजेस ७०००० पंजे आहेत, एक एक पंजास ७०००० सत्तर हजार बोटें आहेत; व एक एक बोटावर एक एक सर्प आहे. त्या एक एक सर्पाची लांबी ७०००० हजार वर्षांचा मार्ग आहे; व एक एक सर्पाचे मस्तकावर एक एक विंचू आहे. तो जर एक डंका मारील तर ७०

अनुक्रमणिका

वर्षें मनुष्य तळमळीत पडेल. आणि त्या १९ दूतांचे डावे बा जूचे हाताचे एक एक बोटावर एक अग्नीचा स्तंभ आहे. नरक लोकास सात दरवाजे आहेत. त्या एक दरवाजावर सदरीं पैकीं एक एक दूत उभा केलेला आहे.

घाशीराम–दस्तुरजी, तुमचें शास्त्र कसें आहे?

दस्तुरजी–आमचा पैगंबर **झरतुस्त** ऊर्फ **झरोस्तर.** तो आमचे लोक **इराण** देशांत असतांना झाला. त्यानें **झंद आवस्ता** म्हणून ग्रंथ लिहिला आहे. तें आमचें शास्त्र होय. त्यावरून व **बन्देहेश** यानांवचा ग्रंथ व इतर कांहीं ग्रंथ आहेत त्यांवरून कळतें कीं, प्रथमारंभीं शुद्ध तेजापासून **होर मजद** म्हणजे परमेश्वर झाला. त्यानें एका वर्षांत सृष्टि निर्माण केली. ती सहा वेळांत केलीं. पहिले वेळीं म्हणजे प्रथमचे दोन महिन्यांत परलोक निर्माण केला. दुसरे वेळांत जल उत्पन्न केलें, तिसरे वेळांत पृथ्वी झाली. चवथे वेळांत वृक्ष केले. पाचवे वेळांत पशु व जिवजंतु केले. साहवे वेळांत माणसें उत्पन्न केलीं. ह्या सहा वेळांस आह्मी **गहंबार** म्हणतों. आमचा मुख्य धर्म असा आहे कीं, अग्नि हा परमेश्वराचें रूप आहे, व सूर्य हा ईश्वराचा दूत आहे. त्यांचे पूजन करावें. आमचे मुळचे ग्रंथ बहुतेक नाहींतसे झाले. कारण कीं, आमचें राज्य बहुत वर्षें **इराण** देशांत होतें आणि आमचे धर्मास मागी धर्म असें नांव होतें. त्यां धर्माचें अजमासें १२०० वर्षें पर्यंत मोठें प्राबल्य त्या देशांत होतें. इतर ध

मांचे लोकांबरोबर आमचे जातीचे पादशाहाच्या नेहमीं लढाया चालल्या होत्या. अंतीं सन ६४१ इसवी सालांत नाहावंदचे मैदानांत आमचा येझदिझर्द पादशाह यानें दीड लक्ष फौज जमवून मुसलमान धर्माचे लोकांबरोबर युद्ध केलें. त्यांत आमचा अगदीं पराजय झाला. सर्व राज्य गेलें. मुसलमान लोकांनीं आमचीं घरें दारें व अग्निपूजनाचीं मंदिरें लुटून त्यांचा नाश केला. जेथें आमचे ग्रंथ त्यांचे हातीं सांपडले, ते तेथेंच त्यांनीं जाळून टाकिले. आणि महंमदी धर्म स्वीकारण्यास जे कबूल झाले नाहींत, त्यांची बायकापोरांसुद्धां त्यांनीं कत्तल मांडिली. तेव्हां आमचे धर्माचे लोक सीस्तान, खुरासान व दुसरे कांहीं ठिकाणीं व पर्वतांत व रानांत, जेथें ज्यास वाट सुचली, तेथें पळून गेले. तेथें ही त्यांची पाठ मुसलमानांनीं पुरविली. तेव्हां राहिलेले आमचे जातीचे लोक गलबतांत बसून कोंकण काठास आले. अनेक ठिकाणीं उतरण्याचा प्रयत्न त्यांनीं केला. शेवटीं संजाण म्हणून उत्तर कोंकणांत जागा आहे, तेथील राज्याबरोबर करारनामा करून तेथें ते राहिले. मग पहिला आतशबेहराम म्हणजे अग्निकुंड त्याजागेंत सिद्ध केलें. आतशबेहेराम नवा सिद्ध करण्यास एक हजार व एक जातीचे अग्नि लागतात; संजाणचे अग्निमंदिरांत इराणाहून अग्नि आणिला होता. पुढें संजाणाहून आतशबेहेराम काढून उदवाडा येथें नेऊन त्या ठिकाणीं त्याचें स्थापन केलें. तेथें अद्यापि तो

अनुक्रमणिका

आहे. आमचे सर्व जातीचा मूळचा एकच पंथ होता. अ. लीकडेस थोडे वर्षांवर साल मोजण्याचे हिशोबांत मतभेद पडून दोन तट झाले; एक **रसमी** ऊर्फ **शहिनसाई** व एक **कदमी** ऊर्फ **चूडीगर**. त्यां पैकीं **कदमी** तटांत अधिक लोक आहेत, व दोन्ही तटांचे लोकांचा अन्नव्यवहार व लग्नसंबंध चालतो. ते एका **आतशबेहेरामा**चे मंदिरांत दर्शनास जातात व **रसमी**चा **कदमी** व **कदमी**चा **रसमी** होतो. आमचे आच्यार्यांस दस्तुर ह्मणतात. उपाध्यायीक करणारे दुसरे लोकांस मोबेद ह्मणतात. ते सर्व हमेशा श्वेतवस्त्रें वापरतात, कृष्ण वर्णाचें वस्त्र पांघरत नाहींत. कारण कीं, आमचे पैगंबराचे सांगण्यांत असें आहे कीं, **होरमझ** ह्मणजे परमेश्वर जे वेळेस शुभ्र व शुद्ध तेजांतून निघाला, ते समयीं **अहरीमान** या नावचा दैत्य अंधःकारांतून प्रगटला, व त्याची कृति व स्वभाव अंधकाराप्रमाणें आहेत. परमेश्वरानें जेव्हां सद्गुणरूपी सहा दूत निर्माण केले, तेव्हां **अहरीमान** यानें दुर्गुणरूपी दूत उत्पन्न केले. त्यामुळें **होरमझ** आणि **अहरीमान** यांची झोंबी चालली एकानें चांगले पशु व वृक्ष व पक्षी उत्पन्न करावे व दुसऱ्यानें वाईट प्राणी उपजवावे. ह्याप्रमाणें उभयतांचे हातून सृष्टीची रचना झाली. **अहरीमान** याचा रंग अपवित्र मानला आहे.

घाशीराम—हा विषय बराच लांबला. असो. एक प्रश्न

अनुक्रमणिका

विचारून कचेरीस जातों. पाद्री शिनोर, तुमचे जातींतील बायका दुसरा नवरा करीत असतात कीं नाहीं?

पाद्री—होय करीत असतात. आमचे धर्मांत व दस्तूरजीचे जातींत विधवा स्त्रियांस एक मेल्यावर दुसरा व तो मेल्यावर तिसरा असे नवरे करण्यास प्रतिबंध केला नाहीं.

शास्त्री— (हंसून व छळून) आमचें शास्त्र पहा कसें उत्तम आहे. स्त्रीचा पति मरण पावला म्हणजे तिनें सती जावें, हा तिचा मुख्य धर्म सांगितला आहे. तें तिच्यानें जर नहोई तर तिनें ब्रंम्हचर्य आचरावें आणि देवाचे सेवेंत आयुष्य घालवावें. पाद्री व दस्तूरजी यांचे जातीचे स्त्रियांनीं पशू प्रमाणें एकामागून एक नवे नवरे करावे असें आहे. यांत धर्म काय राहिला?

पाद्री—(अंमळसा रागावून) ज्याचा धर्म त्यास उत्तम आहे. परंतु ईश्वराकडेस मुख्य न्याय आहे. त्याची प्रीति सर्व जनावर सारखी आहे. त्याचे घरीं पक्षपात नाहीं. खरें खोटें निवडण्याची जी बुद्धि त्यानें मनुष्यास दिली आहे, तिचे द्वारें पाहतां तुमचें आचार शास्त्र पक्षपातानें भरलेलें दिसतें. कारण कीं, ब्रांम्हण नावाचा असला म्हणजे पुरे, मग त्याचें आचरण कसें असेल तसें असो. त्याला सर्वांनीं वंदावें. ब्राम्हणानें दुसरे जातीचे बायको बरोबर व्यभिचार केला तर त्या ब्रांम्हणास गांवाबाहेर घालवून दिलें म्हणजे अति मोठें शासन झालें. जर ब्रांम्हणी बरोबर दुसरे जातीचे पुरुषानें कुकर्म केलें, तर त्या दोघां

स देहांत प्रायश्चित्त द्यावें. ब्रांम्हणास द्रव्य सांपडलें तर तें त्यानेंच घ्यावें. दुसरे जातीचे मनुष्यास सांपडलें तर निमे राजानें घ्यावें, व निमे ब्रांम्हणांस द्यावें. कोणी ब्रांम्हणाचा निर्वंश झाला तर त्याची मालमत्ता दुसरे ब्रांम्हणांनीं वाटून घ्यावी, व नवरा आपले मोतानें मेला म्हणजे त्याचे बायकोनेंआत्महत्या केली पाहिजे. बायको मेली तर नवऱ्यानें हव्या तितक्या नव्या बायका करीत सुटावें. यांत कोणचे गांवचा न्याय आहे तें आमचे बुद्धीस तर येत नाहीं. जर आमचे धर्माचे बायकांचें आचरण शास्त्रीबावा यांचे मतें पशुवत आहे, तर आमचेंही मतें शास्त्रीबावांचे शास्त्रास धर्मशास्त्र ह्मणणें अगदीं शोभत नाहीं.

दस्तूर —पाद्री शिनोर, इतकें भांडण कशास पाहिजे? आफ्रिकाखंडांत कांहीं लोक आहेत. त्यांपाशीं वेद पुराणें कांहीं नाहींत. ते रानटी लोकांप्रमाणें असून त्यांची अशी चाल आहे कीं, नवरा मेला तर नवरीनें व नवरी मेली तर नवऱ्यानें प्रेताबरोबर समाधि घ्यावी. त्यांत कांहीं समता तरी आहे. तसा धर्म ब्रांम्हणांनीं पोथींत लिहिला असता तर मग उत्तमशास्त्र हें नाव त्यांचे ग्रथांस कांहीं तरी शोभतें; तसें कांहीं नाहीं. मला संस्कृत कांहीं समजतें, त्या मुळें हिंदु लोकांचे जुने ग्रंथ माझे पाहण्यांत कांहीं आले आहेत. त्यांवरून तर असें सिद्ध होतें कीं, विधवा स्त्रियांनीं पुनर्विवाह करण्याची त्यांस आज्ञा पूर्वी असे-

त्यां केवळ द्वेषबुद्धीनें ब्राह्मण पुरुष यांनीं, स्त्रियांनीं दुसरा नवरा करूं नये असें आपले आंगचेंच शास्त्र काढिलें आहे.

घाशीराम—कांहो शास्त्रीबावा, हे काय ह्मणतात, पहा ?

शास्त्रीबावा—दस्तूरजी ह्मणतात तसा शास्त्रार्थ निघाला तर, फार तर, काय यज्ञोपवीत तोडून त्यांचे पायांवर ठेवीन, इतकी प्रतिज्ञा करितों.

दस्तूर—बरें आहे. मी आपला ग्रंथ आणवितों, व तो दाखवि ल्या पूर्वीं एक प्रश्न करितों, त्याचे उत्तर शास्त्रीबावानीं कृपा करून द्यावें.

शास्त्रीबावा—काय पुसायाचें असेल तें पुसा. यथामती उत्तर देण्यास सिद्ध आहें.

दस्तूर —शास्त्रीबावा, पाराशर स्मृति व मनु स्मृति व भारत यांवर आपला विश्वास आहे किंवा नाहीं?

शास्त्रीबावा —तीं तिन्हीं आह्मास शिरसा वंद्य आहेत.

येथपर्यंत मोठे आवेशानें बोलणें चालून दस्तुरजी यांनीं आपले शिपायापाशीं चिठ्ठी देऊन पाराशर संहिता व याज्ञवल्क्य स्मृति असे ग्रंथ आणण्यास पाठविलें, आणि भारत हा ग्रंथ कोतवालाचे घरांत होता, तो शास्त्रीबाबानीं आणून दस्तुरजीचे पुढें ठेविला. यावरून दस्तूरजीनें त्या ग्रंथाचे अध्याय शोधून त्यांतून नल आणि दमयंती यांचे आख्यान वाचून दाखविलें.

दस्तुरजी —अहोशास्त्रीबाबा, स्त्रियांस पुनर्विवाह करण्याचा

तुमचे शास्त्रानें खराच प्रतिबंध केला आहे असें ह्मणतां; पण नलराजा नाहींसा झाला होता तेव्हां त्याची पट्टराणी **दमयंती** तिचा पुनर्विवाह करण्याची तयारी केली आहे, असें तिचा पिता **भीमराजा** याचे पदरचे शास्त्रयानें **अयोध्येस** जाऊन तेथील राजा **ऋतुपर्ण** याजला कसें सांगितलें. व तो नवरी मिळवण्यास कसा आला?

शास्त्रीबावा—**दमयंतीचें** खरेंच दुसरें लग्न कर्तव्य नव्हतें. **नलराजाचा** शोध लाविण्यासाठीं केवळ ही एक युक्ति केली होती.

दस्तुरजी —शास्त्रीबाबा, कांहीं विचार करून तरी बोला. अहो, स्त्रीचा पुनर्विवाह कधींच होत नाहीं असें सांगणारे **अयोध्येस** राजांचे पदरीं कोणी शास्त्री अथवा पंडित नव्हतेकाय? व तो राजा इतका मूर्ख होता काय?

शास्त्रीबावा —तुमचे दुसरे ग्रंथ शिपायानें आणिले आहेत. त्यांतून आणखी काय काढावयाचें असेल तें काढा. मग मी सर्वांचें खंडण एकदमच करीन.

दस्तुरजी यानें **याज्ञवल्क्य** स्मृतींतून व्यवहार प्रकरण काढून त्यांतील ऋणादान प्रकरण वाचिलें. आणि मृत झालेले मनुष्यावरील ऋण देणारे जे लिहिले आहेत, त्यांत मयत मनुष्याचें जो कोणी बायको नेईल त्यानें मयता वरील कर्ज द्या

अनुक्रमणिका

वें असें याज्ञवल्क्य ऋषीचें वचन वाचून दाखविलें. आणि पा राशरस्मृतींतून

नष्टेमृतेप्रव्रजिते क्लीबेच पतितेपतौ
पंचस्वापत्सुनारीणां पतिरन्योविधीयते

हें वचन काढून पुढें ठेविलें आणि तो ह्मणाला. अहो शास्त्री बावा, पाराशरऋषीचे वचनांत पतीचें वर्तमान कांहींच लागत नाहीं, अथवा तो मेला, अथवा तो बुळा आहे, अथवा तो संन्याशी झाला, अथवा तोपतित झाला; असे प्रसंगीं नारीनें दुसरा पति करावा, असा अर्थ आहे. त्या प्रमाणें नळराजा नाहींसा झाला होता, तेव्हां दमयंतीचें पुन्हा स्वयंवर मांडिलें. हें खरें असें अयोध्येचे राजास समजणें भाग आलें.

शास्त्री–यांत काय सिद्धकेलें? स्त्रियांनीं ब्रह्मचर्यच आचरावें असें दुसरे अनेक ऋषींनीं सांगितलें आहे.

दस्तुरजी —कोणकोणते ऋषि त्यांचीं नावें तरकळूंद्या.

शास्त्री—मी त्यांचीं नावें तुह्माकरितां लिहून आणलीं नाहींत.

दस्तुरजी—आपल्यास माहित नसेल तर तीं मी दाखवितों. धर्म सांगणारे मुख्य मनु, गौतम, शंखलिखित, आणि पराशर इत्यादि हे ऋषि होते. मनूनें आपल्या धर्मशास्त्रांत लिहिलें आहे कीं, निरनिराळे युगाचे निरनिराळे धर्म आहेत, आणि पराशर संहितेंतील

कृतेतुमानवाधर्मा स्त्रेतायांगौतमाःस्मृताः
द्वापरेशांखलिखिताः कलौपाराशराःस्मृताः

हें वचन आपण वाचून अर्थ सांगितला ह्मणजे पराशरा वांचून दुसरे ऋषींचीं वचनें असलीं तरी तीं कलियुगांत उपयोगी नाहींत, असें उघड दिसेल.

शास्त्री —पाखंड मताशीं भांडून उपयोग नाहीं. आतां सायंसंध्येची वेळ झाली. यास्तव कोतवाल साहेब, निरोप घेतों.

पाद्री —कोतवालसाहेब, प्रतिज्ञेप्रमाणें शास्त्रीबावांनीं यज्ञोपवीत दस्तुरजीचे पायांवर ठेविलें पाहिजे. नंतर निरोप द्यावा.

ह्या प्रमाणें पाद्री बोलल्यावर कोतवाल थट्टेनें हसून त्यानीं सर्वांस निरोप दिला.

गोष्ट १७.

एका दिवशीं घाशीराम पर्वतीकडून अस्लमानचे संधीस येत असतां तळ्यावर पुष्कळ लोक जमून आकाशाकडेस पाहतानां त्याचे दृष्टीस पडले. तेव्हां काय आहे असें त्यानें विचारल्यावरून धूमकेतु उगवला आहे, असें कित्येकांनीं सांगितलें. तेव्हां कोतवालानेंही त्याकडेस दृष्टी पोंचविली, तों मोठा प्रज्व

अनुक्रमणिका

लित तारा असून त्याचे मागें मोठें शेपूट आहे असें त्यानें पाहिलें. तो कांहींवेळ पाहून घरीं आला. इतक्यांत तेथें **गोविंदबावा गोसावी काशीकर** आले. तेव्हां त्या उभयतांचें भाषण चाललें, तें —

घाशीराम —काशीकरबावा, धूमकेतु उगवला आहे त्याचें फळ काय?

काशीकरबावा —हें मोठें दुश्चिन्ह आहे. त्याविषयीं जोतिष शास्त्रांत फार सांगितलें आहे. प्राकृत कवींच्या दोन तीन आर्या आहेत. त्यांत सर्व सारांश आहे

घाशीराम —त्या आर्या आपले पाठांत आहेत काय?

काशीकर —होय. असें उत्तर देऊन आर्या ह्मटल्या त्या

काळचिमहत्पडावा, मर्कीसंग्रामयुद्धनिपजावें;
व्हांवींदुश्चिन्हेंहीं, रायाभूपाळिमृत्युउमजावें १
राष्ट्रींअपायघडती, कर्मकृषीचेंधुळीसमीळावें;
हानीगोचरयांतें, यमदूतांनंगुरांसिपीळावें २
बंडेंनगरींव्हावीं, आवर्षणहेंजनासिपोळील;
येउनिवातप्रचंडचि नावाड्यांसींखचीतघोळील ३

घाशीराम —हीं अरिष्टें निवारण करण्याचे कांहीं उपाय आहेत किंवा नाहींत?

काशीकरबावा—आपलें शास्त्रकर्त्यांनीं सर्व उपाय सांगितले आहेत. ते यथाविधि केले असतां, सर्व अरिष्टांचा नाश होतो.

घाशीराम—कोण कोणते उपाय आहेत?

काशीकर—धूमकेतूचे जपास ब्राह्मण बसवावे, त्यांकडून कोटि जप करवावा. नंतर लक्ष ब्राह्मणभोजन घालावें; आणि अनुष्ठानास बसलेल्या ब्राह्मणांस वस्त्रें प्रावर्णें देऊन बोळवावें.

घाशीराम—ह्या सर्व कृत्यास काय खर्च होईल?

काशीकरबावा—लक्ष सवालक्ष रुपये खर्च होतील, आणि सरकारांतून **कोथरूड, पाषाण, पर्वती** वगैरे ठिकाणीं धूमकेतु निमित्त अनुष्ठानें बसणार असें मी नुकेंच ऐकिलें आहे.

घाशीराम-बरें आहे. आपण उदईक यावें. मी आतां भोजन करून **नानासाहेबांचे** वाड्यांत जातों, आणि मजकूर कळवून अनुष्टानांचें काम मी आपले हातीं घेतों.

काशीकरबावा—फार उत्तम, तें काम आपले हातीं असलें ह्मणजे सर्व यथास्थित होईल.

असें बोलून **काशीकरबावांनीं** निरोप घेतला. दुसरे दिवशीं प्रातःकाळीं बावा **घाशीरामाचे** घरीं आले. तेसमयीं **कातरजेचे** नळाचें काम पाहण्याकडे नेमलेला एक **फ्रेंच** जातीचा यवन होता, तो शिल्पशास्त्रांत प्रवीण असून इतर विद्यांची माहिती त्यास चांगली होती, त्याला **फरासीस साहेब** ह्मणत. तो कांहीं कामा करितां कोतवालाकडेस आला होता. तेव्हां त्याचे समक्ष बोलण्यास आरंभ झाला.

अनुक्रमणिका

घाशीराम—काशीकरबावा रात्रीस नानासाहेबांची गाठ पडली नाहीं. आतां स्नान करून जातों.

काशीकरबावा—बरें आहे. लोकोपकाराची गोष्ट आहे, आणि अरिष्ट थोर आहे. तेव्हां आपल्यास काळजी आहेच

फरासीस—कोतवालसाहेब, कसलें अरिष्ट आलें आहे?

घाशीराम—तुह्मी कालचे रात्रीचा धूमकेतु पाहिला नाहीं काय?

फरासीस—होय. आह्मी पाहिला, व त्याचें गणितही मला कांहीं माहीत आहे. परंतु त्यापासून अरिष्ट कशाचें आहे?

काशीकरबावा—अरिष्ट नाहीं हें ह्मणणें काय? धूमकेतूचा उदय झाल्यानें राजास व राज्यास व प्रजेस मोठा अपाय होतो, असें आमचे शास्त्रांत सांगितलें आहे. त्याची शांति केली पाहिजे. अनुष्ठान व ब्रांम्हणभोजन केल्या वांचून त्याची शांति होत नाहीं.

फरासीस—आमचे देशांत प्राचीन काळीं, तुह्मी सांगतां, अशीच सर्व लोकांची समजूत होती, आणि एकादा धूमकेतु उदयास आला ह्मणजे लोक भयाभित होत. त्या अनर्थाच्या निवारणार्थ आह्मी ईश्वराची प्रार्थना करीत असूं. आमचे ईश्वर पूजनाचे देवळांतील घाट दिवसांतून अनेकवेळ वाजविण्यास देवळांतील सेवकांस आमचे आचार्य आज्ञा करीत. पुढें मोठाले विद्वान जोतिषी होऊन, त्यांनीं मोठाल्या दुर्बिणी व दुसरीं अनेक

यंत्रें करून आकाशाची फार श्रम घेऊन पाहणी केली. त्याव रून त्यांचा तर्क असा पोहोंचला आहे कीं, अंतराळांत ७००००००० सत्तरलक्षां पेक्षां अधिक धूमकेतु आहेत. त्यांतून आजपर्यंत भूमीवरून पांचशें पर्यंत दृष्टीस पडले आहेत. त्या पैकीं शंभर धूमकेतूंच्या कक्षा म्हणजे गमनाचे मार्ग समजले आहेत. ते सूर्यास प्रदक्षणा करितात. त्या पैकीं एकास २०००, एकास ६७५, एकास ७८, एकास ६$\frac{3}{4}$ व एकास ३ अशीं वर्षें प्रदक्षणेस लागतात; ह्याप्रमाणें गणितावरून समजलें आहे. जो धूमकेतु ६७५ वर्षांनीं उदयास यावयाचा, तो इसवी सन १६८० चे सालीं दृष्टीस पडला होता. त्याची गतिएका तासांत ८००००० आठलक्ष मैल ह्मणजे आपले चारलक्ष कोस झाले; व त्याचें शेंपूट प्रथम ६०००००० सहा कोटि मैल लांब होतें. तें वाढून १२०००००० बारा कोटि मैल त्या शेपटाची लांबी झाली होती.

घाशीराम—अशागोष्टी आमचे ऐकण्यांत कधींच नव्हत्या. धूमकेतु हा एकच ग्रह नाहीं काय ?

फरासीस—एक नाहीं. धूमकेतु बहुत करून नित्य उगवतात, परंतु ते आपले पृथ्वीपासून फार लांब असल्यामुळें दृष्टीस पडत नाहींत. आमचे देशांत व युरोप खंडांत दुसरे अनेक ठिकाणीं मोठाल्या दुर्बिणी केल्या आहेत. तशा दुर्बिणी असल्या तर कालचे धूमकेतु शिवाय आणखी अनेक धूमकेतु मी आपल्यास आज रात्रीस दाखविले असते.

घाशिराम–अशा दुर्बिणी किती लांब असतील ?

फरासीस–**सरऐझाकन्यूटन** या नावचा मोठा जोतिषी सन इसवी १६९२ चे सालांत **इंग्लंड** या देशांतील **लिंकानशैर** प्रांतांत होऊन गेला. त्यानें दुर्बिणीचे यंत्राचे जोरानें आकाशांतील पुष्कळ शोध करून सूर्य व चंद्र व ग्रह व तारे वगैरे विषयींच्या प्राचीन लोकांच्या सर्व भ्रांति दूर केल्या व **न्यूटना** शिवाय दुसरे अनेक विद्वान यांणीं या कामांत फार श्रम घेतले. दुर्बिण हें प्रथम कधीं बनावलें, याचा पक्का ठिकाण लागला नाहीं. सन **१५९०** इसवी सनापूर्वी ह्या यंत्राचा उल्लेख कोठें ग्रंथांत आढळत नाहीं. त्या साला नंतर अजमासें तीस वर्षांनीं एक दुर्बिण १६ तसूचे लांबीची **मिडूबर्ग** या शहरांतील एक चस्मे करणाऱ्या कारागिरानें तयार केली. त्यानंतर नवीन व मोठ्या दुर्बिणी होत चालल्या. पुढें आकाश सौंदर्या विषयींचा जसजसा शोध करण्याची इच्छा वाढत चालली, तसतशी दुर्बिणीची लांबी, जी तसूनीं मोजण्यांत येत होती, ती गजांवर आली. ती ६ सहा फूट झाली. नंतर १२ व पुढें २०, ५०,१०० व २००फुटी पर्यंत लांबली. फूट हें बारा तसूचें माप आहे. परंतु अशा लांबट दुर्बिणी लावण्यास व मर्जी प्रमाणें फिरविण्यास अवघड होत्या. शेवटीं वर्तुळ भिंगें बनावण्याच्या व बसविण्याच्या वगैरे नवीन कल्पना निघून शेवटीं लार्ड **रास** या नांवचा एक सरदार आहे, त्यानें १२०००० एकलक्ष वीसहजार रुपये खर्चून दुर्बि

ण रचली.* ती, दोन मोठे नकशीचे खांब ज्यांची उंची साठ फुटी आजमासें आहे, असें बांधून त्या दोहोंचे आंत लाविली आहे; आणि तिचें वजन १२ टन ह्मणजे अजमासें ३३६ मणापेक्षां कमी नाहीं. तथापि ती अशा युक्तीनें त्या खांबांत टां गिली आहे कीं, ती हवीतशी फिरवतां व उंच नीच करतां येते. तिची मध्यभागाची रुंदी आठ फुटींपेक्षां अधिक आहे, व लांबी ४० फुटीची आहे. मनुष्यानें डोकीवर छत्री उघडून तिच्या आंतून खुशाल चालत जावें इतकी ती मोठी आहे.

काशीकरबावा—आमचे ज्योतिषीही ग्रह वेधण्या करितां वेळूचें नलिकायंत्र करितात, परंतु त्यांतून एका पेक्षां अधिक धूमकेतु दिसल्याचें आह्मी कधींच ऐकिलें नाहीं; आणि हे **फरासीससाहेब** तर लाख व कोटी धूमकेतु असल्याच्या गप्पा मारितात! ह्या यवनलोकांवर, कोतवाल साहेब, आपण अगदीं विश्वास ठेवूं नये. यांचे मनांतून आपला धर्म सर्व भ्रष्ट होऊन जातिभेद सर्व मोडून वर्णसंकर व्हावा ही इच्छा आहे. खालीं उत्तर **कोकणांत साष्टीप्रातांत** पहा, या लोकांनीं काय प्रळय माडिला आहे तो. गांवचे गांव बाटवून **ईसूक्रीस्त** कीं काय असा कोणी नवीन देव उभा करून त्याचें बंड चालविलें आहे. यास्तव आपल्यास

* ही दुर्बिण तयार झाली तेव्हां घाशीराम जिवंत नव्हता. परंतु ह्या यंत्राची सर्व हकीकत समजण्यासाठीं लार्ड रास याचे दुर्बिणीचा मजकूर आणणें प्राप्त झालें.

यज्ञोपवीताचा अभिमान असल्यास आपण यवनांचे भाषणावर अगदीं लक्ष्य देऊंनये.

घाशीराम–(**फरासीस साहेबा**कडेस पाहून) कांहो, हे **गोसावीबावा** काय ह्मणतात?

फरासीस–बावा तर **काशीकरच** आहेत. त्यांचें मनांत सरकारास व आपल्यास लुटावयाचें आहे; आणि ज्योतिष विद्येचें त्यांला ज्ञानही नाहीं; तेव्हां त्यांबरोबर भांडून फळ नाहीं.

काशीकरबावा–(रागें भरून) असें अमर्यादेचें भाषण आमचे वडिलांनीं केलें असतां, त्यांचेंही तोंड फोडूं. तूं मर्कट कोण? तुझ्या माकडचेष्टा आतांच बुकालून काढितों.

इतक्यावर बोलणें येऊन उभयतां तापून एकमेकास अपशब्द बोलून हातझोंबीवर येण्याचा प्रसंग आला तेव्हां कोतवालानें उठून त्यालां आवरलें आणि **फरासीस साहेबास** निरोप देऊन **काशिकरबावाला** घेऊन कोतवालसाहेब बसले.

गोष्ट १८.

कार्तिक वद्य १० चा दिवस असतां, कोतवाल हे सायंकाळचे संधीस बाहेर रपेटीस निघाले होते. तेव्हां शहरांत जि

अनुक्रमणिका

कडे तिकडे फार गर्दी पाहिली. ती अशी कीं रस्त्यांतून गाडे, चोकडे, तट्टें व लोक जाण्याची रघ लागली आहे. अतारी हलवाई, तांबोळी, कांसार, सोनार वगैरे उदमी आपआपलीं दुकानें आटपा आटोप करीत आहेत; कोणी केलीं आहे; व कोणी सामान बांधीत आहेत; असें पाहिलें. त्यावरून कोतवालानें बरोबरचे स्वारांस हें काय चाललें आहे ह्मणून विचारलें. तेव्हां उदईक श्रीज्ञानोबाची यात्रा आळंदीस आहे; तेथें सर्व चालले आहेत; असें स्वारानें उत्तर दिलें. नंतर कोतवाल नाना साहेबांचे वाड्यांत गेले. तेथें बहुत मंडळी होती. त्यांत एक नाथबावा दैठणकर होते, त्यां बरोबर बोलणें चाललें.

घाशीराम—अहो दैठणकरबावा, आळंदीचे यात्रेस आपण जाणार काय?

दैठणकरबावा—यात्रे समयीं जाण्याचा पाठ आमचा नाहीं. वारकरी व साधू संत तेथें हजारों एकत्र होऊन मोठी गर्दी होती. ज्ञानेश्वर महाराज यांचे समाधीचें दर्शन होण्यास महत्प्रयास पडतात. कोणाची डोकीं फुटतात. कितीएकांच्या हातापायांस लागतें. तोब्यांचा मोठा प्रळय चालतो. त्यामुळें यात्रे समयीं जाऊन शोभा नाहीं. एरव्हीं कधीं जात असतों.

घाशीराम—ज्ञानेश्वर हे मुळचे कोण कोठील होते, व अळंदीस समाधिस्थ ते कधीं झाले?

दैठणकरबावा—भक्तिविजय म्हणून प्राकृत ग्रंथ महिपती

बाबा ताराबाजकर यांनीं लिहिला आहे. त्यावरून व **ज्ञानेश्वर** यांनीं केलेले कवितेवरून असें कळतें कीं, **गोदातिरीं आपेगांव** म्हणून आहे. तेथें **गोविंदपंत** म्हणून एक कुळकर्णी होता. त्याची बायको **निरूबाई** नामें होती. त्यांला **विठोबा** म्हणून पुत्र झाला. तो वेदशास्त्रांत मोठा निपूण झाला. तो तीर्थयात्रा करीत असतां **आळंदीस** आला. ते वेळेस त्या गांवचें नांव **अलकावती** असें होतें, आणि तेथें **शिदोपंत** म्हणून एक ब्रांह्मण राहत होता. त्याची भेट सहजीं झाली. त्यानें **विठोबाची** वृत्ति पाहून आपले घरीं बोलावून नेलें, आणि भोजन घालून ते दिवशीं आपले घरीं राहविलें. रात्रीस **शिदोपंत** याला दृष्टांत झाला कीं, तुझी कन्या **रुकमाई** इचें लग्न **विठोबा** बरोबर करावें. ह्यांच्या पोटीं चार अवतार मूर्तिमंत येतील. त्याजवरून **सिदोपंत** यानें तो वृत्तांत **विठोबास** प्रातःकाळीं सांगितला. त्यावरून त्यानें समाधि लावून पाहिलें. तेवेळेस त्याला लग्न करावें म्हणून दृष्टांत झाला. नंतर रीतीप्रमाणें व शास्त्रविधीनें **रुकमाई** बरोबर **विठोबाचें** लग्न झालें. पुढें सासरा व जांवई मुली सुद्धां **पंढरपुरास** गेले. तेथून **सिदोपंत** व **रुकमाई** हीं **आळंदीस** परत आलीं, आणि **विठोबा** हा **रामेश्वराकडेस** यात्रेस गेला. तेथें तीर्थाटण करून कांहीं वर्षांनीं **आळंदीस** तो परत आला. तेव्हां **रुकमाई** ही मोठी झाली होती. तिजपाशीं कित्येक वर्षें **आळंदीस** तो राहिला, संतान कांहीं झालें नाहीं. तेव्हां सन्यास घ्यावा असें त्याच्या

अनुक्रमणिका

मनांत आलें, परंतु सासऱ्यास व बायकोस विचारतां तीं दोघें आज्ञा देईनात. मग तसाच कांहीं दिवस राहून गंगा स्नानास जातों ह्मणून **आळंदीहून** निघाला, तो **वाराणसीस** गेला, आणि तेथें **श्रीरामाश्रम** या नावांचे संन्यासी होते, त्यांला मला बायको पुत्र कांहीं नाहींत, असें समजावून त्यांचे हातून त्यानें संन्यास घेतला. तें वर्तमान कांहीं दिवसांनीं त्याचे सासुरवाडीस कळलें. ते समयीं **रुक्माबाई** ही तारुण्य दशेंत होती. त्यामुळें तिनें व तिच्या बापानें मोठा आक्रोश केला. परंतु उपाय नाहीं, ह्मणून उगीच राहिलीं. **रुक्माबाईही** देवसेवेकडेस लागली. ती नित्य पिंपळास प्रदक्षणा घालीत असे. पुढें कालें करून, **विठोबा** याजला ज्यांनीं सन्यास दिला होता, ते **श्रीपादतीर्थयात्रा** करीत **आळंदीस** आले, आणि ज्या पिंपळाच्या पारावर **रुक्माबाई** प्रदक्षणा घालीत होती, त्याजवळ आले, तेव्हां **रुक्माबाईनें** त्यांस नमस्कार केला, ते समयीं "अष्टपुत्रा सौभाग्यवतीभव" असा आशीर्वाद त्यांनीं तिला दिला. तो ऐकून तिला हांसें आलें, त्या वरून **श्रीपाद** यांनीं माझा विनोद तुझ्या मनांत कशा वरून आला तें सांग असें विचारलें. तेव्हां तिनें उत्तर केलें कीं, पति संन्यास घेऊन **वाराणसीस** वास करीत आहेत, तेव्हां मला पुत्र प्राप्ति कोठून होईल, असें मनांत येऊन आपलें वचन मला आश्चर्यकारक भासलें. त्या वरून **श्रीपाद** यांनीं **रुक्माबाईच्या** नवऱ्या विषयींच्या खुणाखाणा विचारिल्या. त्या वरून आप

ण ज्यास सन्यास दीक्षा दिली, तोच हिचा पति होय, असें त्या स कळलें. नंतर **रुकूमाबाई** व तिचा बाप **सिदोपंत** व **श्रीरामाश्रम** हे **वाराणसीस** गेले. तेथें **विठोबानें** आपला अपराध कबूल केला, तेव्हां तूं आपले बायकोस घेऊन आपले गांवीं जाऊन गृहस्थाश्रम धर्म चालवावा, ह्मणून **श्रीपाद** यांनीं त्यास आज्ञा केली. ती वरून **सिदोपंत** जावयास व मुलीस घेऊन **वाराणसीहून आळंदीस** परत आला. तेव्हां ब्रांम्हणांनीं **विठोबा**ची फार निंदा मांडली, आणि त्या स्त्रीपुरुषांस वाळींत टाकिलें. तीं वनांत खोंपट बांधून राहिलीं. पुढें बारा वर्षां नंतर त्यांला तीन पुत्र व एक कन्या झाली. त्यांत पहिला पुत्र **निवृत्ति**, दुसरा **ज्ञानेश्वर**, तिसरा **सोपान**, आणि चवथी **मुक्ताबाई** ह्या प्रमाणें त्यांचीं नामाभिधानें ठेविलीं. पुढें तीं मुलें मोठीं झालीं, तेव्हां पुत्रांचें मौंजीबंधन व कन्येचें लग्न कर्तव्य, यास्तव ब्रंम्हसभा केली, आणि प्रायश्चित्त काय करावें म्हणून विचारलें. तेव्हां **विठोबानें** देहान्त प्रायश्चित केल्या शिवाय शुद्धि नाहीं, म्हणून ब्रांम्हण म्हणूं लागले. तें ऐकून **विठोबा** तिकडून अनुतापानें निघून गेला. त्याचे तिघे पुत्र व कन्या यांला सभासद ब्रांम्हणांनीं सांगितलें कीं, तुम्ही **पैठणास** जाऊन तेथील ब्रांम्हणांपासून संमती पत्र आणावें. त्यावरून तीं चौघें **गोदातीरास** गेलीं, आणि ब्रंम्हसभा त्यांनीं तेथें मिळविली. त्या सभेनें तुम्हा संन्याशाचे पोरांस प्रायश्चित नाहीं, असें सांगितलें; व त्या मुलांपैकीं एकाचें नांव

ज्ञानेश्वर आहे, असें कळल्यावरून कित्येकांनीं त्याची ठवाळकी चालविली. इतक्यांत त्या मार्गानें एक पखालीचा रेडा, ज्याचें नांव **ग्यान्या** होतें, तो चालला होता. त्याला पाहून हा ग्यान्या आणि तो **ग्यान्या हे** सारखेच आहेत, असें एका ब्राह्मणानें विनोदानें ह्मटलें. तें ऐकून **ज्ञानदेव** बोलला कीं, त्यांत व आह्मांत भेद नाहीं. सर्व भूतीं आत्मा सारखाच आहे. त्यावरून तो ब्राह्मण बोलला कीं, जर तुझी गोष्ट खरी आहे, तर या रेडया पासून वेद बोलीव. तेव्हां **ज्ञानदेवानें** उठून त्या रेडयाचे मस्तकीं हात ठेविला, आणि त्या रेड्यापासून चार वेद ह्मणविले. पुढें एका ब्राम्हणाचे येथें हीं चौघेंजणें राहिलीं होतीं. त्याचे घरीं पितृतिथीचें श्राद्ध आलें असतां त्याचे घरीं कोणी ब्राम्हण भोजनास येईना. त्यावरून त्याला मोठी चिंता प्राप्त झाली. तें पाहून **ज्ञानेश्वरांनीं** त्या ब्राम्हणाचे प्रत्यक्ष पितरांस बोलावून भोजन घालून परत पाठविलें. नंतर दसऱ्याचे दिवशीं मांडे करावयाचे होते, त्या कारितां कुंभार रांजण देईनात. यास्तव **ज्ञानेश्वरानीं** आपले मुखांतून अग्निज्वाला काढून आपली पाठ तापवून तीवर **मुक्ताबाईचे** हातून मांडे करविले. पुढें ज्ञानेश्वर हे **पंढरीस** जाऊन तेथून **नामदेवास** बरोबर घेऊन तीर्थाटण करण्यास निघाले. ते फिरत फिरत **हस्तनापुर** म्हणजे दिल्ली येथें गेले. तेव्हां त्या ठिकाणीं **आवेंध** राजा होता, त्या राजानें **नामदेव** जेथें भजन करीत होता तेथें एक गाय आणून तिचें शिर

अनुक्रमणिका

उडवून तिला संजीवन करावें, नाहींतर तुझेंही डोकें मी आपल्या हातानें उडवीन असें सांगितलें. तेव्हां चार दिवसांची मुदत नामदेवानें मागितली आणि त्या मुदतीचे आंत गाईस जिवंत केलें. तें वर्तमान राजास कळल्यावरून तो तेथें आला आणि त्यानें नामदेवाचे पाय वंदिले. मग दिल्लीहून निघून ते साधू वाराणशीस गेले. तेथें ते कबिराचे घरीं उतरले. तेव्हां रात्र झाली होती. कबिरानें आपले बायकोस त्या दोघा पाहुण्यांस कांहीं फराळास देण्यास सांगितलें. ते समयीं घरांत कांहीं नव्हतें, त्या मुळें ती चिंतातुर होऊन बाजारांत निघाली. वाटेनें तिनें एका वाण्याचें दुकान उघडें पाहिलें. मग त्याजपाशीं जाऊन शिधा सामग्री संतजनां करतां दे, जो तुझा पैका होईल तो आणून देतें, असें ती ह्मणाली. तो वाणी कबिराच्या बायकोचें सौंदर्य पाहून मोहित झाला, आणि माझी इच्छा पूर्ण करशील तर तुला पाहिजे तें देतों; नाहींतर परत निघून जावें असें ह्मणाला. तेव्हां रात्र झालेली, व दुसरे ठिकाणीं शिधा मिळावयाचा नाहीं; साधुजन उपोषित राहतील; व आपले सत्वाची हानि होईल; अशा अडचणींत ती पडली. मग त्या वाण्यास तिनें वचन दिलें कीं शिधा सामग्री घरीं नेऊन संतास भोजन घालून तुजपाशीं परत येतें. त्यावचनावर वाण्यानें शिधा सामग्री तिला दिली. ती घेऊन ती घरीं आली, आणि नामदेव व ज्ञानेश्वर यांला भोजन घातल्यानंतर कबिरास एकांतीं नेऊन वा

ण्यास वचन दिल्याचा मजकूर तिनें त्यास सांगितला; आणि त्याची आज्ञा मागितली. तेव्हां पर्जन्य फार पडत होता. यास्तव कबिरानें तिला आपले खांद्यावर बसवून वाण्याचे दुकानीं आणून पोहचविलें, व आपण स्वतः परत घरीं गेला. वाणी हा वाट पाहतच बसला होता. तो कबिरपत्नीस पाहतांच आनंद पावला, आणि इतक्या पर्जन्यांतून व अंधारांतून तूं एकटी कशी आलीस असें त्यानें तिला विचारिलें. तेव्हां तिनें सांगितलें कीं तुह्मी संकट समयीं साह्य केलें व साधुसंतांस अन्न देऊन संतोषविलें, हें महत् पुण्यकर्म झालें हा उपकार तुमचा जाणून माझा पति कबीर यानें मजला आपले खांद्यावर घेऊन येथें आणून पोहचविलें. असा वृत्तांत ऐकतांच त्या वाण्यास मोठा पश्चाताप झाला, आणि त्यानें कबिराचे बायकोचे पायांवर मस्तक ठेविलें; आणि मी तुमची छलना केली याची क्षमा असावी, ह्मणून भावेंकरून तिजपाशीं मागणें मागितलें त्यावरून त्या बाईनें त्या वाण्यास अभय देऊन कबिरा पाशीं नेलें. तेव्हां वाण्यानें कबिरा समोर साष्टांग नमस्कार घातला आणि क्षमा मागितली. कबिरानें त्याचे मस्तकीं वरदहस्त ठेविला. पुढें धंदा व्यापार व घरदार सोडून तो वाणी भक्तिमार्गांत शिरला. मग ज्ञानेश्वर व नामदेव कबिराचा निरोप घेऊन निघाले, ते अनेक तीर्थें हिंडून परत पंढरपुरास आले. तेथें यात्रेचें उद्यापन, ज्यास मांवदें ह्मणतात, तें ज्ञानोबांनीं केलें.

ते समयीं सर्व जातीचे संत मिळवून त्यांत **पंढरपुर** क्षेत्राचे ब्राह्म ण आमंत्रून सर्वांनीं ज्ञातिभेद न ठेवितां एका पंक्तीस भोजन केलें.

घाशीराम–असें कसें झालें? तुह्मी नाथ सांप्रदायाचे ह्मण वितां, व **ज्ञानेश्वर** महाराज यांस गुरूच्या ठिकाणीं मोजतां, आ णि असें असतां तुह्मी ज्ञातिभेद कां ठेवितां बरें?

दैठणकरबावा–**नामदेव** याचे पंक्तीस जे संत बसले होते, त्यांची व **ज्ञानेश्वर** महाराज यांची बरोबरी आह्मास कधींही यात याची नाहीं. आमचे मनांतील विकल्प अद्यापि निघाले ना हींत.

घाशीराम–**ज्ञानेश्वर** महाराज यांचे समाधीचे एकाबाजूस ल्हानसें एक भिंताड आहे. त्याला यात्रेकरी लोक आलिंगन देतात, व त्यास नमस्कार करतात, त्याचें महात्म काय आहे?

दैठणखर बावा–त्याची कथा अशी आहे कीं **ज्ञानेश्वर** व त्यांचे बंधु व बहीण हीं चौघेजणें आपले आजोळीं **आळंदीस** असतां, एक महान भक्त **चांगदेव** या नावाचा त्यांला भेटण्या करितां वाघावर बसून हातांत कोड्याचे बदला एक भयंकर स र्प घेऊन त्यानें त्या व्याघ्रास ताडण करीत गावांत येऊं लाग ला. तें वर्तमान **ज्ञानेश्वर** व त्यांची भावंडें हीं दारापुढील भिं तीवर मुखमार्जन करीत बसलीं होतीं, तेथें त्यांस समजलें.- ते व्हां त्या भिंतीस गति उत्पन्न होऊन चौघाजणां सुद्धां ती भिंत चालत चालत **चांगदेवास** सामोरी गेली. तो अद्भुत चमत्कार

पाहून चांगदेवाचा गर्व उतरला, आणि चालत गेलेलें भिंताड तेथें स्तब्ध राहिलें. त्या भिंताडाचा अंश समाधी जवळचे भिंतींत राहिला आहे. त्या मुळें त्या भिंतीस लोक नमन करितात.

घाशीराम—ज्ञानेश्वर यांचें लग्न झालें होतें किंवा कसें? व त्यांचे वंशांतील कोणी पुरुष आहेत किंवा नाहींत?

दैठणकरबावा—ज्ञानेश्वर व त्यांचे दोघे बंधू व बहीण या चौघांनीं मुळींच लग्नें केलीं नाहींत; ईश्वराच्या उपासनेंत जन्म घालविला.

ज्ञानेश्वर हे शालीवाहन शके १२१८ कार्तिक वद्य १० रोजीं समाधिस्थ झाले. त्यांचे वंशांत कोणी राहिलें नाहीं. परंतु त्यांचा शिष्य संप्रदाय अद्यापि चालत आहे. त्यांस नाथ सांप्रदायी ह्मणतात.

ज्ञानेश्वर हे समाधिस्थ झाले तरीही ते अद्यापि कित्येक भाविक भक्तांस निद्रेंत दृष्टांत देऊन अनुग्रह देतात.

घाशीराम— तुमचे गोसाव्यांत मुख्य संप्रदाय किती आहेत, आणि अनुग्रह देण्याचा विधि कसा काय आहे?

दैठणकरबावा— मुख्य संप्रदाय दोन आहेत. त्यांत एक **नाथसंप्रदाय** व दुसरा रामदाशी संप्रदाय. ज्या पुरुषास अथवा स्त्रीस अनुग्रह घेणें असेल, त्यानें किंवा तिनें त्या पंथांतील बावास शरण जावें. नंतर त्या बावास गुरु करून त्याची पुजा करावी. आणि तन, मन, आणि धन हीं तिन्हीं गुरूस आर्पिलीं अ

अनुक्रमणिका

सा संकल्प करावा. नंतर शिष्य होणारानें गुरु पुढें उभें राहावें. नंतर त्याचे मस्तकावर एक चुंबळ ठेवून तीवर पाण्यानें भरलेलें ताम्हन ठेवितात; आणि त्या ताम्हनाचा जो भाग मस्तका समोर येतो, त्याजवर चंदनाचा टिळा लावितात, आणि त्या टिळ्या कडेस शिष्यास आपले नेत्र एकाग्रतेनें लावण्यास सांगतात; आणि बावाचेपदरची मडळी टाळ झांज घेऊन कीर्तन करितात. नंतर अर्ध घटकेनें शिष्याचे डोक्यावरील ताम्हन उतरून शिष्यास बावासमोर ढोपरास ढोपर लावून बसवितात. नंतर दोघांच्या डोक्यांवरून कांहीं वस्त्र घालतात. मग बावा शिष्याच्या उजवे कानांत मंत्र सांगतात.

घाशीराम— तुमचे संप्रदायाचा मंत्र कोणता व रामदाशी संप्रदायाचा मंत्र कोणता ?

दैठणकरबावा— अनुग्रहाचा मंत्र कोणी कोणास सांगूं नये; अशी आमचे गुरूची आज्ञा आहे. इतक्यावर आपली मर्जी असल्यास कागदाचे तुकड्यावर तो मंत्र आपणास लिहून देतों.

घाशीराम— बावासाहेब, माझा कांहीं आग्रह नाहीं; परंतु माझे मनांत अनुग्रह घ्यावा असें आहे, यास्तव नाथसंप्रदाय व रामदाशी संप्रदाय, या दोहोंचे मंत्र सारखेच आहेत किंवा कसें तें प्रथम पाहून नंतर त्या मार्गांपैकीं चांगला असेल त्याचें ग्रहण करणें आहे.

दैठणकरबावा— यानीं कागद व लेखणी घेऊन त्याजवर

लिहून दिलें कीं, नाथ संप्रदायाचा मंत्र "ओं अहंतत्तु सोहं. ओं श्रीरामनामायनमः" ह्याप्रमाणें नाथसंप्रदायाचा मंत्र आहे आणि रामदाशी संप्रदायाचा मंत्र "श्रीराम, जयराम, जयजयराम." ह्याप्रमाणें आहे. आणि ह्या मंत्रांचा जप अनुग्रह घेणारानें नित्य केला पाहिजे.

घाशीराम— **रामदास** हे कोणीकडे कधीं झाले?

दैठणकरबावा— **रामदास** यांचा जन्म शके १५३० चे सालीं **गोदातिरीं जामगांव** ह्मणून आहे, तेथें झाला. त्याचा बाप **सूर्योपंत** या नांवाचा एक कुळकर्णी होता. त्यानें **रामदासस्वामीचें** मूळचें नांव **नारायण** ठेविलें होतें. तो पुढें **रामाची** उपासना करूं लागल्यामुळें तो **मारुतीचा** अवतार आहे असें लोक समजून त्याचें नाव **रामदास** पडलें; व त्याचे पाठीवर शेपटाप्रमाणें त्वचा बाहेर निघालेली होती. त्यानें अद्भुत कृत्यें पुष्कळ केलीं आहेत. त्यांत एकवेळ नदीचे काठीं एका घारीस दगड लागून ती खालीं पडून तडफडून मेली, तिला **रामदासानीं** जिवंत केलें, आणि शेवटीं **रामदास** हे **सातान्या** जवळ **परळी** ह्मणून पहाडी किला आहे, तेथें येऊन राहिले होते. त्यांचे शिष्य वर्गांत **शिवाजीराजा** होता. कपाळास हात लावून मुजरा करतेवेळेस "रामराम" असें ह्मणण्याची जी हल्लीं वहिवाट चालली आहे, ती **रामदासस्वामीनीं** उपस्थित केली. **रामदासस्वामी** हे **परळीस** शके १६०३ माघ वद्य ९ रोजीं

समाधिस्थ झाले. त्यांचे शिष्यवर्ग भगवीं वस्त्रें नेसतात, आणि त्याच कारणानें सातारकर महाराज यांचा झेंडा भगव्या वस्त्राचा असतो. महाराज हे रामदाशी ह्मणवितात, व त्यांजकडून परळीचे संस्थानास नेमणूक चालत आहे. रामदासस्वामीचे समाधीवर चांदीचे पत्रे जडले आहेत व त्याचप्रमाणें ज्ञानेश्वरमहाराज ह्यांचे समाधीवर रुप्याचे पत्रे आहेत.

गोष्ट १९.

राजापूर ह्मणून रत्नांगिरी पाशीं समुद्रकाठीं बंदर आहे. तेथें भागीरथी प्रगट झाली ह्मणून पुणें शहरांत कित्येक लोकांस पत्रें आल्यावरून कांहीं भावार्थीलोक गंगेच्या दर्शनास गेले, व नित्य नवे जात आहेत, असें वर्तमान घाशीराम याला कळल्यावरून त्या विषयींच्या गोष्टी त्याचे घरीं ब्राह्मण मंडळी येत असे, तीबरोबर त्याच्या चालत असत. त्या प्रमाणें एका दिवशीं रुद्राप्पावाणी राजापुरकर व महमदअली मुनसी वगैरे मंडळी बसली असतां बोलणें चालले, तें.

घाशीराम—अहो रुद्राप्पा नाईक, तुमचे पाहण्यांत राजापुरची गंगा आहे काय?

रुद्राप्पा–होय महाराज; मी अनेक वेळ ती पाहिली आहे. तिचा चमत्कार अद्भुत आहे. एका डोंगराचे पायथ्यास गायमुख आहे. त्यांतून अकस्मात ती भर उन्हाळ्यांत वाहूं लागते. कोणाचा विटाळ झाला अथवा कोणी मोठा पातकी दर्शनास आला ह्मणजे तेव्हांच तिचें वाहणें बंद होतें.

मुनसी– यांत कांहींच चमत्कार नाहीं. कोतवाल साहेब, **बाळकृष्ण** व **वासुदेव** यांच्या कारागीर लोकांनीं केलेल्या पितळेच्या मूर्ती आपण पाहिल्या असतीलच. त्यांत **वसुदेवा**ची मूर्ती पेल्यांत उभी केलेली असते व कृष्णाची मूर्ती त्या **वसुदेवा**च्या डोक्यावर दिली असते. त्या पेल्याचे बुडास एक छिद्र असतें-आणि **वसुदेव** याचे डोकीवरील **बाळकृष्णा**चा एक पाय अंमळसा खालीं लोंबत असतो व त्या पायांचा आंगठा **वसुदेवा**चे मुखाचे समांतर उंचीचे रेषेंत येतो. पेल्यांत पाणी घातलें आणि तें पाणी वसुदेवाचे मुखापर्यंत चढलें ह्मणजे पेल्यांतील सर्व पाणी छिद्रावाटें बाहेर निघून जाऊन पेला कोरडा पडतो. त्या प्रमाणें डोंगराचे पोटांत स्वाभाविक रीतीनें झालेलें राजापुरच्या गंगेचें यंत्र आहे.

रुद्राप्पा—यंत्र तंत्राचें तुमचें मुसलमान लोकांचें भाषण आम्हास रुचत नाहीं. हजारों लोकांनीं ती गंगा पाहिली आहे. त्यांचे दृष्टीस कधींच यंत्र पडलें नाहीं. तर मुनसीनीं पाहिलेल्या गोष्टीस हसावें कीं रडावें?

अनुक्रमणिका

घाशीराम—बाळकृष्ण व वसुदेव यांच्या मूर्ती सर्व कारागिरांचे हातानें तयार होतात असें नाहीं. एका ओतान्यास कोणी महापुरुष प्रसन्न होऊन त्यानें वर दिला आहे, त्याचे हातानें तशा मूर्ती होतात, किंवा त्यांचे जे कोणी शिष्ये झाले आहेत, ते मात्र त्या तयार करितात. त्या मूर्तीचा चमत्कार कृष्णजन्म समयीं यमुनेस झालेल्या चमत्कारा प्रमाणें आहे.

मुनसी—(अंमळसा हसून)कोतवाल साहेब, हें सर्व ढोंग आहे. जर मला थोडकें मेण आणून द्याल, तर आतांच तें यंत्र मी करून दाखवितों.

ह्या प्रमाणें निकरावर वाद आल्यावर कोतवाल यानें एक मेणाचा गोळा आणवून महमदअली मुनसी या पाशीं दिला. तो घेऊन मुनसी यानें त्याची एक नळी केली. आणि त्या नळीस लांबवून ती एका चिनाई मातीचे पात्रांत बसविली. या नळीची आकृति पुढें काढलेल्या प्रमाणें झाली होती.

ह्याप्रमाणें तयारी करून पेल्यांत मुनसी यानें पाणी घातलें. तें पाणी अ—ब याचे मधील रेघेपर्यंत चढतांच क—क नळीचें ड तोंडांतून सर्व पाणी निघून जाऊन पात्र कोरडें झालें. नंतर वाद पुन्हः सुरू झाला.

मुनसी—ही मी मेणाची नळी केली आहे. त्या प्रमाणें धातूची नळी वसुदेव याचे पोटांत असते. तिचे कारणानें पाणी पेल्यांतून बाहेर निघून जातें.

रुद्राप्पा–पेल्याचा मजकूर तुम्ही बराच जुळून दिला. आतां त्या विषयीं आमचें बोलणें राहिलें नाहीं. परंतु त्याचा व राजापुरचे गंगेचा संबंध काय ?

घाशीराम—वाहवा! वाहवा! अप्पानीं बरीच पकड काढिली. आम्ही समजत होतों कीं ह्या म्हाताऱ्यास सभेंत बोलण्याचें कांहीं ज्ञान नसेल; परंतु याची परीक्षा आज बरीच झाली.

रुद्राप्पा–कोतवाल साहेब, आपले कृपे करून चार विद्वान लोकांच्या गांठी पडतात, व त्यांशीं बोलण्याचा प्रसंग येतो. त्या मुळें कांहीं संग्रह जवळ बाळगून आहों.

मुनसी–आहो अप्पा, इतक्यांत फुगूं नका. प्याल्याचा व राजापुरचे गंगेचा संबंध कसा तें सिद्ध करून देतों. भुमींत व समुद्रांत व आकाशांत जे चमत्कार आहेत, त्याविषयींचे ग्रंथ पाहण्याचा मला मोठा षोक आहे. त्या मुळें मी इंग्रजी व फारसी व हिंदुस्थानीं भाषेचे कांहीं ग्रंथ मिळविले आहेत. त्या वरून कळत आहे कीं पर्वत व टेंकड्या वगैरे यांचे पोटांत खोलगे असतात व त्या खोलग्यांत पाणी जमलेलें असतें, आणि कित्येक खोलग्यांतून पाणी निघून जाण्यास अनेक तऱ्हेच्या वाटा असतात. त्यांत वसुदेवाच्या मूर्तीचे पोटांतील नळी प्रमाणें ज्या खोलग्यास वाट असते, त्या खोलग्यांतील पाणी अनियमित काळीं बाहेर पडतें. कारण कीं, पर्जन्य हा साल दरसाल एक सारखा पडत नाहीं. त्या मुळें जमीनीच्या शिरांच्या मार्गानें पाणी

जाऊन ते खोलगे भरण्यास कमजास्ती दिवस लागतात. त्या मुळें त्या खोलग्यांतून पाणी निघण्या विषयींचे काळाची यत्ता नसते.

रुद्राप्पा—आतां ह्या मुनसीनीं तर अनर्थ मांडिला! हे भलभलतें बकूं लागले!

मुनसी—वाणीदादा, इतकी घाई कां करतां? माझें बोलणें सर्व ऐकून घ्या, व मी आपले घरीं माझा गडी पाठविला आहे, तो कांहीं यंत्र घेऊन येईल, तें पहा. नंतर तरी काय बोलणें असेल तें बोला. यूरप खंडांत व इतर ठिकाणीं राजापुरचे गंगे प्रमाणें पुष्कळ गंगा आहेत. त्यांस "अनियत काळ वाही झरे" असें म्हणतात. प्राचीन काळीं त्या झऱ्यांचे कारणानें ठक लोकांनीं भोळ्या व अज्ञान लोकांपासून पुष्कळ द्रव्य उपटलें आहे. त्या ठकांत कांहीं विद्वान असत, आणि त्यांला कोणते गांवीं किती पर्जन्य बारा महिन्यांत पडला, याचा हिशोब करतां येत असे. त्या मुळें असे अनियत काळ वाही झऱ्यांचे असपास पर्जन्य वृष्टी किती झाली तिचें गणीत करून त्या झऱ्यांचा उगम ज्या खोलग्यांतून आहे, ते खोलगे भरून कधीं वाहूं लागतील, याचा निश्चय ते करीत. मग इतर लोकांस, आम्हास दृष्टांत झाला आहे कीं, अमुक ठिकाणचा झरा अमुक दिवशीं वाहूं लागणार आहे असें भाकीत सांगत व त्या प्रमाणें तो झरा त्या दिवशीं वाहूं लागे; त्या मुळें ते ठक लोक मोठे सिद्ध पुरुष आहेत असें इतर लोक समजत व त्यांची सेवा करीत.

इतक्यावर बोलणें आलें तों मुनसीचा गडी एक ल हानसी पेटी घेऊन आला. ती पेटी मुनसीनें उघडून तींतून काचेचें यंत्र काढून कोतवाला पुढें ठेविलें. त्याची आकृति पुढील नमुन्याप्रमाणें होती.

मग मुनसीनें एका तांब्यांत पाणी घेऊन अ, ब, क, ड, ह्या तोब्यांत ओतण्यास आरंभ केला. तें पाणी ज, ज, ज, ज ये थें पात्रांत जाऊं लागलें आणि जस जसें तेथें तें चढलें, तसतसें झ ह्या द्वारानें ट, ट, ट येथें नळींत शिरून इ, फ याचे समान रेघे बरोबर चढतांच नळींतून ठ, ठ, ठ या मार्गानें उतरून ढ, ह्या मुखानें बाहेर वाहूं लागतांच, मुनसी यानें अ, ब, क, ड ह्या तोब्यांत पाणी ओतण्याचे बंद केलें. नंतर दोन तीन पळांत ज, ज, ज, ज येथील सर्व पाणीं जाऊन पात्र कोरडें पडलें.


घाशीराम—मुनसिजी, आणखी एकदां पाणी भरा.

मुनसी. एकदां कां दाहादां भरून दाखवितों, असें बोलून त्यांनीं अनेक वेळ पाणी त्या पात्रांत भरून दाखविलें.


रुद्राप्पा—मुनसी, तुह्मी गौडबंगाली विद्या बरीच शिकली आहे. परंतु या कांचेचे पात्राचा व राजापुरचे गंगेचा संबंध कसा तें माझे लक्ष्यांत अद्यापि आलें नाहीं.

मुनसी—मीं पूर्वीं सांगितलें आहे कीं, डोंगराचे पोटांत खोलगे असतात. त्या प्रमाणें राजापुरचे डोंगराचे पोटांत ह्या यंत्राचे आकृतीचा मोठा खोलगा असावा. त्यांत जमिनीचे

पान १४१ यांत सांगितलेल्या नळीची आकृति.



पान १८४ यांत सांगितलेल्या कान्हेच्या यंत्राची आकृति



शिरांचे योगानें पाणी शिरून तो यत्ते प्रमाणें भरला ह्मणजे तुमचे गायमुखांतून पाणी वाहूं लागतें. तें पाणी खोलग्यांतील संग्रह संपला ह्मणजे गाय मुखांतून वाहण्याचें बंद होतें.

रुद्राप्पा—म्हातु सारखे पंडित असले म्हणजे आम्हास आतांच मशिदींत जावें लागेल. डोंगराचे पोटांतील खोलगे तुह्मी आंत शिरून पाहिले आहेत काय?

मुनसी—पोटार्थी लोकांचे नादीं न लागतां तुह्मी आपले बुद्धीनें विचार कराल, तर खऱ्याचा व खोट्याचा भेद तुह्मास तेव्हांच कळूं लागेल, आह्मी डोंगराचे पोटांत शिरलों नाहीं खरे; परंतु कारल्या नजीक व इतर बहुत ठिकाणीं डोंगर पोखरून मोठाले महाल केलेले आहेत. त्या प्रमाणें कोणी पराक्रमी लोक राजापुरचा डोंगर पोखरण्यास लागतील तर, मी सांगतों, तसा खोलगा व त्यांतून पाणी बाहेर पडण्यास वाट आहे हें सर्व पांच चार महिन्यांत दृष्टीस पडेल.

इतकें बोलणें झाल्यावर कोतवालानीं मुनसीस यंत्र वगैरे आटपण्यास सांगून, आतां पुरे, आणखी कधीं याचा विचार करूं, असें बोलून त्याला व रुद्राप्पा वाण्यास निरोप दिला.

अनुक्रमणिका

गोष्ट २०

ज्या दिवशीं राजापुरचे गंगेविषयीं बोलणें झालें, त्याचे दुसरे दिवशीं **गुलाम अली मुनसी घाशीराम** याचे घरीं पुनः आले. तेथें **शेषाचार्य** या नावाचे शास्त्री बसले होते. तेव्हां बोलण्यास आरंभ झाला.

कोतवाल—मुनसी साहेब, तुह्मी काल बरीच गम्मत करून दाखविली. आतां दुसरी आणखी कांहीं मौज तुमचे संग्रहास राहिली आहे काय?

मुनसी—आम्हास दुसरे अनेक चमत्कार माहीत आहेत.

कोतवाल—आचार्यबावा, ह्या मुनसीनीं कालचे दिवसीं कारल्याचे एकविरा देवीचे लेण्याविषयीं मजकूर काढला होता. त्यावरून यांजला बरीच माहिती आहे असें वाटतें.

आचार्य—कारल्याचें लेणें कांहीं मोठें नाहीं. **आजिंट्याचा** घाट, **खानदेश** व **औरंगाबाद** ह्या दोहोंचे सरहद्दीवर आहे; त्यांत **वेरूळचें** लेणें मोठें असून त्या लेण्यांत **पांडवांनीं** आपले राहण्याचे घराप्रमाणें सर्व सोई केल्या आहेत आणि भिंतीवर मोठाले देव, दानव वगैरे कोरिले आहेत. **पांडव** हे बारा वर्षें अज्ञातवासांत होते. तेव्हां रिकामपणीं त्यांनीं हे डोंगर पोंखरून आंत कोरीव काम केलें आहे. अशीं कृत्यें मनुष्याच्या हातानें व्हावयाचीं नाहींत.

मुनसी— ज्या गोष्टीची बरोबर माहिती नसते, ती गोष्ट अढळली ह्मणजे तिला ईश्वरीकृत्य असें तुमची ह्मणण्याची चाल आहे. परंतु तें ईश्वरी कृत्य किंवा पांडव कृत्य मुळींच नाहीं. अर्वाचीन लोकांचे शोधावरून असें कळत आहे कीं, ज्या ज्या ठिकाणीं ह्या देशांत अशीं लेणीं आढळतात, त्या त्या ठिकाणीं प्राचीन कालचे राजे यांनीं लक्षावधी रुपये खर्चून आपल्यास तपश्चर्या व एकांतवास वगैरे करण्याकरितां हे डोंगरांतील महाल मनुष्यांचे हातांनीं करविलेले आहेत, आणि त्या पैकीं कांहीं महाल जैन धर्मीचे राजांनीं करविलेले असून त्यांत डेरे ह्मणून जें वाटोळे घुमटदार चौके केलेले आहेत, त्यांत गत झालेले राजांच्या समाधी आहेत. तीं मोठालीं कृत्यें करण्यास पांडवास वनवासांत इतकी फुरसत नव्हती असें तुमचेच भारता वरून कळतें

आचार्य—मुनसीचें बोलणें आम्ही कांहीं खरें मानीत नाहीं. कारण कीं, नाशिका जवळ प्रत्यक्ष पंचवटी ह्मणून पेठ वसली आहे. तींत सीतागुंफा अद्यापि असून त्या गुंफेचा प्रकार रामायणांत लिहिला आहे.

मुनसी— तुमचे रामायणांतील सीतागुंफा व पंचवटींतील सीतागुंफा ह्या निराळ्या आहेत; कारण कीं तुमचे ब्रांम्हण जी सीतेच्या शरिराची लांबी रुंदी सांगतात, त्या प्रमाणें सीतेचा आकार खराच असला तर तिचे शरिराचा एक शतांश सुद्धां हल्लींचे नाशिकचे गुंफेंत शिरावयाचा नाहीं. पंचवटीची सीतागुं

अनुक्रमणिका

फा लोकांस ठकविण्याकरितां मनुष्याचे हातानें केलेली आहे. असें ज्यांनीं ती पाहिली ते ह्मणतात, आणि तशी गुंफा आतां कोणी करविली असतां हवी तेथें होईल.


घाशीराम— आमचे महाराष्ट्र देशांत जशीं पांडवाचीं लेणीं आहेत, तशीं यवनी राज्यांत आहेत काय?

मुनसी— पुष्कळ आहेत, आणि तीं स्वतःसिद्ध झालेलीं आहेत.

आचार्य— तीं लेणीं कशीं उत्पन्न झालीं, तें सांगा.

मुनसी—तुह्मी ज्यांस लेणीं म्हणतां, त्यांस यवनलोक गुहा अथवा गुंफा म्हणतात. त्या लहान मोठ्या असतात. त्यां पैकीं कांहीं खडकांत मोठ्या विस्तीर्ण भेगा पडून झाल्या आहेत. कित्येक एकमेकांशीं लगत असून त्यांत एक मेकांतून जाण्यास मार्ग आहेत, आणि कांहीं अशा आहेत कीं त्यांचे दोन्ही बाजूस सूर्याचा प्रकाश पोंहोचतो, व त्या गुहांतून नद्या वाहत असतात. त्यां पैकीं कांहीं पाण्याच्या लोटानें व कांहीं ज्वालामुखीच्या योगानें झाल्या आहेत. नार्वे म्हणून देश आहे, तेथें एक गुहा आहे, ती जमीनींत अकरा हजार फुटी ओंड आहे. जार्जिया देशांत एक आहे, तिची उंची पन्नास फुटी व रुंदी १०० शंभर फुटी आहे; आणि तिची लांबी कितीएक कोस आहे त्याचा ठिकाणा अद्यापि लागला नाहीं. ग्रीक ह्मणून द्वीपें आहेत त्यांत मोठ्या गुहा आहेत त्या गुहांत मशाली लावून जातात, तेव्हां मशालीच्या उजेडानें त्या गुहांतील मार्ग हिऱ्यांनीं जडलेल्या प्रमाणें चकाकतात.

अनुक्रमणिका



FINGAL'S CAVE — फिंगलची गुहा.

अनुक्रमणिका

ऐस्लंड ह्मणून द्वीप आहे. त्यांत ज्वालामुखीनें झालेली मोठी गुहा आहे, तींत पूर्वीं चोरटे लोक राहत असत अशी दंतकथा असल्या मुळें "चोरांची गुहा" असें तिचें नांव पडलें आहे. ह्या गुहेच्या शेजारच्या पर्वतावर ज्वालामुखीनें जळालेले पदार्थांचे मोठे ढीग पडले आहेत. ह्या गुहेचें तोंड छत्तीस फुटी उंच आणि चोपन्न फुटी रुंद आहे, आणि तिची लांबी पांच हजार फुटीवर आहे. तिच्या तळा पासून अजमासें दहा फुटी उंच अशी दगडाची भिंत मनुष्य कृतीनें केलेली अशी दिसते. या गुहेंत तीस फुट लांब व पंधरा फुटी रुंद अशी एक खोली आहे. ती तेथें राहणाऱ्यांची निजावयाची जागा होती.

घाशीराम—अहो मुनसी, तुह्मी ह्या गप्पा सांगतां, किंवा यांत कांहीं खरेपणा आहे?

मुनसी—गप्पा सांगण्याचें कारण काय? मी सांगितलेले गुहा पैकीं कित्येक गुहा हजारों लोकांनीं पाहिलेल्या आहेत व त्यांचे जे नकाशे मजपाशीं आहेत, त्यां पैकीं **स्काटलंड** देशाचे पश्चिमेस जीं बेटें आहेत, त्यांत **स्टाफा** या नावचें द्वीप आहे, त्यांत **फिंगाल**ची गुंफा ह्मणून आहे. तींतील उंच स्तंभ मोठे देवळाच्या कोरीव आणि तऱ्हेवार रंगानें शुशोभित केलेल्या घुमटाच्या स्तंभां सारखे दिसतात. तेथील जमीन असंख्यात लहान स्तंभांच्या कुंभ्यामुळें जाळीदार दगडाच्या फरसबंदी सारखी दिसती. ह्या गुंफेंत जाण्याचा मार्ग त्रेपन्न फुटी रुंद आणि ११७ एकशें सत्रा फुटी उंच कमान

दार आहे. तिची आंतील लांबी २५० दोनशें पंन्नास फुटी आहे. तेथें स्वतःसिद्ध असें एक सिंहासन आहे. त्याजवर चढलें असतां तेथून गुहेची सर्व शोभा स्पष्ट दिसती. ह्या गुंफेची रचना व सौंदर्य मनांत आणिलें असतां ती मनुष्यकृती सारखी भासते; परंतु मनुष्याचे बुद्धि कौशल्यानें होणारीपेक्षां तिची रचना अधिक चमत्कारिक आहे. या गुंफेचा नकाशा, कोतवाल साहेब, मी आपल्यास आणून दाखवीन.

ह्या प्रमाणें बोलणें होऊन **घाशीराम** यानें मुनसी यांस गुंफेचा नकाशा तुह्मास अवकाश असेल तेव्हां आणून दाखवावा, असें सांगून निरोप दिला.

गोष्ट २१.

पांच चार दिवसां नंतर **गुलामअली** मुनसी कितीएक नकाशे घेऊन घाशीरामाकडे आले, आणि त्याला ते दाखवूं लागले, ते वेळेस तेथें पुष्कळ लोक बसले होते. त्यांत **महादेवभट सप्तऋषि** ह्या नावाचा एक वैदिक ब्राह्मण होता. कोतवाल नकाशे पाहूं लागले, त्यांत ज्वालामुखीचा नकाशा पाहून ही आग कोठें लागली आहे असें त्यानें विचारलें, त्यावरून बोलणें सुरू झालें.

मुनसी—ही ज्वालामुखी आहे.

महादेवभट—पाहूं पाहूं ज्वालामुखी कशी आहे ती. आपले शास्त्रांत असें सांगितलें आहे कीं, ईश्वरानें अग्नि निर्माण केला तेव्हां त्याला राहण्यास जागा नाहीं ह्मणून भूमींत पुरून ठेविलें, त्यामुळें होम हवन करणें झाल्यास भूमीवर करावें लागतें; मांडीवर होत नाहीं. आणि होम हवन करते वेळेस भूमींतील अग्नि पाचारावा लागतो. भूमींत ठेवलेल्या अग्नी पासून झालेल्या ज्वालामुख्या आहेत, ह्मणून ऐकतों. त्या पैकींच ही ज्वालामुखी असेल.


मुनसी—कोतवालसाहेब, भटजी सांगतात, त्या पैकीं ही ज्वालामुखी नव्हे. ह्या नकाशांतील ज्वालामुखी धुरांडी प्रमाणें आहे. तींतून कधीं जळक्या धातू निघतात; राखेचा व रेतीचा वर्षाव होतो; व पाण्याचे व चिखलाचे लोट व वाफेचे व वायूचे लोट तींतून निघत असतात. बहुधां ज्वालामुखीचा आकार सुळक्या सारिखा असतो, आणि तिच्या शिखरा जवळ लहानसें वाटोळें कुंड असतें, त्याला मुख ह्मणतात. ह्या प्रमाणें ज्वालामुख्या समुद्राच्या सपाटी पेक्षां कांहीं उंच असलेले जमीनीचे मैदानांत व कित्येक पर्वतांवर व पर्वतांच्या शेजारीं आहेत. त्या पैकीं **युरोपखंडांत एटना, विसुविअस** व **हेक्ला** ह्या ज्वालामुख्या प्रख्यात आहेत; आणि त्यांनीं अनेक वेळ मोठाले अनर्थ केले आहेत. इसवी सन ७० पर्यंत **विसुविअस** या पर्वतावरील

ज्वालामुखी पासून उत्पाद झाल्याविषयीं कोठें वृत्तांत लिहिलेला आढळांत आला नाहीं. ह्या वर्षा पर्यंत पुरातन ज्वालामुखीच्या तोंडावर लहानसें वाटोळें भोंक मात्र होतें आणि त्या ठिकाणीं झाडझाडोरे झाले होते. व तिचे आसपास शेतकी चांगली होत होती. असें असतां वर सांगितले सालांत मोठा उत्पात त्या ठिकाणीं झाला. तेणेंकरून तीन मोठालीं शहरें नाशाप्रत पावलीं. सन १६९९ या सालांत एटना पर्वतावरील ज्वालामुखी फुटली आणि तींतून धातूंचा वगैरे तापलेला रस निघून त्याचा लोट समुद्राकडेस जातांना चौदा शहरें व कित्येक गांव जळून भस्म झाले. अमेरीकाखंडांत अंडिज ह्मणून पर्वत आहे, त्यावरील अनेक उंच टोंकांवर नेहमीं ज्वालामुख्या वाहत आहेत. त्याच्या फुटण्यापासून भयंकर धरणीकंप होतात. त्यां पैकीं एक ज्वालामुखीचे आसपास दोन कोस चौरस जमीन सन १७५९ इसवी सालचे भाद्रपद महिन्यांत पांचशे फुटी उंच एकाएकीं वर उचलली, आणि सुमारें दोन कोस चौरस जागेंतून बाहेर ज्वाला निघूं लागल्या, व जळके खडकाचे तुकडे राखेंतून बाहेर उडूं लागले, आणि ती जमीन समुद्रासारखी खवदळून दोन्ही बाजूनीं ज्वलित कुंडांत पाणी पडे, त्या मुळें ज्वाला अधिकच चेतत. ह्या प्रमाणें ज्वालामुख्या जेव्हां फुटूं लागतात, तेव्हां मोठा घडघडाट होतो. आणि आंतून वाफा निघतात, तेणें क-

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे

संगणकीकृत



THE IGNIS FATUUS. मावीक अग्नि.

अनुक्रमणिका

रून तिचें मुख उघडें होतें. त्यांतून मोठा आवाज निघून तोफा प्रमाणें बार होतात.

महादेवभट—बरें आतां ज्वालामुखी असूंद्या. दुसरीं काय चित्रें मुनसीनीं आणलीं आहेत, तीं पाहूंया. (असें ह्मणून खोटा अग्नि असें नांव ज्या चित्राखालीं लिहिलें होतें तें चित्र हातांत घेऊन हें काय आहे ह्मणून त्यानें विचारलें.)

मुनसी—वेताळाची स्वारी निघते तेव्हां तिजबरोबर दिवट्या असतात, अशी तुमची समज आहे. त्या प्रकारची ही दिवटी आहे.

घाशीराम—वेताळाचे सेवक ही दिवटी घेऊन जातात कीं काय?

मुनसी—ही दिवटी युरोपखंडांतील आहे. तेथें तुमचा वेताळ भुताळ याचा प्रवेश नाहीं.

घाशीराम—ही कशापासून निघते?

मुनसी—जसे ह्या देशांत लोक समजतात कीं, पिशाचें अशा दिवट्या हातीं घेऊन स्मशानभूमी व रणभूमी वगैरे ठिकाणीं रात्रीस फिरतात, त्या प्रमाणेंच त्या खंडांतील लोकांनींही त्या उजेडाचें कारण भूतें आहेत, असें समजून त्या उजेडास पूर्वीं भूतांचीं नांवें पाडलीं होतीं.

महादेवभट—मग आतां काय झालें?

मुनसी—आतां शोध करतांना असें कळलें आहे, कीं भू

तापासून ह्या दिवव्या निघतात अशी जी समजूत पूर्वी होती, ती केवळ अज्ञानापासून होती. असा उजेड निघण्याचीं कारणें अशीं आहेत कीं, चिखली आणि ओलसर जाग्यांत व सांचलेल्या पाण्यांत जनावरें व झाडें सडून त्यांपासून पेट घेणारा धूर निघतो. त्यास इंग्रजींत "गास" असें ह्मणतात. जर असे पाणवळ्यांतील पाणी बाहेर काढून देऊन जागा कोरडी पाडिली, तर त्या ठिकाणीं शेतकी होते. धूर निघण्याचें बंद होऊन उजेड उत्पन्न होत नाहीं. असे प्रकार अनेक प्रांतांत झाले आहेत; आणि हा उजेड जेथें निघतो, तेथें मनुष्य गेलें असतां, त्याचे वेगानें व तोंडांतून श्वास निघतो त्यानें आसपासचे हवेस चलन होऊन तिचे लोटानें दिवटी मनुष्यापासून दूर पळत असते. यास्तव ती जेथें असते, त्या ठिकाणीं हळू हळू जाऊन तिच्याकडे पाठ करून हातांत कागदाचा तुकडा घेऊन तो तुकडा त्या दिवटीस लावून कोणी कोणी पेटविला, अशा गोष्टी अनुभवास आल्या आहेत. ज्या ठिकाणांतून तो उजेड प्रथम निघतो, त्या ठिकाणीं दिवसा जाऊन तेथील गास ह्मणजे धूर आपले घरचे दिव्यानें पेटविला असतां पेटतो, आणि हा उजेड बहुतकरून जमीनीपासून तीन फुटीवर दिसतो. इटली देशांत अपिनैन्स म्हणून पर्वत आहेत. त्यांचे शिखरावरील बर्फ प्रदीप्त होऊन ज्वाला निघतात असें एकदां पाहाण्यांत आलें होतें. सन इसवी १६९१ सालांत इंग्लंदचे



BARBARA URSELIN. बारबरा अर्सलिन या नावाची स्त्री.

पश्चिमेस **वेल्स** ह्मणून देश आहे, त्यांत गवताचे गंजीस सदरी ल सांगितलेले प्रकारचें "गास" म्हणजे धूर याचा संबंध होऊन आग लागली होती.

महादेवभट—कोतवाल साहेब, मुनसीनीं बराच शोध केला आहे. तें दुसरें चित्र दाडीवाले बावाचें कसें काय आहे तें पाहूं.

मुनसी--पहावें महाराज, आणि काय आहे तें सांगावें.

महादेवभट—वाघ गुरगुरत बसलेला दिसतो.

कोतवाल—भटजीबावा, मला पाहूंद्या (असें म्हणून आपले हातीं चित्र घेऊन) नाहीं हो नाहीं, वाघ नाहीं. आपले येथें बैरागी लोक नील म्हणून काळे वान्नर खांद्यावर घेऊन फिरतात, त्या प्रमाणें हा विलायती गोरा वान्नर आहे. कांहो मुनसी, मी ह्मणतों तसेंच हें आहेना?

मुनसी—वाघ नाहीं व वान्नरही नाहीं; ही स्त्री आहे. तिचें नांव **आगष्टा बार्बरा** होतें. ही मडम सन १६५५ इसवींत पैका देऊन पाहण्यास लोक मिळत असत. तिचे बापाचें नाव **अर्सलीन** म्हणून होतें. ते वेळेस तिचें वय बेवीस वर्षांचे होतें व तिचें लग्न होऊन एक वर्ष झालें होतें. तिचे सर्व आंगावर व तोंडावर पिंवळे रंगाचे कुरळे केश होते. ते लोकरी प्रमाणें मृदु असत. आणखी तिला दाट दाडी फुटली होती. ती दाडी तिचे कमरपट्या पर्यंत पोहचत असे. तिचे

अनुक्रमणिका

कानाचे पाळीवर पिंवळट केश असून त्यांचे झुपके लांब खाली लोंबत असत. तिचे नवऱ्याचें नांव बाबेक ह्मणून होतें. तो तिला घेऊन युरोप खंडांतील अनेक देशीं फिरत असे. त्यांत इंग्लंदांतही गेला होता.

घाशीराम—मुनसी साहेब, तुमचीं हीं चित्रें आह्मापाशीं ठेवून जावें, आणि आपल्यास आणखी कधीं अवकाश मिळेल तेव्हां मेहरबानी करून नेण्याचें करावें.

गोष्ट २२

दोन तीन दिवसांनीं **महमदअली** मुनसी हे पुनः कोतवाल याचे घरीं आले. तेव्हां कोतवाल यां पाशीं **महिपत जोशी** बसले होते. त्यांचे समक्ष मुनसी यांचे चित्रां पैकीं एक चित्र हातीं घेऊन हें झाड कसलें आहे ह्मणून कोतवालानें विचारिलें. त्याजवरून संभाषण चाललें.

मुनसी—ह्या देशांत व सर्व देशांत जमीनीवरच्या वावटळी पाहण्यांत नेहमीं येतात. त्या रेताड मैदानांत आणि जंगलांत धुळ आणि रेती ह्यांपासून होतात; या प्रमाणें ही समुद्रांतील वावटळ आहे.



WATER-SPOUT. समुद्रांतील [illegible]ळ.

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

जोशीबावा—आपले येथें वावटळींत जमिनीवरील धूळ उडती. त्याप्रमाणें समुद्रांत धूळ उडण्यास कोठून येती?

घाशीराम—वावटळ ही पिशाचाचा खेळ आहे. तींत लहान सहान पोरें सांपडलीं असतां, पिशाचें त्या पोरांस आकाशांत ओढून नेतात; अशा कथा सर्वांच्या ऐकण्यांत आहेत. तेव्हां ह्या पिशाचांस समुद्राचे तळचीं माती काढून वर उडवितां येणार नाहीं काय? पिशाचांचें सामर्थ्य लहान सहान नाहीं, हें जोशीबावा, तुह्मी जाणतच आहां.

मुनसी—आपल्यास झाडासारखें जें ह्या नकाशांत दिसत आहे ती धूळ नव्हे, आणि समुद्राचें तळास कोरडी मृत्तिका ही नसती. तेव्हां कदाचित आपले ह्मणण्या प्रमाणें पिशाचें धूळ समुद्रांत उडवूं लागलीं तरी त्यांला तेथें धूळ मुळींच मिळावयाची नाहीं. तसेंच समुद्राची वावटळही जमिनी पासून हजारों कोश दूर असे ठिकाणीं पाण्यांत असती, आणि समुद्राची ओंडी कोठें कोठें पांच मैल पर्यंत ह्मणजे आडीच कोश असते, तर ही झाडा सारखी आकृति समुद्राचें पाणी कारंज्या प्रमाणें वर उडून झालेली आहे.

घाशीराम—हीं कारंजीं समुद्रांत कशीं उडतात तें सांगा.

मुनसी—काळें अभ्र येऊन एखादे समयीं समुद्र उचंबळीत होऊन दोनशें हाताचें आसमंतात मोठ्या वेगानें लाटा फिरूं लागतात, व त्या सर्वांची गति चोहोंकडून एकामध्य भागाकडेस

अनुक्रमणिका

होते, त्या मुळें वाफ एकत्र जमती. त्या वाफेचा आकार गाईचे शेपटा प्रमाणें होऊन त्याची नागमोड आकृति होते, आणि ती वाफ काळ्या अभ्राकडेस जाऊं लागते, व वरले अभ्रासही तसे च चलन होऊन त्याची गति खालचे कडेस होते. मग दोन्ही कडील वाफा हळू हळू एकमेकीं कडे येऊन त्यांचा संगम हो तो. नंतर वाऱ्याचे बळानें तो संगम चहोंकडे फिरतो, आणि कधीं कधीं मोठा अवाज होऊन फुटून जातो. तो वाफेचा संगम आंतून पोकळ असतो आणि त्यांतून समुद्राचें पाणी वर चढतें. तें गलबतांत असलेले लोकांस स्पष्ट दिसतें, आणि ते समयीं समु द्र इतका मोठा खवळलेला असतो, कीं जर ह्या पाण्याचे घेरां त एखादें जहाज सांपडलें तर त्यांतून त्याची निभावणी होणें कठीण पडते. हा जलस्तंभ लहान लहान होऊन शेवटीं अ भ्रांत अदृश होतो. ह्या जातीची वावटळ समुद्राचे संबंधा वा चून कधीं नुस्ते मेघां पासूनही उत्पन्न होते, व तींतून गंधकाचा वास व वीज व पाणी हीं निघतात. इसवी सन१७१८चे सालीं अशी मेघां पासून उठलेली वावटळ, इंग्लंडचे ईशान्ये कडेस लांकेशीअर या नांवचें एक शहर आहे, त्या पाशीं पडली हो ती. तेव्हां सुमारें पांच कोश लांब व सातफूट ओंड इतकी ज मीन फुटून गेली होती. असे वावटळीचा भाग सहा हजार फु टी पर्यंत उंच दृष्टीस पडतो; व तिची आकृति व रंग बदलत असतात. समुद्रांतील वावटळीचा व्यास १०० पासून १०००

अनुक्रमणिका



ARIES. मेष.



TAURUS. वृषभ.



GEMINI. मिथुन.



CANCER. कर्क.



LEO. सिंह.



VIRGO. कन्या.


अनुक्रमणिका



LIBRA. तूळ.



CAPRICORNUS. मकर.



SCORPIO. वृश्चिक.



AQUARIUS. कुंभ.



SAGITTARIUS. धन.



PICES. मीन.

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

फुटी पर्यंत असल्याचें दिसतें, आणि तिचा मध्यभाग दोन किंवा तीन फूटी पेक्षां अधिक रुंद दिसत नाहीं. ह्या वावटळी बहुत करून अर्ध तासावर जास्त वेळ पर्यंत ठिकत नाहींत; त्या अनियमित गतीनें फिरतात, कधीं त्यांची गति जलद असते, व कधीं मंद असते. वावटळ वाटोळी फिरत जाते आणि तिच्या गतीचा वेग मोठा असला तर त्यानें मोठाले वृक्ष चिरतात; तोफा पालथ्या पडतात; घरांवरील छपरीं उडतात; लहान सहान पदार्थ तींत सांपडला, तर दहा दहा कोश पर्यंत तो उडून जातो. ती जर एखाद्या तळ्यांत शिरली, तर त्या तळ्यांतील पाणी एकाक्षणांत नाहींसें होतें.

घाशीराम–अहो मुनसी, तुह्मी तर एक रत्न आहां. तुमची खुबी सांगतां येत नाहीं. आतां हें दुसरें चित्र बाराजणांचे कशाचें आहे तें सांगा.

मुनसी–तुमचे बारा महिन्यांत बारा संक्रांती येतात, त्यांचे कारण असें आहे कीं आकाशांत बारा राशी आहेत. त्यां पैकीं एका राशींत एक महिना सूर्य असतो. त्या बारा राशींची आकृति या नकाशांत दाखविली आहे.

घाशीराम–ह्या नकाशांत काढल्या प्रमाणें राशींच्या आकृति आहेत किंवा कसें तें तुह्मी, जोशीबावा, पाहून सांगा.

जोशीबावा–ह्या आविंधांस असे प्रकार कशानें माहित असाव

याचे? आह्मी जोतिषशास्त्राचें अध्ययन केलें आहे, त्यांत अशीं मेंढरीं, बकरीं, खेकडीं, व मच्छ कच्छ कोठेंच काढलेलीं नाहींत.

मुनसी–मजपाशीं एक दुर्बीण आहे. तींतून जोशीबावांची मर्जी असल्यास आज रात्रींस मेंढरीं, बकरीं, व खेकडीं हीं सर्व त्यांस दाखवितों.

घाशीराम–बारा राशींचीं नक्षत्रें स्थिर आहेत किंवा चल आहेत?

मुनसी–तीं नक्षत्रें चल नाहींत. राशिचक्र ह्मणून जी रेषा कल्पिलेली आहे, त्या रेषेवर या बारा राशी असतात.

जोशीबावा–कोतवाल साहेब, शास्त्राचा विषय या बापड्या यवनांस कोठून माहित असावयाचा? त्यांचे बुद्धीस आपण लागल्यास आपले यज्ञोपवीतास बाध येईल.

मुनसी –-अहो जोशीबावा, तुह्मी नुस्ते नांवाचे जोशी दिसत आहां. तुमचेच जोतिषाचे ग्रंथांत मी सांगतों ह्याप्रमाणें बारा राशींची आकृति सांगितली आहे. तसें नसतें तर मग जन्मपत्रिकांचीं जीं मोठालीं भेंडाळीं शें दोनशें रुपये खर्चून थोरलोक करवीत असतात, त्यांत बकरीं, मेंढरीं, खेकडीं, विंचू, सिंव्ह वगैरे यांचीं चित्रें असतात, तीं कशाचीं?

जोशीबावा –तीं चित्रें आकांशांतील काय?

मुनसी –हो, आकाशांतील हें तुह्मास माहीत नसेल तर तुमचे कोणी विशेष जाणते जोतिषी असतील, त्यांस पुसून या.

जोशीबावा—बरें मी पुसेन; पण तुमचे बोलण्यावर आमचा भरंवसा मुळींच नाहीं.

कोतवाल—असो. मुनसी, तीं दुसरीं चित्रें पहाणें राहिलीं आहेत, तीं पाहूं या.

गोष्ट २३.

गुलामअली मुनसी यानीं आणिलेले नकाशांत अमेरिका खंडांतील ब्रेझील या देशाचा नकाशा होता. तो पाहून ह्या नकाशांतील लोक काय करितात, असें घाशीरामानें विचारल्यावरून बोलण्यास आरंभ झाला.

मुनसी—हे लोक हिऱ्यांचे खाणींत हिरे शोधीत आहेत.

घाशीराम—हिरे हे कोठं कोठें सांपडतात हें तुह्मास माहीत आहे काय?

मुनसी—होय, मला कांहीं माहिती आहे. प्रथम हिरे हे हिंदुस्थानाशिवाय दुसरे कोठें निघत नव्हेत. सन १७२८ इसवीचे सालीं अमेरिका खंडांत ब्रेझील ह्या देशांत हिरे आहेत असें कळलें. त्या पूर्वीं कृष्णातीरीं दक्षिणहिंदुस्थानांत गोवळकोंडा ह्मणून प्रांत आहे. तो हिऱ्यांचे उत्पती विषयीं प्र

ख्यात होता. जे उत्तम हिरे कित्येक ग्रंथांत वर्णिलेले आहेत, त्यांत **हिंदुस्थान**चे सलतनतीचा हिरा सर्वांत तेजस्वी असल्याचें वर्णन आहे. त्याचें नांव **कोहेनूर** ह्मणजे तेजःपर्वत असें आहे. त्याची आकृति खबुत्राचे आंडें मधोमध कापलें असतां त्याच्या एका भागासारखी आहे. तो **गोवळकोंडा** येथें सांपडला. इ सवीसनाचे आरंभीं तो **उज्जनी** येथील राजा प्रतापशूर याचे जवळ होता. त्याकडून त्याचे वंशांतील राजे जे **मध्यहिंदुस्थानांत** झाले, त्यांचे हातीं येत गेला. पुढें सन १४०० इसवी हें साल सुरू झाल्यानंतर मुसलमान लोकांनीं **माळव्याचें** राज्य घेतलें, तेव्हां **कोहेनूर** हिरा, **अलाउदीन** ह्मणून दिलीचा सुलतान होता, त्याचे हातीं गेला. पुढें **बबर** पादशाहानें **हिंदुस्थानांत** आपला अम्मल बसविला, तेव्हां त्याचे हातीं तो हिरा सन १५२६ या सालांत आला. त्या पासून पिढी दर पिढी **औरंगजेब** याचा पणतू **महंमदशाह** याचे हातीं आला. त्या पासून **इराणचा नादरशाह** यानें सन १७३९ इसवी सालांत **हिंदुस्थान** सर केलें, तेव्हां त्याचे हातीं गेला. नंतर **नादरशाह** मारला गेल्यावर हा हिरा **अहमदशाह काबुली** याला सांपडला.

घाशीराम——ह्या **कोहिनूर** हिऱ्याचें वजन व किंमत काय असेल ?

मुनसी–त्याचें वजन १८६ रती आहे. तो घासून पैलूदार केलेला आहे. जे वेळेस तो खाणींत सांपडला, व घासले

ला नव्हता, तेव्हां त्याचें वजन ९०० रती होतें, आणि नुस्ते १८६ रतीचें मानावरून अजमास केला तर पन्नास लक्ष पर्यंत त्याची किंमत होईल.

घाशीराम —तो हिरा आतां कोठें असेल? व त्या प्रमाणें दुसरे मोठे हिरे आहेत काय?

मुनसी —तो हिरा आतां **अफगानिस्थान**ची राजधानी काबूल ह्मणून आहे, तेथील एका सरदारापाशीं आहे.* आतां दुसरे मोठे हिऱ्याचा जो वृत्तांत माझे वाचण्यांत आहे तो सांगतों।

१. फ्रान्स देशचे पादशाचा हिरा आहे. त्याला पिटचा हिरा ह्मणतात. त्याचें वजन १३६$\frac{3}{4}$ रती आहे. तो एका तसूपेक्षां कांहीं जास्ती लांब व रुंद आहे, व पावूण तसूपेक्षां अधिक उंच आहे. तो हिरा **गोवळकोंडा** येथेंच सांपडला. तो मद्रासचे पिटसाहेब या नांवचे गवरनर होते, त्यांनीं अजमासें रुपये २०४००० देऊन विकत घेतला, व विलायतेस नेला.

---

* कोहेनूर हा हिरा सन १८१३ इसवीचे सालीं काबूलचा सरदार शासुजा याचे हातीं लागला. नंतर तो पदच्युत होऊन इंग्रजसरकारचे मुलखांत आश्रय मिळण्या करितां पंजाबचा रणजितसिंह याचे देशांतून येत असतां त्याला हा हिरा शासुज्या पाशीं असल्याचें समजलें तेव्हां त्या पासून रणजित सिंह यानें बलात्काराप्रमाणें करून तो हिरा घेतला. पुढें रणजितसिंह गत झाला व त्याचें राज्य इंग्रजसरकारचे हातांत आलें, तेव्हां त्याबरोबर कोहेनूर सांपडला. तो हल्लीं आपली महाराणी विक्तोरिया यांचे जव्हाहिर खान्यांत आहे.

अनुक्रमणिका

त्यां पासून १३००००० तेरालक्ष रुपयांस फ्रेंचचे राज्यप्रतिनिधी यानीं घेतला.

२. टस्कनी ह्मणून युरोप खंडांत देश आहे. त्याचा मुख्य राणा आहे. त्याचा हिरा १३९$\frac{1}{2}$ रती वजनाचा आहे. त्याची किंमत वजनाचे मानानें अजमासें १५३६८२० रुपये होते.


३. रशियाचे पादशाहचा हिरा १९५ रती भार आहे, व तो खबुत्राचे आंड्या सारखा आहे. तो घासून पैलूदार केला आहे. तो रशियाचे राणीनें नऊ लक्ष रुपये व सालीना ४०००० चाळीस हजारांची नेमणूक व एक उमरावाचा किताब इतकें देऊन घेतला.

४. पोर्तुगालचे राजाचा हिरा १६८० रती भार आहे तो खरबरीत असून बेरंगी पुष्कराज आहे असें अनुमान करितात. त्याचे वजनाचे मानानें किंमत केली असतां एकंदर रुपये ५६४४८००० होती.

घाशीराम—कोहेनूर हा हिरा मुळचा ह्या देशचे राजधानीचा असल्यामुळें श्रीमंत सवाईमाधवराव यांस योग्य आहे.

मुनसी—श्रीमंताचे मर्जीस आल्यास काबूलखंदारची स्वारी करून तो हिरा आणण्यास सवड आहे.

घाशीराम—काबूलखंदारचे लोकांबरोबर पानपतास लढाई झाली. तींत खुद्द नानासाहेब होते. ते त्या प्रसंगाच्या गोष्टी सांगतात, त्यांवरून अफगानचे लोक प्रत्यक्ष राक्षस आहेत असें भासतें. सांप्रतकाळीं श्रीमंतांचें वय लहान आहे. ते



THE JUMA MUSJID AT BEIJAPOOR.

विजापूर येथील जुमा मशीद.

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

थोर झाल्यावर आणि तोफखान्याची व स्वार सिबंदीची तयारी फिरंग्यां प्रमाणें झाली ह्मणजे काबूल कंदाहारची स्वारी करण्यास अवघड आहे असें नाहीं.

गोष्ट २४.

घाशीराम—हे दुसरे तीन नकाशे कशाचे आहेत ?

मुनसी—बिजापूर येथील सलतनतीचे वेळची जुमामशीद व गोळ्या घुंमज ह्या मोठ्या इमारतीचे व मलिकमैदान ऊर्फ महां काळी म्हणून तोफ केलेली आहे, तिचा असे हे नकाशे काढलेले आहेत.


घाशीराम—बिजापूरचा इतिहास तुम्हास माहित आहे काय?

मुनसी—कांहीं माहिती आहे. दक्षण प्रांतांतील ब्रांह्मणी राज्य नाहींसें झाल्यावर **अबुउलमुजाफर** ज्यास **यूसफ अदिलशा** ह्मणतात, त्यानें **बिजापूरची अदिलशाई** सलतनत उत्पन्न केली. ती सलतनत सन १४८९ चे सालीं **भीमा** नदी पासून **बिजापूर** पर्यंत चालत होती. पुढें **गोमांतक** हा देश फिरंग्यांपासून घेऊन **अदिलशाह** यानें समुद्राचे कांटापर्यंत आपला अंमल **गोमांतकापासून** मुंबई पर्यंत पोहोंचविला. त्यानें बि

जापूरचा कोट बांधिला. तो सन १५१० इसवी सालांत मरण पावला. पुढें त्याचे वंशांत सात पुरुष गादीवर बसले. त्यांत शेवटला **शिकंदरअलीशाह** झाला. त्याचे कारकिर्दींत सन १६८९ इसवी सालांत अदिलशाई संपली. ती अशी कीं, त्या सनांत **औरंगजेब** यानें जातीनें स्वारी करून **बिजापूर** हस्तगत करून घेतलें, आणि **शिकंदर अलीशाह** याला जिवंत धरिलें. त्यानंतर विजापूरचें राज्य सन १७२४ इसवी पर्यंत दिलीचे पातशाहाचे ताब्यांत राहिलें. नंतर **निजाम**चें राज्य दक्षिणेंत स्वतंत्र होऊन त्यांनीं बिजापूरचें राज्य हस्तगत केलें. त्यापासून पेशव्यानीं सन १७६० इसवी सालांत हिसकून घेतलें. तें हलीं आपले ताब्यांत आहेच.

घाशीराम—ह्या नकाशांतील इमारती व तोफा ह्या कोणी व कधीं तयार केल्या?

मुनसी——मी आतां एकएकांचा वृत्तांत सांगतों. जुमा मसीद ही बांधण्यास आरंभ सन १५६४ इसवी सनांत झाला. ते समयीं अदीलशाई माळकेंतील **अलीअदिलशाह** पहिला, हा गादीवर होता. तो सन १५७९ इसवी सालांत मारला गेल्यानंतर त्याचे तक्तावर बसलेले पादशाहांनीं ह्या मसीदीचें काम पुढें चालविलें. परंतु तें शेवटीं सर्व तयार झालें नाहीं. ही इमारत फार साधे तऱ्हेची बांधिली असून तींतील सर्व भागांचा मेळ फार सुंदर रीतीनें मिळविलेला आहे. तींतील मेहराबींवर सोन्याच्या अक्षरांनीं आमचे धर्म पुस्त



GOLE GOOMUZ   गोल घुमट.

अनुक्रमणिका


कांतील वाक्यें लिहिलीं आहेत. गोळघुमज हा **सुलतान महंमद आदीलशाह** याचा दर्गा आहे. तो बांधण्यास आरंभ सन १६२९ इसवीचे सालीं त्या पादशाहानेंच केला. त्याचें काम सन १६६० इसवी सालीं तो मरण पावे तों पर्यंत चालत होतें. या इमारतीस १३५ फुटी, चौसोपी खोली असून भिंतीचे वर ६० फुटी उंच घुमट वाटोळा केलेला आहे. त्या घुमटाचा व्यास अजमासें १२५ फुटी आहे. त्यांत १० किंवा ११ फुटीचा सभोंवती सज्जा आहे. घुमटाची आंतील उंची १०० फूट असून त्याचा बाहेरील व्यास १३५ फुटी आहे, आणि इतका मोठा घुमट पृथ्वीवर दुसरा कोठें नाहीं असें ह्मणतात. एक एक कोपऱ्यास अष्टपैलू बुरूज आहेत. त्यांला आठ मजले असून वर घुमट आहेत. ही इमारत फार सुंदर आहे व ती आमच्या पाहण्यांत आहे. **मलिकमैदान** ही विचित्र तोफ **औरंगजेब** पादशाह यानें सन १५४९चे सालीं **अंमदनगर** येथें ओतविली. तिचा सांचा अद्यापि तेथें आहे, असें ह्मणतात. ही तोफ **महंमद आदीलशाह** यानें सन १५६१ इसवीचे सालीं सर करून विजापुरास आणवून कोटावरील बुर्जावर चढविली. ती तेथेंच अद्यापि आहे. पुढें **औरंगजीब** यानें **विजापूर** सर केल्यावर ह्या तोफेवर आरबीलिपींत जय प्राप्त झाल्याचा सन कोरविलेला आहे. तो सन १०९७ हिजरी आहे. तो सन १६८५–८६ इसवीस मिळतो. ही तोफ पंधरा फुटी लांब

आहे; असो. तिचे तोंडाचे आंतील व्यास दोन फुटी व दहा इंचाचा आहे. तिला यवनी भाषेंत **मलिकमैदान** ह्मणतात त्याचा अर्थ रणभूमीचा राजा असा आहे. गैर माहितगार लोक तिला मुलुकमैदान ह्मणतात, व हिंदूलोक महांकाळी ह्मणतात, व तिची पुजा करण्यास व ती पुढें बकरीं व कोंबडीं यांच्या आहुती देण्यास जातात—ही तोफ आह्मी बुध्या जाऊन पाहिली आहे.

गोष्ट२९.

घाशीराम—(दुसरें एक चित्र हातीं घेऊन ह्मणतो) ही दिपमाळ आहे वाटतें?

मुनसी—दिपमाळ नाहीं. यास "**पांपीचा स्तंभ**" ह्मणतात. तो **मिसर** देशांत **सिकंदरा** ह्मणून शहर आहे त्याचे दक्षणचे दरवाज्या बाहेर अर्ध कोशा पेक्षां जवळच आहे. हा स्तंभ एक दगडाचा आहे. त्याचे वरील माची नऊ फुटी उंच आहे, आणि त्या खालचा स्तंभ ९० फुटी उंच असून, त्याचा व्यास नऊ फुटी आहे. त्या शिवाय खालचें जोतें पंध्रा फुटी समचौरस ह्मणजे ६० फुटी परिघाचें सं



THE GREAT GUN AT BEIJAPOOR. बिजापूर येथील महांकाळी तोफ.

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

गमरवरी दगडाचें आहे. एकंदर उंची ११५ फुटी आहे हा स्तंभ घोटून साफ व गुळगुळीत केला आहे.

घाशीराम —हा स्तंभ कोणी व कधीं बांधिला?

मुनसी —**पांपी** या नांवाचा मोठा नामांकित सेनापत **रोम**च्या राज्यांत झाला होता. त्याचा जन्म इसवी सनाचे पूर्वी १०६ वर्षें झाला होता, व इसवी सनाचे पूर्वी ४८ वर्षें तो मार ला गेला. त्यानें मोठाले पराक्रम केले. यास्तव त्याचें नाव राहण्याकरितां हा स्तंभ लोकांनीं आपले खर्चानें तयार केल अशी कल्पना लोक करितात; परंतु हा स्तंभ कोणी कोणासाठी बांधिला याचा पक्का शोध लागला नाहीं.


घाशीराम —ह्या स्तंभावर जी माची आहे, तींत कधीं को णी चढला असेल?

मुनसी —स्तंभ गुळगुळीत असल्यामुळें चढतां येत नाहीं. तथापि थोडेच वर्षांवर ह्मणजे इसवी सन १७८१ चे सालीं त्या माचींत इंग्रज जातीचे खलाशांची एक टोळी चढली होती. त्या टोळीनें हा स्तंभ आपले जहाजावरून पाहून अशी प्रतिज्ञा केली कीं, त्यावर चढून मद्यप्राशन करावयाचें. मग त्या प्रतिज्ञेप्र माणें ती टोळी किनाऱ्यावर उतरतांच स्तंभाजवळ गेली आणि त्यावर चढण्याचे अनेक उपाय तिनें केले, परंतु ते निरर्थक झा ले. शेवटीं एक वावडी विकत आणून तिला सुतळी बांधून उडविली. ती वावडी स्तंभाचे माचीवर घालवून तीवरून

तिचे दुसरे बाजूस पाडली. नंतर वावडीचे सुतळीस एक दोरखंड बांधून तें माचीवरून आडवें ओढून घेतलें. नंतर त्या दोरखंडावरून एक नावाडी चढून माचींत गेला. पुढें दुसरे दोर बांधिले आणि दोन आडीच तासांत वर चढण्यास दोरांची शिडी त्यांनीं तयार केली. तिवरून सर्व टोळी वर चढली आणि प्रतिज्ञेप्रमाणें तिनें तेथें मद्यपान केलें. हा तमाशा पाहण्यास आसपासचे हजारों लोक जमले होते, व नावाड्यांनीं अद्भुत पराक्रम केला असें अद्यापि तेथील लोक बोलतात.

घाशीराम —यांत आह्मास कांहीं आश्चर्य वाटत नाहीं. कारण कीं हल्लीं **घोरपडे** ह्मणून सरदार आहेत. त्यांचे वडिलांनीं घोरपड या जनावराचे कंबरेस दोरी बांधून तिला बदामी येथील किल्याचे कोटावर चढविलें. ती घोरपड वर जाऊन चिकटून राहिली. नंतर त्या दोरावरून लोक चढून किला सर केला. तेव्हांपासून **सातारकर** महाराज यांणीं **मालोजीरणतिव्ह** याला **घोरपडे अमिरूलउमराव** असा किताब दिला.

मुनसी—किल्याचा कोट व हा स्तंभ यांत जमीन अस्मानाप्रमाणें भेद आहे. कारण कीं, कोटाचे दगड खरबरीत असतात. त्यामुळें घोरपडीस आपले पायाचे पंज्याचे नखानें धरण्यास आधार मिळतो. आणि **बदामी**चे किल्याप्रमाणें किल्ले तर इंग्रज लोक शिड्या लावून चढतात. हा स्तंभ तर काचे प्रमाणें गुळगुळीत आहे. तेव्हां तेथें तुमची घोरपड बापडी



POMPEY'S PILLAR.

पांपीचा स्तंभ. मीश्र देशांत, सिकंदर्या शहराजवळ आहे.

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका


काय करील ? तसेंच बदामी किल्ल्याचें बांधीव काम इतकें उंचही नाहीं.

गोष्ट २६.

घाशीराम—(**सेंटपालचे** देवळाचा नकाशा हातीं घेऊन विचारतो) खरी गोष्ट आहे; पण ही थोरली इमारत कशाची आहे ?

मुनसी—**ग्रेटब्रिटन** म्हणून इकडून ईशान्य दिशेस मोठें द्वीप उत्तर समुद्रांत आहे. त्यांत **इंग्लंड** या नांवाचा इंग्रजांचा देश असून त्यांत मुख्य राजधानीचें शहर **लंडन** ह्मणून आहे. तेथें मोठें क्रिस्ती धर्माचें देऊळ आहे. त्यास **सेंटपालचें** देऊळ ह्मणतात. त्याविषयींचा वृत्तांत असा आहे कीं, ज्या ठिकाणीं हें देऊळ हल्लीं आहे, त्या ठिकाणीं पूर्वीं अनेक देवळें बांधिलीं होतीं. तीं कालें करून एकामागून एक पडून गेलीं. त्यांत प्रथम **रोमन** लोकांनीं एक देऊळ बांधलें होतें. त्याच्या निशाण्या हल्लींचे देवळाचा पाया खणतांना सांपडल्या होत्या. तें रोमन लोकांचें देऊळ पडल्या नंतर त्याठिकाणीं **कान्स्तैन** या नांवाचे पादशाहानें देऊळ बांधलें होतें. त्याचा नाश झाल्यावर इसवी सन ६०३ या सालांत **साकसनी** औलादीचा पादशाह

यथलबर्ट याचे कारकीर्दीत नवीन देऊळ बांधिलें. त्याचा नाश, सन १०८६ इसवी सालांत लंडन शहरांत मोठी आग लागली होती, ते समयीं झाला. त्या नंतर पुनः नवीन देऊळ बांधण्यास आरंभ होऊन सन ११२१ इसवी सालांत तें तयार झालें. परंतु तें हल्लींचे इमारती इतकें उंच नव्हतें. पुढें सन १५६१ इसवी सालांत त्या देवळावर वीज पडून त्याची फार खराबी झाली होती, तें दुरस्त करण्याचें काम बहुत वर्षें पडून राहिलें. नंतर सुरू होऊन सन१६३३सालीं तें तयार झालें. त्यानंतर सन १६६६सालीं लंडन शहरांत दुसरी मोठी आग लागली, तींत ह्या देवळाचा सर्व नाश झाला. त्या नंतर जें देऊळ बांधलें, तें हल्लीं आहे. त्याचा पाया सन १६७५ इसवी सालांत घातला आणि तें काम तेव्हांपासून चालून सन १७१० इसवी सालांत पुरें झालें. या प्रमाणें हें देऊळ बांधण्यास पस्तीस वर्षें लागलीं हें देऊळ बांधण्यास एकंदर खर्च १,२२२,४३,७० रुपये लागले. ह्या देवळाची पूर्व पश्चिम अत्यंत लांबी ५१० फूट आहे. व दक्षण उत्तर रुंदी २८२ फूट आहे. जोत्या पासून शिखरा पर्यंत उंची ४०४फुटी आहे. लंडन शहरांतील सर्व उंच ठिकाणाहून हें देऊळ दिसतें. बांधीव इमारतीचा घेर २२९२ फूट आहे, आणि थोरला घुमट ६० फूट उंच असून त्याचा परीघ ४२० फूट आहे. ही इमारत दगडी असून तिला चोहों बाजूंत चार दरवाजे आहेत. त्या दरवाज्यांपाशीं वर जा



ST PAUL'S CATHEDRAL. — LONDON. लंडन शाहरांतील सेंटपाल यांचे देऊळ.

अनुक्रमणिका

ण्याच्या शिड्या काळे दगडाच्या आहेत. आंतील जमीन काळे संगमरवरी दगडाची असून त्याचे खांब नक्षीदार त्याच दगडाचे केलेले आहेत. आंतील दिवाणखान्यांत बैठकी आहेत, त्यांत २०००० मनुष्यें बसतील इतकी जागा आहे. ह्या देवळास मोठी घांट आहे. तिचा आवाज मध्यान रात्रीस २० मैल पर्यंत ऐकूं जातो. एका शिडी वरून वर जातानां मध्यें एक पुस्तक ठेवण्याची जागा लागती. तिची जमीन १३७६ तक्त्याचे तुकड्याची केली असून तीस लोखंडी खिळा अथवा लाकडी मेख लाविल्यावांचून केलेली आहे. ह्या इमारतींत ५० पुतळे संगमरवरी दगडाचे आहेत. आणि ह्या इमारती भोंवती लोखंडी कठडा आहे, त्याला एकलाख, चार हजार, वीस रुपये पर्यंत खर्च लागला आहे. ह्या इमारतीचे वरचे मजल्यावरून सर्व लंडनशहर दिसतें. आणि जे कोणी त्या शहरास जातात, ते ही इमारत पाहिल्यावांचून परत येत नाहींत.

गोष्ट २७.

घाशीराम—अहो मुनसी साहेब, तुह्मी मोठे महाभारतीच दिसतां. तुह्मापाशीं फार संग्रह आहे. त्यास आणखी कांहीं चमत्कारिक गोष्टी सांगा.

मुनसी—फ्रान्स देशांत आविमन ह्मणून एक ठिकाण आहे. तेथें एक पाषाण भक्षक आणिला होता. तो दीड तसू लांब, एकतसू रुंद व अर्ध तसू जाड असे गारांचे तुकडे खात असे, व दगडाचे खडे तोंडांत घालून त्याचा भुका करून गिळी. हें खाणें त्यास मोठें रुचकर लागे. त्याचा घसा फार मोठा असून त्याचे दांत अतिशय बळकट होते. त्याचा कोठा इतर मनुष्यांच्यापेक्षांनीच होता. हा मनुष्य एका बेटावर सांपडला होता. तो दगडा बरोबर कच्चें मांस खाई. त्याला भाकरी दिली असतां तो खात नसे व पाणी व मद्य मोठे हौसेनें पीत असे. जमिनीवर बसल्या बसल्याच तो झोंप घेत असे. त्याचें फस्त खोलून रक्त काढिलें असतां, तें चार पांच घटकांत थिजून पोंवळ्या सारखें होत असे. तो मनुष्य दोन तीन शब्द बोलत असे.

घाशीराम— कांहीं साधूबावा शालिग्राम व सुवर्ण मुखीचे तुकडे असे तोंडांतून काढितात असें आमचे पाहण्यांत आहे. तें काय असेल तें सांगा.

मुनसी— तें सर्व ढोंग आहे. त्यांत मंत्र तंत्र कांहीं नाहीं. हळूंहळूं श्रम घेऊन सवय पाडली ह्मणजे कांहीं लहान पदार्थ गिळून ते पुनः वर काढण्यास मनुष्य शिकतें.

घाशीराम—(रघुनाथभटजी जवळ होते. त्यांकडेस पाहून) मांत्रिकबावा, हे मुनसी काय ह्मणतात?

भटजी ह्या यवन लोकांस आपले शास्त्राची माहिती नाहीं.

अनुक्रमणिका

त्यामुळें भलभलत्या कल्पना करितात. जर सर्व ढोंग आहे तर आह्मी मंत्रें करून सोन्याची पुतळी चालवितों, रुप्याची वाटी चालवितों, पिशाच बाधेनें बेशुद्ध पडलेले मनुष्यास सावध करितों, हें कसें?

मुनसी– ही सर्व ठकविण्याची विद्या आहे. आतां दिवसा उजेडास सोन्याची पुतळी किंवा रुप्याची वाटी मंत्रें करून चालवून दाखवाल तर फार तर काय सांगूं; परंतु आपले पायां पाशीं सवाशें मोहोरा नजर करीन.

घाशीराम– मांत्रिकबावा, बरें आहे. चला, तुह्मी आपला पराक्रम दाखवून ह्या मुनसींची खात्री करून द्या.

भटजीबावा– सूर्य अस्तास गेल्या पूर्वी अशीं अघोर कृत्यें करून दाखविण्यास आमचे गुरूची आज्ञा नाहीं, व अविंध लोकां समक्ष आह्मास मंत्र जपतां येत नाहीं.

मुनसी– (मोठ्यानें हांसून) कोतवाल साहेब, भटजीबावांनीं फार मोठी अडचण सांगितली! पैसे, रुपये व वाट्या रात्रींस चालविण्याची कृति करणारे नुस्ते ब्राह्मणच आहेत असें नाहीं; कित्येक माहार, धेड व मुसलमान सुद्धां ह्या ठकबाज्या करून लोकां पासून पैसे उपटतात.

कोतवाल --हें कसें करतात, तें तुह्मास माहीत आहे काय?

मुनसी –होय माहीत आहे. मर्जी असल्यास करून दाखवितों.

अनुक्रमणिका

असें ह्मणून मुनसीनें बाहेर जाऊन घोड्याचे शेपटीचे दहा पांच केंस आणविले, आणि ते एकाशीं एक युक्तीनें तो गाठूं लागला, तें पाहतांच मांत्रिक बावा कांहीं एक निमित्त सांगून उठूं लागले. तेव्हां कोतवालानें त्यांस थांबण्याचा फार आग्रह केला, परंतु तें न ऐकतां ते निघून गेले. नंतर मुनसीनें त्या केंसांचा एक शेवट एका रुप्याचे वाटीस डिंकानें चिकटाविला, आणि दुसरा शेवट आपले हातीं ठेवून कोतवाल व दुसरी अनेक मंडळी घेऊन घरांतील एका खोलींत जाऊन तींतील सर्व खिडक्या बंदकरून आंधार केला आणि एक समई लावली. मग एका हातांत उडीद आणि एका हातांत केंस असें घेऊन वाटी पुढें ठेवून तिजवर उडीद उडवून "चल, ये; चल, ये" असें ह्मणून आपण उठून हळूं हळूं फिरूं लागला. तेव्हां त्याचे मागून वाटी चालूं लागली. नंतर केसाचा शेवट पागोट्याचे पदरास, आपले पायास किंवा आंगरख्यास वगैरे बांधिला, व बसून व निजून मागें पुढें हटून वाटी चालवून दाखविली. हा सर्व प्रकार केला, त्यांत घोड्याचा केंस काळसर असल्यामुळें व खोलींत आंधार केल्यामुळें कोणाच्या दृष्टीस पडला नाहीं. मग आणखी युक्तीनें रुपया व पैसा याला मेण लावून त्या मेणाखालीं गोचडया वगैरे बारीक जीव चिकटावून चालवितात, तो प्रकार समजावून दिला. तेव्हा कोतवाल यां

ची बरीच खात्री झाली. मग खोलीच्या खिडक्या उघडून बोलणें चाललें

कोतवाल —मुनसी साहेब, तुह्मी पराकाष्टा केली! आतां पिशाच बाधा होते व पिशाचबाधा झालेलें मनुष्य नानाप्रकारचे चमत्कार करतें हें काय तें सांगा.

मुनसी —सर्वांचे धर्म पुस्तकांत फिरस्ते व राक्षस व देवदूत असे सांगितले आहेत, व त्यांच्या अनेक जाती आहेत. त्यांत कितीएक सुस्वभावाचे व कितीएक दुष्टस्वभावाचे असतात असें वर्णिलें आहे. त्यांपैकीं दुसऱ्या प्रतींत भुतें आहेत, व त्यांस देह आहे असें ही कांहीं मतांत आहे. त्यांस कदाचित परमेश्वरानें अशी योनी उत्पन्न केली असली तरी तीं भुतें तुमचे आमचे घरीं येऊन पिडा करतात ही समज खोटी आहे. कारण कीं, मनुष्याचे शरीराची रचना, जसें घड्याळांत यंत्र आहे, त्याप्रमाणें आहे, आणि त्या घड्याळांतील यंत्रास हवा व पाणी लागूं न देतां व धक्का किंवा हापटणें न करितां, जेव्हांचे तेव्हां जपून किल्ली दिली असतां व जेथें तेल लावण्याचें तेथें परिमाणा प्रमाणें जेव्हांचे तेव्हां तें लाविलें असतां, तें यंत्र बहुतकाळ पर्यंत बिघडत नाहीं. त्या प्रमाणेंच मनुष्याचे शरीराची जपणूक झाली असतां व खाण्याचा नियम बरोबर ठेविला असतां, त्याला आरोग्य राहील असें अर्वाचीन वैद्यशास्त्र लिहिणारांनीं सांगून त्याप्रमाणें दाखल्यांनीं सिद्ध करून दाखवि

अनुक्रमणिका

लें आहे. तेव्हां जर तुमचे मृतांस व प्रेतांस देह आहे, तर त्या देहानें तुमचेआमचे तोंडांत अथवा नाकांत अथवा कानांत शिरलें पाहिजे. तसें घडण्याचा संभव नाहीं; पण कित्येक रोग आहेत ते वायूचे रूपानें शरिरांत जातात, अथवा दुसरे अनेक कारणांनीं शरिरांत उत्पन्न होतात, त्यामुळें मनुष्यांस भ्रांति होऊन तें बेशुद्ध होतें; व त्या बेशुद्धींत चमत्कारिक भाषणें व कृत्यें करतें. या विषयींचे दाखले झोपेंत चालणारे व काम करणारे मनुष्याचे कृतींत बहुत आढळतात.

घाशीराम— डाकिणी व लांवा यांचे व स्मशानांतील पिशाचांचे वृतांत नेहमी ऐकण्यांत येतात, तें काय आहे?

मुनसी— पिशाचें व लांवा ह्या देशांत जशा प्रसिद्ध आहेत, तशा अर्बस्थानांत व युरोपखंडांतील अनेक देशांत प्रसिद्ध होत्या; आणि अद्यापि अनेक देशांत प्रसिद्ध आहेत. कबरस्थानांतून प्रेत रात्रीस उठून लहान मुलांचें व सुंदर बायकांचें रक्त शोषतें अशी समज अद्यापि आहे, व त्या प्रेतांस "वांपायर" ह्मणजे लाव असें नांव पडलें आहे. जीं मनुष्यें अपघातानें मरतात, अथवा आत्महत्या करतात, तीं लाव होतात; आणि ह्या कारणानें अद्यापि फिरंग्याचे राज्यांत अशी चाल आहे कीं, कोणी शुद्धीवर असून आत्महत्या करील तर त्याचें प्रेत पुरते समयीं त्या प्रेताचे आंगांत आरपार एक मेख ठोकितात, कारण कीं त्या मेखेनें तें प्रेत उठूं शकूं नये, व लोकांचें रक्त शोषण्यास त्यास जा

अनुक्रमणिका

तां येऊं नये. सन १००० इसवी सालांत ऐस्लंड या बेटांत असा प्रकार झाला, कीं एका घरांत तीस चाकर होते. त्यांपैकीं १८ मेल्या मुळें त्यांस लावांनीं मारिलें असें सर्वांस वाटून तेथें मोठी भिती उत्पन्न झाली. तेव्हां तेथील न्यायाधीश यानें सभा करून कायदेशीर चौकशी केली आणि आदृश्य लावा यांला देशपारकरून देण्याची शिक्षा ठरविली!

घाशीराम–तुह्मी सन १००० इसवी सालाची जी गोष्ट सांगतां, तीस आतां किती वर्षें झालीं असतील?

मुनसी–त्या गोष्टीस आतां ७०० वर्षांवर काळ लोटला. पण इतक्या दूर कशाला? नुक्ता सन १७३२ इसवी सालांत आस्त्रिया देशांत असा चमत्कार झाला, कीं एक गवतवाला गवताचे ओझ्या खालीं दडपला जाऊन मेला. तो मरतांच पिशाच होऊन रात्रीस लोकांचे घरांत शिरून त्यांचें रक्त शोषण्यास जातो अशी वार्ता उठली, आणि त्याचे उपद्रवानें चौघे जण मेले अशी लोकांची समज झाली. त्यावरून त्या शहरचे कोतवालानें सरकार नात्यानें कबरस्थानांत जाऊन त्या गवतवाल्याची कबर व त्याचे पीडेनें मेलेले चौघा मनुष्यांच्या कबरा यथाविधि खुल्या केल्या. आणि त्या पांच मुर्दांचे आंगातून मेखा ठोकून ते मुर्दे जमीनींत खिळले, व कबरा पुन्हां दुरुस्त केल्या. परंतु तितक्या वरूनही लोकांचे मनाची शांतता नहोतां तो गवतवाला तसाच लोकांस पीडा करीत आहे, व त्यानें गुरांचें रक्त शो

अनुक्रमणिका

षल्या नंतर त्या गुरांचें मांस ज्यांनीं ज्यांनीं खाल्लें, ते मेले, असा मोठा हहाःकार झाला. त्यावरून सरकार हुकमानें सत्रा कबरा उकरून त्यांतील मुर्द्यांवर लाव झाल्याचा आरोप ठेवून व तो आरोप त्यांवर शाबित करून त्या मुर्द्यांस शिक्षा ठरवून ते मुर्दे जाळून त्यांची राख नदींत टाकिली; तरी लोकांच्या मनाचें समाधान झालें नाहीं. शेवटीं त्या गवतवाल्याचा मुर्दा कबरेंतून पुनः बाहेर काढून सहा दिवस बाहेर ठेविला. नंतर फाशी देण्याचे खांबा जवळ तो पुरला. तेथून पुनः बाहेर काढून त्याचें डोकें, हात व पाय कापले, व त्याचें पोट चिरून त्यांतून त्याचें काळीज बाहेर काढिलें. नंतर काळीज व प्रेत जाळून राख केली. ती राख कोणाचे हातीं न लागावी यास्तव जपून एका पिशवींत भरून ती पिशवी नदींत टाकली.

घाशीराम—जर हें सर्व खोटें आहे, तर अमुक मनुष्य पिशाच झालेला दृष्टीस पडला, असें पुष्कळ लोक सांगतात हें कसें?

मुनसी—तुमचे लोक बहुत करून प्रेतें जाळून राख करितात व आमचे धर्माचे व कृस्ती धर्माचे लोक प्रेतांस पुरतात, त्या प्रेतांची शेवटीं खाक ह्मणजे मृत्तिका होते, हें जग प्रसिद्ध आहे. आणि कोणी श्रीमंत लोक प्रेतांत सुगंधी द्रव्य व मसाला भरतात, व बळकट लांकडाची पेटी करून तींत प्रेतें घालून पेटी बंद करून तिजवर धातूचे पत्रे मारितात, त्या मुळें तीं प्रेतें फार वर्षे

पर्यंत टिकतात. अशीं प्रेतें मिसर देशांत एक मोठें भुईघर आहे, त्यांत हजारों वर्षांवर ठेवलेलीं अद्यापि सांपडतात. जे समयीं मनुष्य उत्पन्न होतें, ते समयीं त्याचें जितकें शरीर असतें तितकेंच तो मरे पर्यंत तें राहत नाहीं. तेव्हां वीस वर्षांचा अथवा चाळीस वर्षांचा कोणी पुरुष मरण पावला असतां, त्याचे शरिराचा अग्नीनें अथवा भूमीनें नाश केल्यावर तो भूत होणें तो कोणते रूपानें होईल? आणि पंच तत्वें ज्यांस तुह्मी पंच भूतें ह्मणतां त्यां पैकीं भूमितत्व ज्या पदार्थांत नाहीं, त्या पदार्थाचा आकार मुळींच दिसावयाचा नाहीं. तेव्हां मनुष्याचे शरीराचा नाश तुह्मी अग्नीनें केला ह्मणजे भूमितत्व तर नाहींसें झालें. मग त्याला आकृति तुह्मास दिसण्या जोगी कोठून येईल? स्वप्नांत जसे दूर देशचे पदार्थ व आपले पाहण्यांत आलेलीं मनुष्यें दिसतात, त्या प्रमाणें जागृतावस्थेंत बुद्धीस विपर्यास झालेला असला ह्मणजे मायिक छाया दिसते. मग जसजसें मनांत येतें तसतसी त्या छायेची आकृति होते, व धुतारे लोक हे भोळे लोकांस कपट करून फार फसवितात, त्यांच्या अनेक कथा आहेत.

कोतवाल—कित्येक पंचाक्षरी व मंत्री हे हाताचे तळव्यास काजळ लावून त्यांत पिशाचें दाखवितात, ते कसें?

मुनसी—तें सर्व खोटें आहे. तळहातावर काजळ लावणारा जो मंत्री असतो, त्याचाच नेमिलेला मनुष्य त्या काजळांत पाहणारा असतो. त्याला शिकवून ठेविलें असतें, त्या प्रमाणें तो सांगतो. ते

अनुक्रमणिका

व्हां भोळे लोक ठकले जातात, आणि हे धंतर मंतर करणारे लोक असें करितात, कीं कोणी भोळसर मनुष्य त्यांचे आढळांत आला, व त्याचे घरीं कोणी दुखण्यानें पडल्याचें अथवा त्यास दुसरें कांहीं अरिष्ट आल्याचें त्या मंत्र्यांस कळलें, ह्मणजे मनुष्याची कवटी अथवा हाडूक अथवा लिंबू कापून त्यांत शेंदुर भरून, अथवा दुसरे नानाप्रकार आहेत त्यां पैकीं करून, ती कवटी अथवा दुसरा पदार्थ कोणाचे हातून त्या भोळ्या गृहस्थाचे घरांत अथवा परसांत अथवा सवड मिळेल तेथें पुरून अथवा लपवून ठेवितात. नंतर मंत्री हा कोणाचे हातून, अथवा आपण स्वतः जाऊन, त्या भोळ्या मनुष्यास मी उपाय करितों असें सांगतो. नंतर त्याकडून कांहीं खर्च करवून, ऊद, नारळ, फुलें, पानें, व मेवा मिठाई आणवून, मंडळ भरून, आपण डोळे झांकून, आंगांत वारें आल्याप्रमाणें, अथवा दुसरें कांहीं करून, सांगतो कीं, ह्या घरांत अथवा जागेंत एक मनुष्य पूर्वीं पुरलेलें आहे. तें पिशाच होऊन पीडा करतें; त्याचा उपाय आहे; परंतु तो करण्यास खर्च पडेल. नंतर तो भोळा मनुष्य अथवा स्त्री आसल्यास ती बाई खर्च करण्याचें कबूल करते. नंतर तो सांगतो कीं, भूत झालेले प्रेताची कवटी ह्या घराचे असपास पांच हातांचे अंतरावर आहे. ती मंत्रें करून शोधून काढून तिचें विसर्जन पाण्यांत अथवा अग्नींत केलें पाहिजे, व भूत झालेले मनुष्यास गतीस लावावें लागेल. मग तो भोळा गृहस्थ अथवा बाई फा

र भयाभीत होते, आणि मंत्री टीप करून देतो, त्याप्रमाणें वस्त्रें, प्रावर्णें व खाण्याचे पदार्थ तयार करते. नंतर दुसरे अथवा तिसरे दिवशीं, अथवा सवड असेल त्याप्रमाणें, तो मंत्री त्या भोळे गृहस्थाचे घरीं बहुतकरून रात्रीस येतो. मग मंडळ भरून, धूमधाम करून नाचत उडत घरांत अथवा घराचे परसांत जाऊन, कुदळी अथवा पहार घेऊन कवटी पुरलेल्या ठिकाणीं पुरणारे माणसाचे हातून खोदवितो. नंतर आपण त्या खाड्यांत हात घालून, कवटी बाहेर काढून, किंकाळी मारून, जमीनीवर उलथा पालथा मूर्छित पडल्या सारखें दाखवितो. नंतर सावध होऊन, त्या कवटीवर मंत्र टाकिल्या प्रमाणें करून तीवर शेंदूर व उडीद वगैरे पदार्थ टाकून, ती सर्वांस दाखवून, आपले माणसाचे हातानें आपले घरीं अथवा दुसरे कोठें नेण्यास सांगतो. नंतर आपण फार श्रमल्या प्रमाणें करून मंडळांत मांडिलेले पदार्थ आपले घरीं नेतो. इतकें झाल्यावर त्या बापडे भोळे गृहस्थाची पीडा दैवयोगानें दूर झाली तर झाली; नाहीं तर त्याला भूर्दंड दिल्याप्रमाणें होतें. आह्मी मुसलमान लोक भुतास सैतान ह्मणतों. त्याचा मूळचा अर्थ शत्रु असा आहे, आणि इंग्रज लोक त्यास "घोस्ट" ह्मणतात. त्याचा अर्थ व तुमच्या भूतशब्दाचा अर्थ प्रेतच्छाया असा एकच आहे; असें आमचें मत आहे.

कोतवाल—फिरंग्यांचे विलायतेंत ढोंगी धुतारे आहेत काय?

मुनसी—तेथें आहेत. तेथली एक गोष्ट तुह्मास सांगतों.

अनुक्रमणिका

ती ऐकून तुह्मास आज बहुत तमाशाप्रमाणें वाटेल. सन १७०४ इसवी सनांत खुद्द लंडन शहरांत एका मनुष्यानें संभावित गृहस्थाचें सोंग घेऊन हाताखालीं दहा पांच चाकर ठेवून एक उंच किंमतीचे सरंजामानें सजिवलेले घरांत भाड्यानें बिऱ्हाड घेतलें. तेथें कांहीं दिवस राहिल्यानंतर आपला सख्खाभाऊ मयत झाला, असें वर्तमान उठवून मूठ माती देण्याकरितां त्याचा मुर्दा आपले बिऱ्हाडास आणून तयारी केली पाहिजे, असें सांगून तें प्रेत घरांत आणण्या करतां त्यानें घरधन्याची रजा घेतली. मग भावाचें प्रेत एका चांगले सुंदर पेटींत घालून त्या बिऱ्हाडीं आणून थोरले माजघरांत ती पेटी ठेविली, आणि आपण व आपले चाकर असे बाहेर दफण करण्याचा सरंजाम आणण्यास गेले. तो गृहस्थ रात्रीचे बारा वाजे पर्यंत परत आला नाहीं. तेव्हां घरधनी व त्याचीं सर्व मुलें माणसें निजवयास गेलीं. एक दासी मात्र कवाड उघडण्यासाठीं जागत होती. ती स्वयंपाकाच्या खोलींत चुलीपाशीं एकटी बसली असतां एक उंच पुरुष त्या खोलींत शिरून त्या दाशीचे समोर एका खुर्चीवर बसला. त्याला पाहिल्या बरोबर मोठ्यानें किंकाळी मारून, तिराप्रमाणें बाजूचे कवाडांतून, धनी व धनीन यांचे निजण्याचे खोलींत, ती दासी पळून गेली, आणि त्यांस जागृत करते तों पिशाच भासणारा तो पुरुष, ज्याचे अंग पांघरुणानें झाकलें आहे व ज्याचे तोंडावर प्रेतकळा आहे असा, त्या

अनुक्रमणिका

निजण्याचे खोलींत शिरून त्या खोलीच्या दारापाशीं एका खुर्चीवर बसला, आणि डोळे भयंकर रीतीनें फिरवून चेहरा वाकडा तिकडा करूं लागला; तेणेंकरून त्या खोलींतील निजणारांस त्याकडे पहावेना. धनी व धनीन हीं घामाघूम होऊन डोळ्यांवर पांघरूण घेऊन बिछान्यावर पडलीं आणि दासीही त्यांचे पलंगापाशीं मूर्छित पडली. घरांत चोहोंकडे गडबडाट चालला. तेणें करून त्यांचें भय अधिकच वाढलें. कांहीं वेळानें घरांतील गडबड निवाली व स्थिरता झाली, असें पाहून घरधन्यानें डोकें उचलून खुर्चीकडेस पाहिलें तो पिशाच नाहींसें झालेलें होतें, त्यामुळें कांहींसें धैर्य धरून खोलीचे बाहेर येऊन पाहिलें तों घरांतील सर्व सरंजाम नाहींसा झाला. पुढें असा शोध लागला कीं एक नामांकित बुलंद चोरटा आर्थर चेंबर्स यानें तें प्रेताचें सोंग घेतलें होतें, व जो बिन्हाडास राहिला होता, तो त्याचा सागी होता. हा बुलंद चोरटा शेवटीं सन १७०६ चे सालीं फाशीं गेला.

गोष्ट २८.

कोतवाल—अहो मुनसी, तुह्मी भुतांची व प्रेतांची बरीच ख बर घेतली पण आमचे कांहीं मंत्री लोक हातावर कापूर पेटवून ठेवितात, व तोंडांत घालितात; व कोणी विस्तवाचा इंगळ हातां त घेतात, याचा प्रकार कसा काय तें सांगणें राहिलें.

मुनसी—भोळसर लोकांस ठकविण्याचें हें एक दुसरें ढोंग आहे. तुह्मी कापराचा खडा पेटवून जरा बारीक दृष्टीनें पहाल तर तेव्हांच दिसून येईल कीं कापूर वरून जळत खालीं जातो. त्यांत तळचा भाग शेवटीं प्रदीप्त होतो. त्या मुळें वरचा भाग ज- ळत असतां तळचे भागा खालीं कांहीं पदार्थ असला तर त्या ला लौकर आंच लागत नाहीं. त्या मुळें तुमचे मंत्र्यांचे हात व तोंडें भाजत नाहींत. जर ते कापराचा तुकडा सर्व जळून जा ई पर्यंत हातावर अथवा जिभेवर राहूं देतील, तर त्यांचे ते अ वयव पोळल्या वांचून राहणार नाहींत . आतां जळता इंगळ हातावर घेण्याचा प्रकार असा आहे कीं हळूं हळूं हातांस सवय लाविली ह्मणजे हातांचीं चांमडीं भाजून भाजून कठोर होतात, त्या मुळें विस्तवाचा इंगळ वरचेवर लागत नाहीं. आणखी कांहीं वनस्पती अशा आहेत कीं त्यांचीं पुटें हाताचे अथवा पायाचे तळव्यास दिलीं असतां, ती जागा विस्तवानें लौकर भाजत नाहीं; मी विस्तवा

विषयीं तुह्मास गोष्ट सांगेन. ती ऐकाल तर मग तुमचे मंत्र्यांची तुह्मास आठवण देखील होणार नाहीं.

घाशीराम—ती गोष्ट काय ती सांगा.

मुनसी—सन १६७१ ह्या सालांत फ्रान्स देशांत **रिचार्डसन** या नांवाचा एक अग्निभक्षक प्रख्यात झाला होता. तो चकचकीत विस्तवावर गंधकाचे तुकडे ठेवून ते गिळीत असे. तो एकदां काचेचा रस करून पिऊन गेला. नंतर विस्तवाचा चकचकीत इंगळ त्यानें आपले जिभेवर ठेंविला, आणि कालव ह्मणून समुद्राचे पाण्यांत दगडावर जीव उत्पन्न होत असतो,तो त्या इंगळावर ठेवून बाहेरून दुसऱ्याकडून फुंक मारवून तो कालव भाजवला. मग डांबर व मेण हीं गंधकाचे योगानें पातळ करून तो रस तो पिऊन गेला.

कोतवाल—असो. ही गोष्ट ऐकण्या सारखी आहे. पण तुमचे मुसलमान लोक बीर विद्या करून मनुष्याचें डोकें कापून धड निराळें करतात, व मोठे वजनाचे दगड व लोखंडी गोळे बारीक सुतानें मनुष्याचे बोटास किंवा खबुत्राचे पायास टांगितात; व कित्येक कोल्हांटी दगडाचे मोठे गोळे वर झोंकून आपले दंडावर व पाटीवर झेलतात, हें काय आहे?

मुनसी—बीर विद्या ह्मणतात, तें सर्व ढोंग आहे. मी आपल्यास एक वेळ आंधारांत घोडयाचे केशानें रूप्याची वाटी चालवून दाखविली. त्या प्रमाणें खबुत्राचे पायास व मनुष्याचे बोटांस दगड

व गोळे सुतानें टांगण्याची कपट युक्तिआहे. तींत कांहींच नवल ना हीं. हें कपट रात्रीस करण्यास साधतें. आणि त्याचा प्रकार असा आ हे कीं ज्या खोलींत ही बीर विद्या ह्मणून चालवायाची असते, त्या खोलींतील बिच्छायतीचा व सभोंवतीचे भिंतींचा व वरील छताचा रंग एक सारखा करतात; आणि लोखंडी सळया क रून कारणा प्रमाणें छतास टांगितात, अथवा जमीनीवर उ भ्या करितात; आणि त्या लोखंडी सळयांचा रंग व आसपासचे भिंतीचा वगैरे रंग एकसारखा असल्यामुळें, व उजेड फार कमी ठेविल्यामुळें, दाहा हातांवर उभे राहिलेले तमासगिरांस त्या लो खंडी सळया दिसत नाहींत. व सुताचा रंग निराळा अस ल्यामुळें तें स्पष्ट दिसतें. त्या मुळें सुताचे जोरावर दगड किं वा लोखंडी गोळा टांगलेला दिसतो. आतां मनुष्याचें शीर व धड कापलेलें दिसतें त्या हिकमतीस दोन मनुष्यें लागतात. त्यां पैकीं एकास जमीनींत पुरून डोकेंमात्र बाहेर ठेवितात, आ णि दुसरे मनुष्यास भिंतीस अथवा पडद्यास त्याचे खांदे लावू न निजवून त्याचें शीर भिंतींत घालितात, अथवा पडद्याचे आंतले बाजूस काढितात, त्यामुळें एका मनुष्याचें डोकें व दु सरे मनुष्याचें नुस्तें धड तमासगिरांचे दृष्टीस पडतें, आणि बकऱ्याचे अथवा दुसरे जनावराचें रक्त एका पितळींत आणून त्या डोक्यापाशीं व धडापाशीं सांडतात व पितळींतील रक्त लोकांस दाखवितात. त्यामुळें धडावरील शीर कापून

ठेविलेलें आहे, असें लोकांस वाटतें. कोल्हांटी लोक दगडाच्या गोळ्यावर उडवून झेलतात, हा प्रकार बळाचा व कसरतीचा असून त्यांत कांहीं अद्भुतपणा नाहीं. ह्या पेक्षां मोठाले चमत्कार असे आहेत, कीं इटली देशांत एक मनुष्य होता. तो संगमरवरी दगडाचा एक खांब तीन फूट लांब व एक फूट रुंद असा हातांत घेऊन वर उंच उडवून दोन्ही बाहूंत झेलून पुनः वाकडा तिकडा उडवून चेंडू प्रमाणें त्या दगडाशीं खेळत असे. दुसरा एक मनुष्य एक वेळ एका घरांत २४ पाहिऱ्या चढून माडीवर गेलेला होता. तेथें थंडी फार होती. मग आपले यजमानास थंडी वाजूं लागल्यामुळें व शेगडींत विस्तव चांगला नसल्यामुळें त्यानें खालीं चौकांत जाऊन तेथें गाढवें लांकडांचे ओझ्यानें लादलेलीं होतीं, त्यां पैकीं सर्वांहून मोठें गाढव पाहून तें त्याजवरील ओझ्या सुद्धां आपले खांद्यावर घेऊन माडीवर नेलें. अशा पेहलवान व कसरती लोकांचे कृतिच्या बहुत गोष्टी आहेत.

कोतवाल—मुनसी तुह्मी बृहस्पती सारखे आहां! आतां एक प्रश्न विचारतों, त्याचें उत्तर झालें ह्मणजे आटोपूं.

मुनसी—बरें आहे विचारावें. माहित असल्यास जाब देईन.

कोतवाल—माणूस अधिक वांचतें किंवा झाड अधिक वांचतें?

मुनसी—दिडशें वर्षांचीं मनुष्यें अनेक असल्याचे दाखले आहेत. आणि सन १७८० इसवी सालांत एक टेंझो नावा

चा मनुष्य मैयत झाला तो १७५ वर्षांचा होता; पण शें दोनशें वर्षांच्या झाडा विषयीं कांहींच नाहीं. पांच हजारा पासून सहा हजार वर्षांचीं झाडें कांहीं कांहीं अढळतात.

समाप्त.

अनुक्रमणिका



अनुक्रमणिका